
ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक



भारतीय सौर अश्विन-मार्गशीर्ष १९३८
[illegible] २०१६ / खंड ४० अंक २

भारताच्या सामाजिक प्रगतीची सद्यस्थिती
ग्रीन बँकींग: संकल्पना
आर्थिक सुधारणांची पंचविशी
काळा पैसा आणि नोटांचे विमुद्रीकरण
सरदार वल्लभभाई पटेल यांचे आर्थिक विचार
जागतिकीकरणाचे पीरणाम व आव्हाने
कायदेशीर नोटा रद्द: विविध अनुभव
ग्रामीण महिला सक्षमीकरण व जीवनोन्नती अभियान
सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादकतेतील कल
काळा पैसा आणि पायाभूत सुविधांचा विकास
महाराष्ट्रातील कामकरी लोकसंख्या
७३व्या घटनादुरुस्ती अंतर्गत वित्तीय स्वायत्तता
शेतीक्षेत्रातील मजुरांचा तुटवडा
अर्थव्यवस्थेतील उर्जास्रोत

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक **अर्थसंवाद**

*International Research Journal*

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् कृतीरर्थः।

www.marthpari.org

ऑक्टोबर-डिसेंबर २०१६ / खंड ४० अंक ३

**प्रमुख संपादक**

अविनाश रामलाल निकम

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१५-१८)

तेजस्विनी मुडेकर

अरूण पिसे

राजेंद्र गव्हाळे

विजय भोपाळे

**संपादकीय पत्रव्यवहार**

**डॉ.अविनाश निकम**

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा

संपादकीय संवाद : अर्थशास्त्र..ज्याचं..त्याचं!.........२१७

शिवाजी ढगे, पुणे

भारताच्या सामाजिक प्रगतीची सद्यस्थिती..............२१९

युगंधरा टोपरे, औरंगाबाद

ग्रीन बँकींग: संकल्पना व उपयोजन...................२२६

सुभाष पाटील, पुणे

आर्थिक सुधारणांची पंचविशी-एक सिंहावलोकन......२३४

रामदास भांडवलकर, यवतमाळ

काळा पैसा आणि नोटांचे विमुद्रीकरण.................२४२

निता वाणी, रावेर

सरदार वल्लभभाई पटेल यांचे आर्थिक विचार..........२४८

सुरेखा फाकडे, पेठ-वडगाव

जागतिकीकरणाचे परिणाम व आव्हाने.................२५४

वैशाली जोशी, नाशिक

कायदेशीर नोटा रद्द:विविध आर्थिक स्तरांचे अनुभव ..२६२

आशिष निमकर, अमरावती

ग्रामीण महिला सक्षमीकरण व जीवनोन्नती अभियान...२६६

संतोष कदम, श्रीकांत होटकर, सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादकतेतील कल .....२७२

कृष्णा शहाणे, नाशिक

काळा पैसा आणि पायाभूत सुविधांचा विकास.........२८०

रामेश्वर तांबे, धनश्री महाजन, औरंगाबाद

महाराष्ट्रातील कामकरी लोकसंख्या.....................२८८

माधव शिंदे, गणेश पोटे, अहमदनगर

७३व्या घटनादुरुस्ती अंतर्गत वित्तीय स्वायत्तता........२९६

मनिषा चौधरी, जामनेर

शेतीक्षेत्रातील मजुरांचा तुटवडा........................३०४

रमेश भालेराव, परभणी

अर्थव्यवस्थेतील उर्जास्रोत: उत्पादन व उपभोग .......३०९

मंजुषा मुसमाडे, पुणे

ग्रंथ परीक्षण: सुक्ष्मवित्ताचा सुबोध परिचय.............३१७

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१६-१७**

**अध्यक्ष**

शिवाजी मुरलीधर भोसले (सातारा)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

रामदास बापुराव भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

अर्जुन महाडिक (कोल्हापूर)
विनायक भिसे (औरंगाबाद)
बालाजी शिंदे (परभणी)

**सदस्य**

सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
अशोक खाचणे (जळगाव)
राजेंद्र शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
संजय धनवटे (कारंजा)
पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)
तुकाराम मुंडे (मानवत)
दिनकर मोरे (इस्लामपूर)
जीवन सोळंके (नाशिक)
वामन सावंत (रत्नागिरी)
राहूल म्होपरे (कोल्हापूर)
सुरेश ढाके (भुसावळ)
सुरेश पाटील (चांदवड)



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.

## संपादकीय संवाद...

### अर्थशास्त्र.....ज्याचं...त्याचं!

हा किस्सा मुंबईचा आहे..........

दोघं मित्र एकाच अपार्टमेंटमध्ये रहात होते. शाळा कॉलेजात एकाच वर्गात शिकणारे. एका बेंचवर बसणारे. एक अभ्यासात खूपच हुशार होता. तर दुसरा साधारण. जो हुशार होता त्याच्या पप्पांच्या मालकीची एक कंपनी होती. तर दुसरा अभ्यासात साधारण असलेल्या मुलाचे वडील बँकेत सर्व्हिसला होते. महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावर तीन-चार वर्षातच हुशार मित्रानं त्यांच्या कंपनीचा कारभार ताब्यात घेतला. कंपनी दोन-तीन वर्षे चांगली चालली. मात्र पुढच्या मंदीचा कालावधी आल्यानं कंपनी आर्थिक अडचणीत आली. त्याच वेळी अभ्यासात साधारण होता तो सकाळी जायचा अन् सायंकाळी घरी यायचा. तो करतोय तरी काय याबाबत अपार्टमेंटमध्ये कोणालाही माहित नव्हतं. एकदा अपार्टमेन्टच्या गेटसमोर दोघा मित्रांची भेट झाली. त्या प्रसंगी कंपनी मालक मित्राचा चेहरा खूप चिंताग्रस्त वाटला. म्हणून त्यानं विचारलं, ''खूप चिंतेत दिसतोय.... कशाची चिंता लागलीय?'' त्यावेळी तो म्हणाला, ''मंदीच्या काळात कंपनी चालवणं सोपं नाही. पण तुला माझी समस्या सांगून काय फायदा?'' त्यावेळी तो साधारण मित्र म्हणाला, ''सांगून तर पहा, मला काही करता आलं तर नक्की करेन.'' त्याला माहित होतं हा आयुष्यात काहीच करू शकला नाही, हा काय करणार? तरी त्यानं आपुलकीने विचारलेलं पाहून आपला प्रॉब्लेम सांगून टाकला. ''माझी कंपनी आर्थिक अडचणीत आली आहे. पन्नास करोडचे पेमेन्ट नाही दिले तर कंपनीचं क्रेडीट जाणार आहे. दोन-चार महिने कुठूनही पन्नास कोटी रुपये उधार मिळाले तर या संकटातून कंपनी नक्की सावरेल. अशा मंदीच्या काळात बँका मदत द्यायला तयार नाहीत.'' यावर साधारण मित्रानं 'प्रयत्न करतो' असा शब्द दिला. अन् आश्चर्य असं की, दुसऱ्याच दिवशी त्याच्या मित्रानं पन्नास कोटी रुपये उधार आणून दिले. यावर कंपनी मालकानं विचारलं, ''तू हा पैसा कुठून आणला?'' यावर तो साधारण वाटणारा मित्र म्हणाला, ''ज्या वेळी तू पैसे कमवत होता, त्या वेळी मी मित्र कमवत होतो.''

खरं तर कार, अलिशान बंगला, नोकर-चाकर अन् ऐशआरामी जिंदगी आपली असावी असं अनेकांना वाटतं. सरकारी लवाजमा दिमतीला असावा अशी इच्छा अनेक सरकारी अधिकाऱ्यांची असते. मात्र मध्यप्रदेशातील खांडवा जिल्ह्याचे अपर सत्र न्यायाधिश अक्षयकुमार द्विवेदी हे याला अपवाद आहेत. ते सरकारी कारऐवजी पायीच चालणं पसंत करतात. सरकारी बंगला सोडून ते एका साध्या खोलीत राहतात. अविवाहीत आहेत. नोकर मिळत असूनही स्वत:च स्वयंपाकही करतात. पन्ना जिल्ह्यातून सप्टेंबर २०१४ पासून ते खांडवा येथे आहेत. मध्य प्रदेश हायकोर्टात अर्ज करून त्यांनी आपलं वेतन निम्म्यावर आणण्याची विनंती देखील केली आहे. लोकांना न्याय देण्याच्या भूमिकेतून ते वकील झाले. परंतु कोर्टात निकाल खूपच उशिरा लागतात त्यामुळे लोकांना मानसिक त्रासाला सामोरं जावं लागतं हे पाहून द्विवेदी न्यायाधिश झाले. न्यायाधिश अक्षयकुमार यांच्याकडे केवळ मोबाईल हीच एक संपत्ती आहे. मोबाईल देखील त्यांच्या आईनं दिलेला आहे. लोकांना मात्र त्यांच्या या साधेपणाची भूरळ पडली आहे.

ही घटना जुन्या काळातली आहे. खूप मागं त्यासाठी जावं लागेल. अर्थवेत्ता कौटिल्यांच्या काळात. कौटिल्य रात्रीच्या वेळी घरी बसले होते. एक व्यक्ती त्यांना खाजगी कामासाठी भेटण्यास आला त्यावेळी त्यांच्याकडे आधीच दोन जण आलेले होते. त्यांची चर्चा झाल्यावर ते गेले. कौटिल्यांनी नुकत्याच आलेल्या व्यक्तीला त्या रूममध्ये बोलावले. तो काळच दिवाबत्तीचा होता. कौटिल्यांनी एक दुसरा दिवा लावून आधी

सुरू असलेला दिवा विझविला. हे पाहून त्या व्यक्तीनं कौटिल्यांना विचारलं, ''दिवा तर सुरू होता, मग तो बंद करून हा का लावला?'' कौटिल्य म्हणाले, ''आधी सरकारी कामासाठी ते लोक आले होते. सरकारी काम झालं. तुम्ही खाजगी कामासाठी आले आहात. सरकारी इंधन दिव्यासाठी कसं वापरणार?'' आता काळच बदलला आहे. सर्वच लोक सारखे आहेत असं माझं म्हणणं नाही. हा किस्सा मुंबईतील आहे. तेथील महापालिकेत एक व्यक्ती नोकरीस आहे. त्याला जिथं काम सोपवलं तिथं तो भ्रष्टाचार करणार हे जणू ठरलेलंच. त्याची वेगवेगळ्या विभागात बदली केली तरी तो सुधारत नाही. त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ते सगळं पाहून त्याला भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी ऑफिसवेळेत समुद्र किनाऱ्यावर उभा राहा अन् लाटा मोज, हे काम सोपविलं. दुसऱ्या दिवसापासून तो लाटा मोजण्यास उभा राहिला. त्यानं पाहिलं की, अनेक लहानमोठे जहाजं त्या किनाऱ्यावर आपला माल उतरवतात. त्यानं त्या जहाजवाल्यांना हटकलं, सांगितलं की, तो लाटांचा सर्व्हे करतो आहे. हे काम सरकारी आहे. लाटा मोजण्याच्या कामात तुम्हाला अडथळा आणता येणार नाही. म्हणून एवढ्या परिसरात जहाजं लावता येणार नाहीत. जहाजवाले व्यवहारी होते. त्यांनी त्याच्याशी वाद न घालता 'प्रतिजहाज फीज्' ठरवून घेतली. त्याला पैशाचा मार्ग गवसला.

बँका गरिबांना कर्ज देण्यास नाखूश असतात. कारण साधं आहे. गरिबांकडे कर्जासाठी लागणाऱ्या तारणाचा अभाव असतो. गरीब मात्र पैशाअभावी गरिबीच्या दुष्टचक्रात अडकतो. त्यांना मदतीचा हात देणं आवश्यक असतं. हे पाहून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या, अगदी भिकारी असणाऱ्या लोकांना कर्ज देण्याचं साहस बँकेच्या माध्यमातून बांग्लादेशातील डॉ.मोहम्मद युनूस यांनी दाखवलं. या प्रयोगात अमर्याद यश आलं. सूक्ष्मवित्त ही संकल्पना उदयास आली. जगातील निर्धनांच्या जीवनात नवीन अपेक्षा निर्माण झाल्या. या कार्याची दखल जागतिक स्तरावर घेतली अन् डॉ.मोहम्मद युनूस यांना अत्यंत प्रतिष्ठेच्या 'नोबेल' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

नुकत्याच झालेल्या नोटबंदीच्या निर्णयामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेत खळबळ माजली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नोटाबंदीचा निर्णय घेऊन हे काळा पैसा विरोधातील पाऊल टाकलं. जुन्या पाचशे-हजाराच्या नोटा बहुतांश बँकांत जमा झाल्या, अनेकांकडे दोन हजाराच्या नोटा करोडोंनी सापडल्या त्यामुळे या मोहिमेस फारसं यश आलं नाही असा आरोप विरोधकांकडून होतोय. तर नोटाबंदीमुळे रु.४८०७ कोटी काळापैसा उघडकीस आल्याची माहिती खाजगी चॅनलसवर देण्यात आली. या निर्णयानं शेतमाल किंमतीला फटका बसल्यानं बहुतांश शेतकरी वर्ग मात्र होरपळून निघाला. नोटा बदलण्यातच बँकांचा बराच वेळ गेल्यानं बँकांना कर्ज व्यवसायाकडे पुरेसं लक्ष देता आलं नाही. ठेवी अन् कर्ज वितरणाचा हा तोल वेळीच सावरला नाही तर बँका तोट्यात जातील. अखेर जनतेने डिजिटल पेमेन्टचा अवलंब करण्यास काही प्रमाणात का होईना, पण सुरुवात केली आहे.

माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचा उल्लेख केल्याशिवाय हे संपादकीय अपूर्णच राहील असं वाटतं. अब्दुल कलाम यांचे शास्त्रज्ञ अन् राष्ट्रपती म्हणून कार्य नव्यानं सांगण्याची आवश्यकता नाही. पण नियुक्तीनंतर राष्ट्रपती म्हणून राष्ट्रपती भवनात ज्या वेळी ते राहण्यास आले त्या वेळी त्यांच्याकडे फक्त एक सर्टिफिकेटसची बॅग होती. ते रिक्षात आले होते. त्यांच्यासाठी संपूर्ण राष्ट्रपतीभवन राहण्यासाठी असले तरी एका व्यक्तीच्या सोयी-सुविधांसाठी देशाचा खर्च उगाच वाढू नये यासाठी त्यांनी तेथील एका रूममध्ये राहणं पसंत केलं. अन् आपला कार्यकाळ संपल्यावर त्याच बॅगेत फक्त सर्टिफिकेट्स घेऊन एक रिक्षा बोलावून त्यात ते गेले.

स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. एच. जैन, स्थानिक कार्यवाह डॉ. सुरेश पाटील यांनी अर्थसंवादसाठी जाहिरात दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. अर्थसंवादच्या या अंकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो. या अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

**अविनाश रामलाल निकम, प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

अर्थसंवाद

# भारताच्या सामाजिक प्रगतीची सद्य:स्थिती

**शिवाजी कारभारी ढगे, पुणे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी.
भ्रमणध्वनी: ९८५०७३२०३७
ई-मेल: dhage_shivaji@yahoo.com

आजच्या आधुनिक युगात एखाद्या देशाचा आर्थिक विकास किती झाला आहे? या प्रश्नाऐवजी त्या देशातील लोकांचा, विस्थापितांचा, समाजाचा विकास व प्रगती किती झाली आहे याचा प्रामुख्याने विचार केला जातो. आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्रांचा आर्थिक विकास मोजण्याबाबत विविध निर्देशांक वापरले जातात. १९३४ मध्ये राष्ट्रांचा विकास मोजण्यासाठी प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ सायमन कुझनेट यांनी *राष्ट्रीय उत्पन्न, १९२९-३२* या शोध निबंधाव्दारे *स्थुल देशांतर्गत उत्पादनाची* (जी.डी.पी.) संकल्पना अमेरिकन सरकारपुढे मांडली तेव्हापासून आजपर्यंत सर्व देश आर्थिक विकासाचा निर्देशांक म्हणून जी.डी.पी. चा वापर करतात.असे असले तरी जी.डी.पी. च्या पलिकडे जाऊन गिनी सहगुणक (GINI Coefficient), मानव विकास निर्देशांक (HDI) आणि स्थुल देशांतर्गत समाधान किंवा कल्याण (GNH) यासारख्या निर्देशांकाचा वापर केला. गिनी सहगुणक कॅरॅडो गिनी यांनी मांडला व आर्थिक विषमता मोजण्याचा निर्देशक म्हणून जागतिक बँकेने स्वीकारला. मात्र हा निर्देशांक सामाजिक लाभ मोजण्यामध्ये अपयशी ठरला. स्थूल देशांतर्गत कल्याण (GNH) या निर्देशांकांची सुरूवात १९७० मध्ये भुतानच्या राजाने केली. मात्र हा निर्देशांक लिंग समानता, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि दर्जेदार पायाभूत सुविधा यांकडे दुर्लक्ष करतो. मानव विकास निर्देशांकाची सुरूवात १९९० मध्ये झाली. यामध्ये वरील निर्देशांकामध्ये राहिलेल्या बाबींचा विचार केला. मात्र यामध्ये संपत्तीचे समान वाटप, पायाभूत सुविधांचा विकास, वैयक्तिक हक्क, पिण्याचे स्वच्छ व पुरेसे पाणी, कचरा, सांडपाण्याची व्यवस्था, जवळपास शाळेची व्यवस्था, शिक्षण गुणवत्ता, स्वस्त आरोग्य सेवा, स्त्रियांचे कौटुंबिक व सामाजिक स्वातंत्र्य, खेळ-करमणूक व आनंदाची साधने असणे, परिसर व पर्यावरण निरोगी व सुरक्षित असणे, बचत व आर्थिक सुरक्षितता, सामाजिक सलोखा, भीती मुक्त

समाज, स्वच्छ व पारदर्शी प्रशासन यासारख्या घटकांचा विचार केला जात नाही. याचाच अर्थ वरील सर्व निर्देशांकांवरून आर्थिक विकास किंवा सामाजिक प्रगतीचे मोजमाप योग्य रीतीने केले जाऊ शकत नाही. एखाद्या देशाच्या सामाजिक प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी अगदी अलिकडील काळात म्हणजेच २०१३ पासून जागतिक पातळीवर सामाजिक प्रगतीचा निर्देशांक ही संकल्पना वापरली जाऊ लागली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्ट्ये पुढील-प्रमाणे आहेत.

१. सामाजिक प्रगतीच्या निदेशांकाची संकल्पना अभ्यासणे.

२. भारताच्या सामाजिक प्रगतीच्या निर्देशांकाची जागतिक पातळीवर तुलना करणे व त्याची सद्य:स्थिती अभ्यासणे.

**अभ्यास पध्दती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा अवलंब केला असून यामध्ये संदर्भासाठी पुस्तके, मासिके, वृत्तपत्र व इंटरनेट इत्यादिंच्या आधारे माहितीचे संकलन केले आहे.

**सामाजिक प्रगतीचा निर्देशांक (SPI):**

सामाजिक प्रगतीचा निर्देशांक हा एखाद्या देशाने आपल्या देशातील नागरिकांच्या सामाजिक व पर्यावरणात्मक गरजा किती प्रमाणात भागविल्या आहेत याचे मोजमाप करते. २०१० मध्ये अमेरिकेतील एका स्वयंसेवी संस्थेने नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन, डग्लस नॉर्थ आणि जोसेफ स्टिग्लीझ यांच्या सामाजिक विकासातील योगदानावरील लिखाणातून प्रेरणा घेऊन हा निर्देशांक तयार केला. या निर्देशांकाचे मुख्य तीन घटक असून जवळपास ५२ उप निर्देशक घटक आहेत की, जे लोकांच्या मुलभूत गरजा, कल्याण आणि त्यांना उपलब्ध होणाऱ्या संधीशी संबंधित आहेत. याचाच अर्थ जी.डी.पी., एच.डी.आय. व गिनी या निर्देशक घटकांनी सामाजिक कल्याणाबाबत ज्या घटकांचा विचार केला नव्हता त्यांचा समावेश सामाजिक प्रगती निर्देशांकामध्ये केला आहे.

तक्ता क्र.१ मध्ये सामाजिक प्रगती निर्देशांकाची रचना दर्शविली असून मानवी गरजा, कल्याणाचे स्त्रोत व संधी या प्रमुख घटकांचा समावेश यामध्ये होतो. तसेच प्रत्येक प्रमुख घटकाचे ४ उपघटक दर्शविले आहेत व प्रत्येक ४

तक्ता क्र.१

सामाजिक प्रगती निर्देशांक घटक

| प्राथमिक मानवी गरजा | कल्याण पाया/स्त्रोत | संधी |
| --- | --- | --- |
| १) पोषण आणि प्राथमिक आरोग्य | १) प्राथमिक ज्ञानाची उपलब्धता | १.व्यक्तिगत हक्क |
| २) पाणी आणि स्वच्छता | २) माहिती व दळणवळणाची उपलब्धता | २.व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि निवड |
| ३) निवारा | ३) आरोग्य आणि कल्याण | ३.सहिष्णुता व समावेशन |
| ४) वैयक्तिक सुरक्षा | ४) पर्यावरणाची गुणवत्ता | ४. प्रगत शिक्षणाची उपलब्धता |

उपघटकाचे देखील प्रत्येकी ४ घटकांमध्ये वर्गीकरण करून जवळपास ५२ घटकांचा समावेश या निर्देशक घटकांमध्ये होतो. जेणेकरून सर्व समावेशक सामाजिक प्रगतीचा अंदाज बांधता येतो. हे घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

अ) प्राथमिक मानवी गरजा :

सामाजिक प्रगती मापनातील प्राथमिक मानवी गरज हा एक प्रमुख निर्देशक घटक असून यामध्ये पुढील उपघटकांचा समावेश केला आहे.

१) पोषण आणि प्राथमिक आरोग्य

या घटकामध्ये कुपोषण, अन्नाची कमतरता, मातृत्व काळातील मृत्यू दर, बालमृत्यू व संसर्गजन्य रोगांमुळे होणारे मृत्यू इत्यादींचा विचार केला जातो.

२) पाणी आणि स्वच्छता

यामध्ये नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा, ग्रामीण भागात सुधारलेले जलस्त्रोत आणि स्वच्छतेबाबत सुधारलेल्या सुविधांचा विचार केला जातो.

३) निवारा

यामध्ये सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांची उपलब्धता व विजेची उपलब्धता इत्यादी घटकांचा समावेश होतो.

४) वैयक्तिक सुरक्षा

यामध्ये नर हत्यांचा दर, गुन्ह्यांची संख्या, राजकीय दहशत, अपघाती मृत्यू व गुन्हेगारीचे प्रमाण इत्यादी घटकांचा समावेश होतो.

ब) कल्याण पाया/स्त्रोत :

सामाजिक प्रगती मापनातील हा एक प्रमुख घटक असून यामध्ये पुढील उपघटकांचा समावेश होतो.

१) प्राथमिक ज्ञानाची उपलब्धता

यामध्ये प्रौढ साक्षरता दर, प्राथमिक शाळा नोंदणी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा नोंदणी व शाळेतील लिंग समानता इत्यादी घटकांचा समावेश होतो.

२) माहिती व दळणवळणाची उपलब्धता

यामध्ये मोबाईल फोन धारकांची संख्या तसेच इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या या घटकांचा समावेश होतो.

३) आरोग्य आणि कल्याण

यामध्ये आयुर्मान, आकस्मिक मृत्यूदर व आत्महत्या इत्यादी घटकांचा समावेश होतो.

४) पर्यावरणाची गुणवत्ता

यामध्ये हवा प्रदूषण व त्यामुळे होणारे मृत्यू, सांडपाणी व्यवस्थापन व हरितवायू उत्सर्जन इत्यादी घटकांचा समावेश होतो.

क) संधी:

सामाजिक प्रगती मापनातील हा एक प्रमुख घटक असून यामध्ये पुढील उपघटकांचा समावेश होतो.

१.व्यक्तिगत हक्क

यामध्ये राजकीय हक्क, खाजगी मालमत्ता हक्क, बोलण्याचे स्वातंत्र्य, चळवळीचे स्वातंत्र्य व समुह स्वातंत्र्य इत्यादी घटकांचा समावेश होतो.

२.व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि निवड

यामध्ये आयुष्य जगण्याची निवड, धर्माचे स्वातंत्र्य, विवाह व भ्रष्टाचार इत्यादी घटकांचा समावेश होतो.

३.सहिष्णुता व समावेशन

यामध्ये परकीय नागरिक व समलैंगिकता याबाबतची सहिष्णूता, अल्पसंख्याक विरोधी

असणारा भेद, धार्मिक सहिष्णूता आणि सामाजिक सुरक्षा इत्यादी घटकांचा समावेश होतो.

४. प्रगत शिक्षणाची उपलब्धता

यामध्ये प्रादेशिक शिक्षणामधील काळ, महिलांचे सरासरी शिक्षण, शिक्षणातील असमानता, जागतिक क्रमवारीतील विद्यापीठ तसेच प्रादेशिक विद्यार्थ्यांचे जागतिक शिक्षण संस्थामधील गुणोत्तर इत्यादी घटकांचा समावेश होतो.

या घटकांच्या प्रगतीवरून सामाजिक प्रगतीचा निर्देशांक पुढील सुत्राच्या सहाय्याने काढला जातो.

$$SPI = 1/3\sum_{\text{Dimension} \in \text{Dimensions}}^{1/4} (\Sigma\,\text{Component})$$

## भारताच्या सामाजिक प्रगती निर्देशांकाची सद्य:स्थिती:

प्रा. अमर्त्य सेन आणि जीन ड्रेझ यांनी लिहिलेल्या *An Uncertain Glory-India & Its contradiction* या पुस्तकात भारताच्या गेल्या २० वर्षातील आर्थिक प्रगतीचा आढावा घेताना *सामाजिक प्रगतीत भारत* किती मागास राहिलेला आहे याबाबतचा जो विरोधाभास रेखाटला आहे, तो देशातील उपेक्षित व वंचितांचा विकास करण्यासाठी किती मोठी मजल मारावयाची आहे यावर भाष्य करतो. गेल्या २०वर्षात भारताने चीनच्या बरोबरीने आर्थिक वृध्दीचा प्रयत्न केला व त्यामध्ये बऱ्याच प्रमाणात यशही मिळविले. पण या विकासाचा लाभ समाजातील उपेक्षित घटकांना अतिशय नगण्य प्रमाणात झालेला दिसून येतो. प्रा.अमर्त्य सेन यांच्या मते उच्च दराने होणाऱ्या आर्थिक प्रगतीचा जनतेच्या जीवनमानाच्या दर्जावर व स्वातंत्र्यावर सकारात्मक परिणाम झाला नाही तर ती प्रगती अर्थहिन ठरते. याचाच अर्थ स्वातंत्र्य चळवळी दरम्यान विकास आणि समतेच्या तत्वावर भर दिला गेला. पण गेल्या ६८ वर्षात देशाला याबाबत अपयश आले आहे. एका बाजूला संपत्तीच्या विषम वितरणाकडे दुर्लक्ष केले तर दुसऱ्या बाजूला नव्याने निर्माण झालेल्या पायाभूत संरचनेचा योग्य विनियोग करून उपेक्षित व वंचितांचे सक्षमीकरण करण्यास प्रशासकीय यंत्रणा कमी पडत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सर्वप्रथम सामाजिक कल्याणाची उत्क्रांती, सामाजिक प्रगती, सामाजिक विकास व वृध्दी व सामाजिक न्याय या विविध टप्प्यांतून नेण्याचा प्रयत्न झाला. पण दुर्दैवाने त्यामागे आवश्यक ती बांधिलकी व प्रतिसाद न मिळाल्याने या क्षेत्रात फारशी प्रगती झाली नाही. गेल्या काही दशकांचा विचार करता भारताची अर्थव्यवस्था जगात चांगल्या क्रमांकावर असूनही विविध सामाजिक प्रगती निर्देशांकामध्ये मात्र भारताचा क्रमांक जगातील शेवटच्या दहा वीस देशांमध्ये लागतो. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (UNDP)२४ जुलै २०१४ रोजी प्रस्तूत केलेल्या मानव विकास अहवालात असे म्हटले आहे की, दलित, आदिवासी, महिला व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा असुरक्षित आघातग्रस्त मानव समुह म्हणून विचार केला जावा. याच अनुषंगाने भारतातील स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा विचार करता आजही स्त्रियांच्या एकूणच आचार, विचार आणि संचार स्वातंत्र्यास नियंत्रित करून जात आणि पितृ सत्तेने आपले हितसंबंध संरक्षित केले आहेत. जगाच्या तुलनेत भारतातील दलित आणि

आदिवासींचा मानव विकास निर्देशांक जर पडताळून पाहिला तर तो भारताच्या विद्यमान स्वरूपाच्या सामाजिक आर्थिक विषमतेवर प्रकाश पाडतो.

भारताची सामाजिक प्रगती ही जगातील इतर देशांच्या तुलनेत कशी आहे हे तक्ता क्र.२ वरून स्पष्ट होते.

तक्ता क्र.२

सामाजिक प्रगतीचा निर्देशांक-२०१६

| अ. क्र. | देश | सामाजिक प्रगतीचा निर्देशांक-२०१६ |
|---|---|---|
| १ | फिनलँड | ९०.०९ |
| १० | न्युझिलंड | ८८.४५ |
| १५ | जर्मनी | ८६.४२ |
| १९ | अमेरिका | ८४.६२ |
| ४० | मॉरिशस | ७३.२४ |
| ४६ | ब्राझील | ७१.२० |
| ५९ | द.आफ्रिका | ६७.६० |
| ७५ | रशिया | ६४.१९ |
| ८३ | श्रीलंका | ६२.२१ |
| ८४ | चीन | ६२.०१ |
| ९५ | नेपाळ | ५७.४० |
| ९८ | भारत | ५३.९२ |
| १०४ | इराक | ५२.२८ |
| ११४ | झिम्बॉब्वे | ४९.११ |
| १३३ | मध्य अफ्रिकन-रिपब्लिक | ३०.०३ |

तक्ता क्र.२ मध्ये जगातील सामाजिक प्रगतीच्या निर्देशांकामध्ये २०१६ मध्ये फिनलँडचा पहिला क्रमांक दिसून येतो. ज्याच्या सामाजिक प्रगतीचा निर्देशांक ९०.०९ इतकाआहे. या उलट सर्वात शेवटी १३३ क्रमांकावर मध्य आफ्रिकन रिपब्लिक देशाचा समावेश होतो. ज्याचा निर्देशांक केवळ ३०.०३ इतका असल्याचे दिसते. भारताचा विचार करता सामाजिक प्रगतीच्या निर्देशांकात १३३ देशांमध्ये भारताचा ९८वा क्रमांक लागतो व त्याचा निर्देशांक ५३.९२ इतका आहे. श्रीलंका, नेपाळ, चीन या देशांपेक्षा तसेच ब्रिक्स देशांपेक्षाही भारताचा सामाजिक निर्देशांक कमी असल्याचे दिसून येते.

भारत हा लोकसंख्येने जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश असून बहुविध जाती, धर्म व प्रदेशांनी संपन्न असणारा देश आहे. साहजिकच अशा देशामध्ये मोठ्या प्रमाणावर सामाजिक प्रगती अगदी कमी कालावधीत घडून येईल असे अपेक्षिने योग्य नाही. असे असले तरी अलिकडील काळात भारतात झालेल्या आर्थिक उदारीकरणाने बराच सकारात्मक बदल झालेला आहे. अपेक्षित प्रमाणात विषमता कमी झाली नसली तरी ध्रुवीकरणाच्या दुसऱ्या टोकाकडील लोकांच्या जीवनमानात निश्चित सुधारणा झालेली आहे. आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेनंतर गेल्या काही वर्षात देशाच्या शहरी व ग्रामीण भागाचा झपाट्याने बदल होऊ लागला आहे. प्रामुख्याने शहरातील मध्यमवर्गीय तसेच ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होत आहे. असे असले तरी सामाजिक पातळीवर अजूनही बरेच काम करावे लागणार आहे. विशेषत: उपेक्षित व दुर्लक्षित घटकांना मिळणाऱ्या संधीबाबत, त्यांच्या वैयक्तिक हक्क व्यक्तिगत स्वातंत्र्य सामाजिक सहिष्णूता व प्रगत शिक्षणाची उपलब्धता इत्यादीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.

तक्ता क्र.३:भारताच्या सामाजिक प्रगतीचे निर्देशांक

| वर्ष | सहभागी देश | भारताचा क्रमांक | सामाजिक प्रगतीचा निर्देशांक | प्राथमिक मानवी गरजा | सामाजिक कल्याण | संधी | जी.डी.पी. दरडोई उत्पन्न ($) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३ | ५० | ४३ | ३९.५१ | ४१ | ४४ | ४५ | ३६२७ |
| २०१४ | १३२ | १०२ | ५०.२४ | ५६.५९ | ५२.६७ | ४१.४७ | ३३४१ |
| २०१५ | १३४ | १०१ | ५३.०६ | ५८.८७ | ५७.३८ | ४२.९३ | ५२३८ |
| २०१६ | १३३ | ९८ | ५३.९२ | ६४.६६ | ५८.५९ | ३८.५१ | ५४३९ |

*स्रोत: सामाजिक प्रगती निर्देशांक अहवाल २०१३-२०१६*

तक्ता क्र.३ नुसार २०१३ ते २०१६ या कालावधीत भारताचा संधी निर्देशांक ४५ इतका होता, त्यामध्ये घट होऊन २०१६ मध्ये तो ३८.५१ इतका झाला.

सामाजिक प्रगतीच्या निर्देशांकांमध्ये सातत्याने सुधारणा होत असल्याचे दिसून येते. २०१३ मध्ये या निर्देशांकात ५० देश सहभागी झाले होते. त्यामध्ये भारताचा क्रमांक ४३ इतका होता. २०१६ मध्ये १३३ देशांमध्ये ९८ इतका क्रमांक आला. याचाच अर्थ प्राथमिक मानवी गरजा व कल्याण यांसारख्या सुविधांमध्ये सुधारणा व वृध्दी होताना दिसून येते.

**निष्कर्ष:**

सामाजिक प्रगतीचा निर्देशांक ही संकल्पना अभ्यासताना भारताच्या संदर्भात पुढील निष्कर्ष दिसून येतात.

१. २०१६ च्या नुसार, सामाजिक प्रगतीबाबत जागतिक क्रमवारीत १३३ देशांमध्ये भारताचा ९८ वर क्रमांक लागतो.

२. अर्थातच इतर देशांच्या तुलनेत भारतातील सामाजिक प्रगती अल्प असल्याचे तो दर्शवितो.

३.सार्क समूहातील नेपाल व श्रीलंका या देशांपेक्षा भारताचा सामाजिक प्रगती निर्देशांक कमी असल्याचे दिसून येते.

४.ब्रिक्स समूहातील देशांपेक्षा भारताचा सामाजिक प्रगतीचा निर्देशांक देखील कमी असल्याचे दिसून येते.

५.भारताच्या २०१३ ते २०१६ या कालावधीत सामाजिक प्रगतीच्या निर्देशांकात सुधारणा झाल्याचे दिसून येते. २०१३ मध्ये हा निर्देशांक ३९.५१ इतका होता त्यात वाढ होऊन २०१६ मध्ये तो ५३.९२ इतका झाला.

६.२०१३ मध्ये जागतिक क्रमवारीत ४२ क्रमांकावर असणारा भारत २०१६ मध्ये सुधारणा होऊन ९८ क्रमांकावर आला.

७.भारतात प्राथमिक गरजांच्या पुर्ततेमध्ये २०१३ मध्ये सामाजिक निर्देशांक ४१ इतका होता त्यात सुधारणा होऊन २०१६ मध्ये तो ६४.६६ इतका झाला.

८.सामाजिक कल्याणाबाबत २०१३ मध्ये ४४ इतका असणाऱ्या सामाजिक निर्देशांकात सुधारणा होऊन २०१६ मध्ये तो ५८.५९ इतका वाढला.

९.सामाजिक संधी बाबत २०१३ मध्ये भारताचा सामाजिक प्रगती निर्देशांक ४५ इतका होता,

त्यामध्ये घट होऊन २०१६ मध्ये तो ३८.५१ इतका झाला.


## संदर्भसूची:

१. अट्टावरकर एस.एच., जानेवारी २०१४, *भारतीय अर्थव्यवस्था*, सेठ प्रकाशन मुंबई.

२. पाटील आनंद, जुलै २०१३, *भारतातील सर्वसमावेशक विकासाची वस्तुस्थिती*, राज्यसेवा परीक्षा.

३. *Economic Survey of India*-2015

४. http://aajavhasudharak.in/2015

५. http://en.wikipedia.org/wiki/list of countries.

६. http://www.thehindu.com.

७. http://www.vikaspedia.in/health.


## सुलभा ब्रह्मे यांना भावपूर्ण श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सभासद, ज्येष्ठ मार्क्सवादी विचारवंत, अर्थतज्ज्ञ, समाजसेविका, लोकायत चळवळीच्या संस्थापक सुलभा ब्रह्मे यांचे १ डिसेंबर २०१६ रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या.

सुलभाताईंचे शालेय शिक्षण हुजुरपागा शाळेत झाले तर परशुरामभाऊ महाविद्यालयातून त्यांनी बी.ए.ची पदवी प्राप्त केली. गोखले अर्थ व राज्यशास्त्र संस्थेतून कापड उद्योगावर पीएच्.डी. संपादित केली. गोखले अर्थशास्त्र संस्थेत त्यांनी दीर्घकाळ अध्ययनही केले. त्यांची राहणी अतिशय साधी होती व घरी सतत कार्यकर्त्यांचा राबता असायचा. प्रारंभीपासूनच त्या डाव्या विचारसरणीशी जोडल्या गेल्या होत्या. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या त्या विरोधक होत्या. व्यापार धोरण, सेझ, अणुउर्जा विरोधातील लोक चळवळीत त्यांचा सक्रीय सहभाग होता. नोटबंदीच्या जनतेवरील घातक परिणामाबद्दलचा त्यांचा लेखही नुकताच प्रसिध्द झाला होता. मराठवाड्याचा विभागीय विकास आराखडा, पश्चिम महाराष्ट्रातील जमीन वापर हे त्यांचे जिव्हाळ्याचे अभ्यासविषय होते. गोवंश हत्याबंदीचा आर्थिक आणि सामाजिक दुष्परिणाम वर्णन करणारी त्यांची पुस्तिका संपूर्ण भारतभर चर्चेचा विषय ठरली होती. लोकविज्ञान संघटनेच्या संस्थापक सदस्य म्हणून गेली ३६ वर्षे त्या कार्यरत होत्या. पुरोगामी महिला संघटना, बायजा ट्रस्ट आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या त्या प्रमुख आधार होत्या. आर्थिक, सामाजिक व राजकिय विषयांवरचे त्यांचे असंख्य लेख व ५० पेक्षा जास्त पुस्तिका प्रसिध्द आहेत. बँक ऑफ महाराष्ट्रच्या संचालक मंडळावरही त्यांनी काम केले होते. सुप्रसिध्द अर्थतज्ज्ञ आणि भारताच्या नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष डॉ.धनंजयराव गाडगीळ यांच्या त्या कन्या तर ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ.माधव गाडगीळ यांच्या त्या भगिनी होत. डॉ.ब्रह्मे आपल्या विविध आंदोलनातून शेवटपर्यंत कार्यरत होत्या. अत्यंत उत्साही व हसतमुख चेहरा, बोलकेपणा, समोरच्याचे बोलणे शांतपणे ऐकून घेण्याची वृत्ती अशा या त्यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाला मराठी अर्थशास्त्र परिषदची भावपूर्ण श्रध्दांजली.

प्रा.चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष.

अर्थसंवाद

# ग्रीन बँकिंग अर्थात् पर्यावरणपूरक अधिकोषण संकल्पना व उपयोजन

युगंधरा शैलेंद्र टोपरे, औरंगाबाद,
अर्थशास्त्र विभाग,
शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९८५०६८३७३९

प्रस्तावना:

आर्थिक वृद्धीसाठी होणाऱ्या अनिर्बंध औद्योगिक वाढीमुळे पृथ्वीवरील सर्वच देशांना पर्यावरणाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. वैश्विक तापमान वाढ, हवामानात होणारे बदल आणि पर्यायाने पृथ्वीवरील पर्यावरणाचे नुकसान विचारात घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर याबाबत १९९२ नंतर उपाययोजनात्मक हालचाली सुरु झाल्या. १९९७ मध्ये जपानमधील क्योटो शहरात पार पडलेल्या राष्ट्रसंघाच्या हवामानबदल विषयक बैठकीत हवामान बदलाच्या कारणांवर चर्चा करण्यात आली. हवामान बदलाला कारणीभूत असणारे कर्बवायू उत्सर्जन हे प्रामुख्याने विकसित आणि औद्योगिकीकरण झालेल्या देशांकडून मोठ्या प्रमाणावर झाले असून या उत्सर्जनावर टप्प्या-टप्प्याने निर्बंध लादले गेले पाहिजेत हा विचार या बैठकीतून पुढे आला. गेल्या दीडशे वर्षांपासून सुरू असलेल्या औद्योगिक प्रक्रियेमुळे वातावरणात वाढलेले हरितगृह वायू (GHG - ग्रीन हाऊस गॅसेस) उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्व सदस्य राष्ट्रांनी बांधीलकी जपणं आवश्यक असल्याचं या बैठकीत ठरलं आणि काही विशिष्ट नियमावली आखण्यात आली. यालाच 'क्योटो प्रोटोकॉल' अर्थात् 'क्योटो नियमावली' म्हणतात.

याबाबतचा करार २००५ मध्ये प्रत्यक्षात आला. करारानुसार कर्बवायू उत्सर्जनाची पातळी प्रत्येक देशाने निर्धारित करावी आणि देशांतर्गत पातळीवर त्यासाठी तरतूद करावी असे ठरले. सध्या १९२ देश या करारात सहभागी झाले असून या संदर्भातील बांधीलकी जपण्याचा पहिला टप्पा २००८ मध्ये सुरु झाला आणि २०१२ मध्ये संपला. २०१२ मध्ये दोहा या ठिकाणी क्योटो

नियमावलीत काही घटनात्मक बदल केले गेले. पर्यावरणातील कर्बवायू उत्सर्जन कमी करण्यासाठी स्वच्छ विकास प्रणाली (Clean Development Mechanism) विकसित करावी आणि किती टन कर्बवायू उत्सर्जित होत आहे याचे मापन करावे असे ठरले. ही प्रणाली विकसित करत असतांना अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांचा विचार करण्यात आला. कर्बवायू उत्सर्जन उद्योगधंद्यांकडून मोठ्याप्रमाणावर होते. मात्र वित्तीय क्षेत्रातून याबाबत काही उपाययोजना केल्यास पर्यावरणपूरक बाबींना चालना मिळेल. वित्तीय संस्था आणि बँकानीही यासाठी मुख्य भूमिका पार पाडावी अशी चर्चा या संदर्भात झालेल्या बैठकी अंतर्गत करण्यात आली.


वित्तीय संस्था आणि बँकांनी वापरण्याच्या पर्यावरणपूरक सवयींतूनच 'ग्रीन बँकिंग' ही संकल्पना पुढे आली. याच पार्श्वभूमीवर 'ग्रीन इनव्हेस्टमेंट' अर्थात् पर्यावरणपूरक गुंतवणूक, 'ग्रीन लोन' अर्थात् 'पर्यावरणपूरक कर्ज' इ. संकल्पना विकसित देशांमध्ये रुढ होत आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात 'ग्रीन बँकिंग' हाच इंग्रजी शब्द सर्वत्र वापरण्यात आला आहे. कारण ती पर्यावरणपूरक अधिकोषणाशी संबंधित सर्वसमावेशक संकल्पना आहे. या संकल्पनेचा सांगोपांग विचार आणि भारतात त्याच्या उपयोजनाची व्याप्ती शोधण्याचा प्रयत्न शोधनिबंध लेखकाने केला आहे.

अ) काय आहे ग्रीन बँकिंग?

विविध बँका ग्राहकांना अनेक प्रकारच्या सेवा पुरवतात. नफा मिळवणे हा त्यामागील एक मुख्य हेतू असतो. मात्र याच बँका पर्यावरणाची काळजी घेण्याच्या उद्देश्याने विविध उपाययोजना करतात किंवा त्या उद्देश्याने बँक व्यवहाराचे नियम बनवतात तेव्हा त्यांना 'पर्यावरणपूरक बँक' अर्थात् 'ग्रीन बँक' म्हटले जाते. डिसेंबर २०१५ मध्ये पॅरिस येथे पार पडलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवामान बदल विषयक सभेत (UNFCC) पुन्हा एकदा वित्तीय क्षेत्राची याबद्दलची भूमिका स्पष्ट करण्यात आली. ग्रीन बँकेलाच 'कल्याणकारी बँक', 'सामाजिक बँक', 'नीतीमत्तापूर्ण बँक' असे विविध पर्यायी शब्द वेगवेगळ्या देशांमध्ये वापरले जातात. ग्रीन बँक ही इतर व्यापारी बँकेसारखीच असते. त्यासाठी बँकेची वेगळी शाखा नसते. मात्र अशी बँक रोजचे व्यवहार करतांना, विविध प्रकल्प राबवतांना किंवा त्यांना मंजुरी देतांना पर्यावरणाची हानी होणार नाही अशा प्रकारची काळजी घेत गेल्या दहा ते पंधरा वर्षात विकसित देशांत ही संकल्पना रुढ होत गेली. आज आशियाई देशांमध्ये देखील अनेक राष्ट्रीयीकृत किंवा खाजगी बँका देखील पर्यावरणपूरक पावले उचलतांना दिसत आहेत. बांग्लादेशाच्या मध्यवर्ती बँकेने याबाबत पुढाकार घेऊन एक आराखडा तयार केला आहे. ज्यामध्ये समाजातील विविध भागीदार (Stakeholders) सहभागी झाले आहेत. त्या अनुषंगाने बँकेने पर्यावरणपूरक उत्पादने (Green Products) वित्तीय बाजारात आणली आहेत.

माणसाच्या राक्षसी महत्वाकांक्षेने आणि आर्थिक वृद्धीच्या आकड्यांवर आधारित प्रतिमानांनी पर्यावरणाचा ऱ्हास करतच आर्थिक वृद्धी साधल्याचे निष्कर्ष विविध संशोधनातून पुढे आले आहेत. जैवविविधतेला निर्माण झालेला धोका आणि पंचमहाभूतांच्या (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) अस्तित्वात मानवाचा अतिरेकी




हस्तक्षेप यांवर पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्तर शोधण्याचा प्रयत्न ग्रीन बँक करते. वरील आकृतीवरुन ग्रीन बँकेचा संकल्पनात्मक आराखडा स्पष्ट होण्यास मदत होईल.

अधिकाधिक रोखरहित (cashless) व्यवहारातून रोख पैशाची गरज कमी होऊन नोटांचा कागद छापण्यासाठी लागणारी वृक्षतोड ही कमी होऊ शकेल. ग्रीन बँकेत खातेधारकांनी इंटरनेट बँकिंग किंवा मोबाईल बँकिंग सेवेचा अधिक वापर केल्यास कमी वेळेत, कमी मनुष्यबळात अधिक व्यवहारांना चालना मिळेल. यासोबतच प्रत्येक वेळेस बँक ग्राहकांनी घरापासून निघून बँकेपर्यंत जाण्यासाठी वाहन वापरल्याने निर्माण होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण ही घटेल. रोजच्या व्यवहारातून आणि यंत्रसामुग्रीच्या वापरातून होणारे कर्बउत्सर्जन रोखणे हा देखील ग्रीन बँकेचा प्रमुख उद्देश आहे.

ग्रीन बँक ही ग्राहकांमध्ये पर्यावरणपूरक सवयी निर्माण होण्यासाठी मदत करत असते. उदा. गृहकर्ज मंजूर करतांना जलसंवर्धनासाठी काय उपाय योजला आहे हे बँकेने बघणे आवश्यक आहे. औद्योगिक प्रकल्पांना मंजुरी देतांना सौर ऊर्जा किंवा पवन ऊर्जा यासारख्या अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या वापरासाठी चालना देणे किंवा अशी ऊर्जा निर्माण करणाऱ्या खाजगी प्रकल्पांना सवलतीच्या दरात कर्ज देणे इ. चा विचार ग्रीन बँक करते.

व्यापाऱ्यांना प्रत्येक वेळेस रोखीचे व्यवहार करावयास लागू नये म्हणून 'ग्रीन चॅनल काउंटर' वापरणे. ग्रीन बँकेसंदर्भात विकसित देशांत मोठ्या प्रमाणावर संशोधन होत असून भारताने देखील रिझर्व्ह बँकेंच्या दिशादर्शक धोरणाद्वारे ग्रीन बँकेसाठी बँकांनी पावले उचलावीत असे स्पष्ट केले आहे. चिरस्थायी किंवा शाश्वत वित्त (sus-

tainable finance) निर्माण करण्यासाठी बँकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन भारतीय मध्यवर्ती बँकेने केले आहे.

ब) ग्रीन बँकेसंदर्भातील संशोधन व निष्कर्षांचा थोडक्यात आढावा:

ए. एन. सरकार यांनी 'ग्रीन बँकिंग' (२०१४) नावाच्या पुस्तकात पर्यावरणपूरक आर्थिक वृद्धीत ग्रीन बँकेची भूमिका स्पष्ट केली असून, कमी कर्बवायू उत्सर्जित करणारी अर्थव्यवस्था या बँकेमुळे निर्माण होऊ शकते हे स्पष्ट केले आहे.

प्रकाश साहा यांनी त्यांच्या संशोधनपर निबंधात बांग्लादेशात असणारी ग्रीन बँकिंग पद्धती, उत्पादने आणि भागधारकांची भूमिका सविस्तर मांडली आहे.

मो.मसुकूज्जमान आणि अक्तर यांनी Green Banking in Bangladesh : A commitment towards the global initiatives या संशोधनलेखात बांग्लादेशाच्या मध्यवर्ती बँकेने आणि इतर बँकांनी ग्रीन बँकेसाठी उचललेल्या पावलांचा आढावा घेतला आहे.

साहू आणि नायक (२००८) यांनी भारतातील ग्रीन बँकिंग स्पष्ट करतांना उद्योगधंदे आणि वित्तीय क्षेत्र या दोन्हींसाठी ते पूरक आहे असे स्पष्ट करून गुंतवणूकविषयक प्रकल्पांमध्ये ग्रीन बँकेंचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

बेनेडिक्टर रोनाल्ड (२०११) यांनी सोशल बँकिंग अँण्ड सोशल फायनान्स या पुस्तकात ग्रीन बँकेला 'सामाजिक अधिकोषण' संबोधले आहे.

पर्यावरणाचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने होण्यासाठी ग्रीन बँक महत्वाची असल्याचा निष्कर्ष सिंग (२०१५) यांनी भारतातील व्यापारी बँकांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून मांडला आहे.

या व्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेले विविध ग्रीन बँकांचे अभ्यास ग्रीन बँकेची संकल्पना आणि महत्त्व स्पष्ट करतात. ग्रीन बँक म्हणजे केवळ ATM यंत्रांचा वापर किंवा इंटरनेट बँकिंग नाही तर पर्यावरणपूरक वित्तीय सवयी ग्राहकांना लागाव्यात यासाठीची ती उपाययोजना आहे असे मत विविध अभ्यास नोंदवतात.

क) ग्रीन बँकेशी संबंधित विविध उत्पादन् माध्यमे:

ATM मशीनचा वापर, इंटरनेट व मोबाईलचा बँक व्यवहारांसाठी होणारा वापर ही मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी पर्यावरणपूरक उत्पादने आहेत.

१) ऑनलाईन वापर: विविध वित्तीय व्यवहार उदा. बीले देणे, ठेवी जमा करणे, पैसे हस्तांतरित करणे इ. साठी ऑनलाईन माध्यमांच्या वापरामुळे वेळेची, ऊर्जेची व कागदाची बचत होईल. नैसर्गिक साधनसामुग्रीचा ऱ्हास कमी होईल.

२) पर्यावरणपूरक कर्जे (Green loans) :- भारतातील अपारंपरिक ऊर्जा विभागाने काही राष्ट्रीयीकृत आणि सूचित बँकांसोबत पुढाकार घेऊन घर बांधतांना पर्यावरणपूरक साधने वापरणाऱ्या ग्राहकांसाठी व्याजदरात सवलत द्यावी असे ठरवले आहे. यालाच पर्यावरणपूरक कर्जे म्हणतात. उदा. सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे विकत घेऊन घरात लावणे.

भारतीय पर्यावरणपूरक वास्तू परिषदे (Indian Green Building Council) मार्फत

मान्यता असलेल्या गृहप्रकल्पांना संबंधित बँक व्याजदरात आणि कर्जप्रक्रिया शुल्कात सवलत देते.

३) ऊर्जेची बचत करणाऱ्या उत्पादनांचा वापर व प्रचार: सौर ऊर्जेवर किंवा पवन ऊर्जेवर चालणारी उत्पादने तयार करणाऱ्या किंवा त्याचे विपणन करणाऱ्या उद्योगांना बँका उद्योगविषयक कर्जात सवलत देतात. जास्तीत जास्त ऊर्जेची बचत करणाऱ्या सीएफएल दिव्यांची उत्पादने करणारे उद्योग इत्यादींनाही या सवलती मिळत आहेत. भारतात HDFC, येस बँक, ICICI इ. खाजगी बँका अशाप्रकारे पर्यावरणासाठी पुढाकार घेत आहेत. राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाने यासाठी मोठ्या प्रमाणावर उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.

४) पर्यावरणपूरक विमा (Green Insurance) विकसित देशांमध्ये अशा प्रकारचा विमा हळुहळू प्रसिद्ध होत आहे. भारतात मात्र याबाबत खूपशी जागरुकता निर्माण झालेली नाही. उदा. वाहनांतून होणारे कर्बवायू उत्सर्जन व त्यानुसार मिळणारा विम्याचा फायदा, स्वच्छ ऊर्जा निर्मिती प्रकल्पांसाठी विम्याची विशेष सवलत. कर्बवायू उत्सर्जनाच्या प्रमाणाशी संबंधित विमा हा प्रामुख्याने युरोपिअन व जपानी बँकेत मोठ्या प्रमाणावर वापरला जात आहे.

ड) सामाजिक उत्तरदायित्व आणि ग्रीन बँक:

पर्यावरणाची हानी टाळून पर्यावरणपूरक सवयी रुजवण्यास चालणा देणे ही देखील वित्तीय संस्थांची सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळेच सामाजिक उत्तरदायित्व म्हणून ही विकसित देशांप्रमाणेच भारतीय खाजगी बँकांनी ही पर्यावरणविषयक जागरुकता व वित्तीय सवयी ग्राहकांमध्ये निर्माण होण्यासाठी पावले उचलली आहेत. या अर्थाने ग्रीन बँक किंवा पर्यावरणपूरक बँका आपले सामाजिक उत्तरदायित्व (Social Responsibility) पार पाडत आहेत.

व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (CSR - Corporate Social Responsibility) हा असा उद्योगविषयक दृष्टीकोन आहे ज्याद्वारे विविध उद्योग शाश्वत विकासासाठी आणि सामाजिक कल्याणासाठी सामाजिक जबाबदारी पार पाडतात. बँकादेखील अशा प्रकारची जबाबदारी पार पाडण्याचे काम करत आहेत. त्यामुळेच पर्यावरणपूरक बँका हा बँक व्यवसायाच्या सामाजिक जबाबदारीचाही भाग आहे.

इ) भारताच्या संदर्भात ग्रीन बँकेचे धोरण आणि उपयोजन:

भारतातील बँकांनी पर्यावरणपूरक अधिकोषण पद्धती वापरण्यासाठी भारतीय वित्त मंत्रालयाने जुलै २०१२ मध्येच निर्देश जारी केले आहेत. यानुसार बँकांनी देयके इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून हस्तांतरीत करावीत, समूह बँकिंग (Core Banking) पद्धतीचा अवलंब करावा. तसेच विविध योजनांचे होणारे लाभ, अनुदाने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून हस्तांतरीत करावीत अशा सूचना या द्वारे बँकांना देण्यात आल्या आहेत. यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देखील अधिकाधिक आर्थिक व्यवहार हे रोखीने न करता इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करण्याचे निर्देश दिले आहेत.

रिझर्व्ह बँकेचे तत्कालिन डेप्युटी गव्हर्नर

डॉ. के. सी. चक्रवर्ती यांनी 'पर्यावरणीय आणि सामाजिक शाश्वतता मुख्य प्रश्न आणि कारणे' या विषयांवरील त्यांच्या व्याख्यानात (एप्रिल २०१३) ग्रीन बँकिंग ही शाश्वत बँकिंग पद्धत असल्याचं स्पष्ट केलं. बँका कर्जाद्वारे जो पैसा बाजारात वितरीत करतात. तो पैसा पर्यावरणास पूरक अशा प्रकल्पांसाठी किंवा उत्पादनांसाठी वापरला जात आहे किंवा नाही हे पहाणं ही बँकेची सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळेच पर्यावरणपूरक बँका महत्त्वाच्या ठरतात. बँकांची व्यावसायिक व्यवहार्यता ही पर्यावरणीय व्यवहार्यतेपेक्षा वेगळी नसून एकच आहे.

भारतात या संदर्भात खाजगी बँकांनी अधिक पुढाकार घेतला असून स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेने देखील मोठ्या प्रमाणावर काम हाती घेतले आहे. मात्र धोरणात्मक बाबींचा विचार केल्यास भारतीय बँकांनी व्यवहाराचे माध्यम, रोखरहित व्यवहार यावरच जास्त प्रकाश टाकल्याचे दिसून येते.

फ) भारतातील ग्रीन बँकिंग:

भारतात खालील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने केलेले कार्य ग्रीन बँकिंगची भारतातील व्याप्ती स्पष्ट करते.

१. स्टेट बँक ऑफ इंडिया: ने सर्व शाखांमध्ये हरित चॅनेल काऊंटर सुरु केले आहेत. ज्याद्वारे रोखरहित व्यवहार सोपे जातात. स्टेट बँक ऑफ इंडिया ने पवन ऊर्जा आणि सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांमध्ये सुझलॉन ऊर्जा कंपनीला सहकार्य केले आहे. ज्या द्वारे गुजरात, महाराष्ट्र आणि तामिळनाडू राज्यांत मोठ्या प्रमाणावर पवनचक्क्या उभारण्यात आल्या आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया ने स्पॅनिश सौर ऊर्जा उद्योगाशी करार केला आहे. ज्यामुळे मोठे सौर ऊर्जा प्रकल्प भारतात राबवले जातील.

२. पंजाब नॅशनल बँक: पंजाब नॅशनल बँकेने देखील पवनऊर्जा क्षेत्रात प्रकल्पांना सहकार्य केले असून ३०० पेक्षा अधिक संख्येने वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतले आहेत.

३. बँक ऑफ बडोदा आणि कॅनरा बँक - यांनी देखील ATM मशिनचे जाळे विस्तारित केले असून कियॉस्क यंत्रांचाही वापर मोठ्या प्रमाणावर वाढवला आहे. कियॉस्क यंत्र सर्व प्रकारच्या मोबदल्याच्या व्यवहारांसाठी उपयोगी आहे.

भारतातील खाजगी बँकांमध्ये प्रामुख्याने ICICI, HDFC, ॲक्सिस बँक, येस बँक आणि कोटक महिन्द्रा या बँकानी खालील पर्यावरणपूरक पावले उचलली असल्याचे त्यांच्या वार्षिक अहवालातून स्पष्ट होते.

१. ICICI बँकेने इन्स्टा बँकिंग, कमी प्रदूषण करणाऱ्या वाहनांसाठी स्वस्त कर्ज, स्वस्त गृह कर्ज यांसारख्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थांशी पर्यावरणविषयक उपक्रमांसाठी भागीदारी केली आहे.
२. HDFC बँकेने बिहार राज्यात एकूण २० ठिकाणी सौर ऊर्जेवर चालणारी ATM यंत्रे बसवली आहेत. या शिवाय कचरा व्यवस्थापन प्रकल्पांमध्ये ही भागीदारी केली आहे.
३. ॲक्सिस बँकेने ATM यंत्रांचे जाळे भारतातील सर्वच शहरांमध्ये वाढवले असून तामिळनाडू राज्यात सौर ऊर्जेवर चालणारी ATM यंत्रे बसवली आहेत.
४. कोटक महिंद्रा या बँकेने 'सामाजिक व

पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा' तयार केला असून पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन आणि जलसंधारण विषयक प्रकल्पांतूनही सहभाग घेतला आहे.

५. येस बँकेने अपारंपरिक ऊर्जा क्षेत्राच्या विस्तारासाठी वित्तपुरवठ्याचे लक्ष निर्धारित केले असून त्यानुसार २०२० पर्यंत या क्षेत्रात गुंतवणूक व वित्त पुरवठा बँके मार्फत केला जाईल अशी आखणी केली आहे.

**समारोप:**

ग्रीन बँकिंग संकल्पना विकसित देशांत मोठ्या प्रमाणावर रुजत आहे. कर्बवायू उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्याचे बंधन ही विकसित देशांवर आहे. त्यामुळे पर्यावरणाशी मैत्री साधणारी अनेक वित्तीय उत्पादने विकसित देशांच्या बाजारपेठेत आहेत. भारताची कर्बवायू उत्सर्जनाची पातळी विकसित देशांच्या तुलनेत कमी असली तरीही भारतातील वित्तीय संस्थांनी या संदर्भात पावले उचलणे गरजेचे आहे. भारतात प्रामुख्याने रोख रहित व्यवहार आणि ATM व इंटरनेट बँक व्यवहारांचा वापर शहरांत मोठ्या प्रमाणावर होत आहे. भारताच्या संदर्भात असे म्हटले जाते की इथे वित्तीय समावेशन पातळी हीच ६०% आहे. याचा अर्थ ४०% लोकसंख्या वित्तीय व्यवहारांमध्ये नाही. अशा ठिकाणी ग्रीन बँकिंग ही फार पुढची अवस्था आहे. मात्र बँकांचा पैसा पर्यावरणाशी मैत्री साधणाऱ्या गुंतवणूक प्रकल्पात होणं ही गरज निश्चितच आहे. हे सामाजिक भान असणाऱ्या वित्तीय संस्थामुळेच भारताला शाश्वत विकासाकडे वाटचाल करता येईल.

References :


1) *Quarterly review report on Green Bankig activities and Green Refinance activities of Bangladesh banks.* July Sept. 2015 (www. bb. org.bd)
2) *Green banking* by A.N. Sarkar, Atlantic Publication, New Delhi 2014
3) *Developing Green Banking products in Bangladesh.* Involvement of stakeholders. Research paper by Prakash Saha (www.GRIN.com)
4) *Greening India's Financial Market : opportunities for a Green Bank in India*, August 2016. A report by Natural Resources Defence Council, (www.hrdc.org)
5) An article by Md. Masukujjaman & S. Aktar on *Green Banking in Bangladesh : A Commitment towards the global Initiatives*, journal of business and technology (Dhaka), (www.banglajol.info)
6) A paper by Neyti Ahuja, Green Banking in India : A review of Literature, IJRMP, Vol.4, Issue 1, Jan 2015.
7) P. Sahoo & B. Nayak (2008), *The Indian Economic Journal*, Vol. 55 Oct. Dec. 2007
8) Banambar Sahoo, (2010), *Green Banking : It's imperative and implementation in India*, The Indian Banker.

9) A paper by Yadwinder Singh (2015), *Environmental management through Green Banking : A study of commercial banks in India*, IJIMS, Vol. 2, No. 4 17.26

10) Websites

1) www.unepfi.org

2) financialservices.gov.in

3) www.orfi.org.in/speeches


## मराठी अर्थशास्त्र परिषद

### अध्यक्षीय भाषणे

### अर्थविचार

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि तेजस प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षीय भाषणाचा खंड-१ आणि खंड-२ चे प्रकाशन रविवार दि.५ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता राजाराम महाविद्यालयाचे यशवंतराव चव्हाण सभागृह कोल्हापूर येथे आयोजित केले आहे. प्रकाशन समारंभाला आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

पुस्तक प्रकाशन हस्ते - मा. प्रा. एन. डी. पाटील<br>
ज्येष्ठ विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते<br>
प्रमुख उपस्थिती मा. डॉ. वाय. पी. एस. थोरात<br>
माजी अध्यक्ष, नाबार्ड.

खंड-१ व खंड-२ ची किंमत रु.१२००/- असून प्रकाशनपूर्व नोंदणी केल्यास २५% सवलत देण्यात येईल. म्हणजे दोन्ही खंड रु.९००/- मध्ये प्राप्त होतील. प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी तेजस प्रकाशन, एफ-३, ट्रेड सेंटर, स्टेशन रोड, शाहू पुरी, कोल्हापूर-४१६००३ येथे संपर्क साधावा. फोन: ०२३१-२६५३३७२, भ्रमणध्वनी: ९८८१७४७३२५,<br>
ई-मेल: sheti.pragati@gmail.com

अर्थशास्त्र अभ्यासकांना संग्रही ठेवण्यासारखे अमूल्य असे दोन्ही खंड आपण विकत घ्यावेत, ही विनंती.

विनीत

प्रा. चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष

डॉ. शिवाजी भोसले, अध्यक्ष

रावसाहेब पुजारी, प्रकाशक

डॉ. अप्पासाहेब पुजारी, संपादक-अर्थविचार

डॉ.आर. बी. भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार

## अर्थसंवाद

# आर्थिक सुधारणांची पंचविशी- एक सिंहावलोकन

**सुभाष पाटील, पुणे,**

प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग,

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, कर्वे पथ

भ्रमणध्वनी: ९८५०४३४५८९

ई-मेल: subhash.patil09@rediffmail.com

**प्रास्ताविक:**

जुलै १९९१ पासून पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने ज्या व्यापक आर्थिक सुधारणा अंमलात आणल्या त्या कालावधीस सुधारणांचे नवे पर्व म्हणता येईल. या आर्थिक सुधारणांचे उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण हे महत्त्वपूर्ण पैलू असून यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल व त्याचे लाभ सर्व भारतीयांना मिळतील अशी आशा व्यक्त करण्यात आली होती. हा आर्थिक सुधारणा कार्यक्रम अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग, व्यापार सेवा व वित्त क्षेत्राला लागू करण्यात आला. अर्थव्यवस्थेच्या जवळपास सर्वच क्षेत्रांचा चेहरा अमूलाग्र बदलवून टाकणाऱ्या या आर्थिक कार्यक्रमाने २४ जुलै २०१६ रोजी पंचविशी पूर्ण केली. अर्थव्यवस्थेच्या वाटचालीत या कार्यक्रमाने एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून भारतीय अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रनिहाय कामगिरीचे सिंहावलोकन करणे हा या लेखाचा प्रमुख उद्देश आहे.

**आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची पार्श्वभूमी:**

आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची सुरुवात १९[illegible] झाली. वस्तुत: आर्थिक उदारिकरणाची सुरुवात झाली ती १९८० पासूनच. प्रशासकीय सुधारणांसाठी डॉ. एल.के. झा यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणा आयोग नेमण्यात आला. १९८४ या वर्षात सार्वजनिक उद्योगांची कामगिरी उंचा[illegible]याच्या दृष्टीने अर्जुन सेनगुप्ता समिती स्थापन झाली तर व्यापार धोरणांमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी आबिद हुसेन समितीची स्थापना करण्यात आली होती. नरसिंहम समितीने केलेल्या शिफारशीनुसार १९८६ मध्ये जवळपास २७ उद्योगांची गुंतवणूक व उत्पादनक्षमता वाढीसाठी औद्योगिक परवान्यांपासून सुटका करण्यात आली. १९८८ मध्ये भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळाची (SEBI) स्थापना करण्यात आली. १९८९-९० मध्ये विश्वनाथ प्रतापसिंग यांनी माँटेकसिंग अहलुवालिया

यांना आर्थिक सुधारणाविषयी अहवाल तयार करण्यास सांगितले. १९९० मध्ये चंद्रशेखर पंतप्रधान असताना अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी *वित्तीय तूट* ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. मात्र या सुधारणांची गती व व्याप्ती तुलनेने कमी होती.

याशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा संख्यात्मक विकास घडून येत असतानाच नवनवीन प्रश्न निर्माण झाले. १९९० मध्ये भारताला आर्थिक अरिष्टाने ग्रासले. यामध्ये वाढता कर्जबाजारीपणा, वाढती वित्तीय तूट, गुणात्मक विकासाची पिछेहाट, चलनवाढीचा मोठा दर, बेकारी व दारिद्र्याचे उग्र स्वरुप, वाढता भ्रष्टाचार, लालफितीचा कारभार, काळाबाजार इत्यादी अपप्रवृत्ती, प्रतिकुल व्यापारतोल, घसरती आंतरराष्ट्रीय आर्थिक पत इत्यादीमुळे शासकीय हस्तक्षेपावर आधारित आर्थिक धोरणात आमूलाग्र बदलाची आवश्यकता निर्माण झाली. गुणात्मक विकासाची कास धरणे, बदलत्या आंतरराष्ट्रीय घडामोडीशी जुळवून घेणे आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, व्यापार व जकातीविषयक सर्वसामान्य करार (GATT), युरोपीय संघ व अमेरिका इत्यादींच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दडपणामुळे १९९१ मध्ये भारताच्या आर्थिक धोरणात अमूलाग्र बदल करणे भाग पडले आणि नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रम अंतर्गत उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण धोरणाचा अंगिकार भारताने केला. राजकीय व आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर २१ जून १९९१ रोजी पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेणारे पी.व्ही. नरसिंहराव भारताला जागतिकीकरणाच्या युगात नेऊन ठेवणारे प्रमुख नेते मानले जातात. त्यांना या कामी तत्कालीन वित्तमंत्री मनमोहनसिंग, वित्तसचिव माँटेकसिंग अहलुवालिया, मुख्य आर्थिक सल्लागार शंकर आचार्य आणि वाणिज्य व उद्योगमंत्री पी. चिदंबरम यांनी मोलाची साथ दिली. उदारिकरणाच्या या धोरणाला सुरुवातीस विरोध झाला. मात्र त्याची अनिवार्यता लक्षात घेऊन त्यानंतरच्या संयुक्त आघाडी व राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारांनी देखील या आर्थिक सुधारणांचाच मार्ग अनुसरला.

**भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरुप:**

१९५१ ते २०१५ या कालावधीचा विचार करता विकासाचा पाया व त्याचे स्वरुप विचारात घेता भारतीय अर्थव्यवस्थेत प्रामुख्याने तीन प्रकारचे ठळक बदल जाणवतात. १) सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही या तत्वाचा स्वीकार करुन जलद विकासाच्या दृष्टीने १९५१ मध्ये संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करुन सार्वजनिक क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. मात्र १९९१ पासून व त्यानंतरच्या काळात भांडवलशाही अर्थव्यवस्थेला गती देऊन खाजगी क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. २) याच कालावधीत भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्थेकडून सेवाप्रधान अर्थव्यवस्थेकडे, ग्रामीण अर्थव्यवस्थेकडून नागरी अर्थव्यवस्थेकडे, पारंपरिक अर्थव्यवस्थेकडून आधुनिक अर्थव्यवस्थेकडे वेगाने स्थित्यंतर होत आहे. या स्थित्यंतराचा परिणाम कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर होऊन त्यांचे एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादन रोजगार, वृद्धीदर यांतील योगदानही बदलत आहे. आणि ३) अर्थव्यवस्थेतील एकूण उपभोग, गुंतवणूक, शासकीय खर्च, निर्यात, आयात, पायाभूत सुविधा, नैसर्गिक व मानवी संसाधने, तंत्रज्ञानाचा विकास, वस्तुंच्या किंमती, मागणी आणि पुरवठा, आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांची

भूमिका, विदेशी गुंतवणुकीचे स्वरुप यासोबतच पर्यावरणीय घटकांचीही भूमिका बदलते आहे. आर्थिक सुधारणोत्तर काळात या बदलांची तीव्रता अधिक ठळकपणे जाणवते.

**आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची फलनिष्पत्ती:**

१९९१ यावर्षी व त्यानंतर करण्यात आलेल्या आर्थिक सुधारणा उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या तीन मुख्य प्रकारातील आहेत. या अनुषंगाने प्रामुख्याने कर सुधारणा, राजकोषीय सुधारणा, चलनविषयक सुधारणा, औद्योगिक सुधारणा, वित्तीय व बँकिंग सुधारणा, व्यापारविषयक सुधारणा, कृषी सुधारणा इत्यादी प्रमुख सुधारणा करण्यात आल्या व वेळोवेळी त्यात बदल करण्यात येत आहेत. या विविधांगी सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व पर्यावरणीय घटकांवर आमूलाग्र बदल होताना दिसत आहेत. आर्थिक सुधारणांच्या सकारात्मक व नकारात्मक परिणामांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

१) आर्थिक सुधारणा आणि GDP व रोजगारातील क्षेत्रनिहाय बदल:

सर्वसाधारणपणे आर्थिक विकास म्हणजे औद्योगिक व सेवा क्षेत्राची वाढ व त्या अनुषंगाने त्या क्षेत्रातील रोजगारनिर्मिती असे गणित मांडले जाते. तसेच कृषीक्षेत्रामधील अतिरिक्त मनुष्यबळ औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामावले जाईल असा विचार प्रस्तृत केला जातो, आर्थिक सुधारणा काळात शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा समान विकास अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास होत जाऊन कृषी विकासाचा वेग मंदावत असल्याचे दिसून येते. आर्थिक सुधारणा काळातील GDP व रोजगारातील क्षेत्रनिहाय हिस्सा तक्ता क्र.१ मध्ये दर्शविला आहे.

भारतात आर्थिक सुधारणांच्या पूर्वी म्हणजे १९७२-७३ मध्ये कृषीचा हिस्सा ४१ टक्के तर सद्यस्थितीत कृषीचा हिस्सा १५ टक्के आहे. औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या विकासाचा परिणाम म्हणून कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार व निर्यातीवरील हिस्सा कमी झाला आहे. आर्थिक विकास प्रक्रियेत असे होणे अपेक्षित असते. आर्थिक सुधारणापूर्व १९७२-७३ ते १९८२-८३ आणि १९८३-८४ ते १९९३-९४ या काळात अर्थव्यवस्थेतील GDP वाढीचा सरासरी दर ४.६६ व ४.९८ टक्के इतका होता. आर्थिक सुधारणा काळात १९९१-९२ व १९९२-९३ ही सुरुवातीची दोन वर्षे सोडली तर आर्थिक सुधारणांनी अर्थव्यवस्था वाढीचा समाधानकारक दर गाठण्यास मदत केल्याचे दिसते. १९९३-९४ ते १९९७-९८ आणि १९९९-२००० ते २००९-१० या काळात अर्थव्यवस्थेतील वाढीचा सरासरी दर ६.३ टक्के व दरडोई उत्पन्न वाढीचा दर ४.६ टक्के इतका राहिला. आर्थिक सुधारणापूर्व १९७२-७३ ते १९८२-८३ आणि १९८३-८४ ते १९९३-९४ या काळात अर्थव्यवस्थेतील रोजगार वाढीचा सरासरी दर अनुक्रमे २.४४ व २.०२ टक्के इतका होता. तर १९९३-९४ ते १९९७-९८ आणि १९९९-२००० ते २००९-१० या काळात अर्थव्यवस्थेतील रोजगार वाढीचा सरासरी दर अनुक्रमे १.८४ व १.५२ टक्के इतका कमी राहिला. आर्थिक सुधारणा काळात औद्योगिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा भरमसाठ वापर वाढल्यामुळे रोजगारनिर्मिती अत्यंत कमी वेगाने होत असते. ही वास्तव स्थिती विचारात घेऊन शेती क्षेत्रातील

अतिरिक्त मनुष्यबळ औद्योगिक क्षेत्रामध्ये सामावून घेतले जाण्यावर प्रचंड मर्यादा येत आहेत.

२) आर्थिक सुधारणा आणि कृषी क्षेत्राची कामगिरी:

स्वातंत्र्योत्तर काळातही बऱ्याच कालावधीपर्यंत भारतीय कृषीचे स्वरुप मागास होते. मात्र हरितक्रांतीच्या यशानंतर कृषी विकासात बरीच सुधारणा झाली अर्थात यामुळे एकूण कृषी उत्पादनात व उत्पादकतेत वाढ झाली. १९५१ ते २०११ या काळात अन्नधान्याचे उत्पादन जवळपास पाच पटीने तर कडधान्याचे उत्पादन दोन पटीने वाढले. नियोजनकालीन विकास कार्यक्रमामुळे लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र वाढून उत्पादन व उत्पादकता वाढण्यास मदत झाली. हरितक्रांतीमुळे गहू व तांदूळ या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादकतेत प्रचंड सुधारणा झाली. अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झाला. पारंपरिक शेती उत्पादनाबरोबरच व्यापारी पिकांचेही उत्पादन वाढले. अन्नधान्य पिके, फळे, फुले, भाजीपाला यांत वैविध्यता आली. नियोजनकाळात झालेली पायाभूत संरचनेतील भरीव सार्वजनिक गुंतवणूक, भूमी सुधारणा व ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे कृषीविकास होऊ लागला. मात्र हरितक्रांतीचे हे यश निवडक पिके व राज्यांपुरतेच मर्यादित राहिले.

१९९१ मध्ये भारतात संरचनात्मक सुधारणा व स्थिरीकरण धोरण अंमलात आले. यात उद्योग, करसुधारणा, विदेशी व्यापार व गुंतवणूक बँकिंग व भांडवल बाजाराला केंद्रित करण्यात आले. मात्र या कार्यक्रमात शेती विकासासाठी विशिष्ट पॅकेजचा समावेश नव्हता. या कार्यक्रमामुळे कृषी वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली करणे, जैव तंत्रज्ञानाचा वापर करणे, जलसिंचनातील व बाजारातील खासगी गुंतवणूक वाढविणे, साठवणूक व वाहतूक यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास होऊन कृषी क्षेत्राचा लाभ मिळणे अपेक्षित होते. यामुळे कृषी आणि बिगर कृषी क्षेत्रातील व्यापारशर्तींचा कृषीला लाभ मिळणे अपेक्षित होते. १९९१ ते १९९७ या कालावधीत कृषी वृद्धीदर प्रतिवर्षी ३.७ टक्के इतका होता. मात्र त्यानंतर कृषी विकासाचा दर घटण्यास सुरुवात झाली. १९९७ ते २००५ या कालावधीत तो जवळपास २ टक्के म्हणजे निम्म्याने कमी झाला.

सार्वजनिक गुंतवणुकीतील घट, खासगी गुंतवणुकीतील अल्पशी वाढ, जलसिंचन क्षेत्रातील अल्पशी वाढ, तंत्रज्ञानाचा अल्प वापर, कृषीचे विविधीकरण आणि रासायनिक खतांचा अतिवापर यामुळे कृषी विकासाचा दर मंदावला आहे. कृषी उत्पादन व उत्पादकता दर कमी झाल्याने व लोकसंख्या वाढीने अन्नधान्याची व कडधान्याची प्रतिमाणशी उपलब्धतेत घट होत आहे. एकीकडे शेती विकासाचा दर मंदावत आहे तर दुसरीकडे शेती उत्पादनाचा वाढता खर्च, कर्जासाठी सावकारावरील अवलंबित्व, शेतमालाची किंमत कमी, खर्च व किंमतीतील अंतर या व अन्य कारणांमुळे शेती करण्याची समस्या निर्माण होते. कृषीक्षेत्रावर अवलंबून असलेले आदिवासी, ग्रामीण शेतमजूर, असंघटीत कष्टकरी, कोरडवाहू, अल्पभूधारक व सीमांत शेतकरी यांसारखा घटक विकासापासून वंचितच असल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर नियोजन कालावधीतील विकास प्रणालीपासूनही नेमका हाच घटक वंचित राहिलेला दिसतो. वस्तुत:

आर्थिक सुधारणा काळात या घटकांमध्ये विकास होणे अपेक्षित आहे.

३) आर्थिक सुधारणा आणि औद्योगिक क्षेत्राची कामगिरी:

स्वातंत्र्योत्तर नियोजन काळात शाश्वत व गतिशील आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाला विशेष प्राधान्य देण्यात आले. विकास व्यूहरचनेत मोठे व अवजड उद्योगांच्या उभारणीला प्राधान्य देऊन स्वदेशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयात पर्यायीकरण, कडक किंमत नियंत्रण आणि खाजगी पुढाकार, औद्योगिक परवाना, उत्पादनासाठी राखीव क्षेत्र, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक, श्रमिक बाजारपेठेतील हस्तक्षेप यावर तीव्र निर्बंध लादण्यात आले होते. १९८० नंतर औद्योगिक क्षेत्रातील नियंत्रणे दूर करण्यास सुरुवात झाली. कारखानदारी क्षेत्राचे आधुनिकीकरण यासाठी तंत्रज्ञान आयात आणि विदेशी खासगी गुंतवणुकीला संधी देण्यात आली. कारखानदारी क्षेत्रातील सिमेंट उद्योग, वस्त्रोद्योग व विणकाम उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग यात आधुनिकीकरण करुन मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाला चालना देण्यात आली. परिणामी औद्योगिक विकासाला गती मिळाली. १९८१-८२ ते १९९०-९१ या दशकात सर्वसाधारण औद्योगिक वृद्धी दर ७.८ टक्के, कारखानदारी क्षेत्रातील औद्योगिक वृद्धी दर ७.६ टक्के, खाणकाम क्षेत्रातील औद्योगिक वृद्धी दर ८.४ टक्के, आणि वीजनिर्मिती क्षेत्रातील औद्योगिक वृद्धी दर ९.० टक्के इतका राहिला. विशेषत: १९८६ पासून औद्योगिक निर्यात वृद्धीत सुधारणा झाली.

१९९१ पासून औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या. औद्योगिक परवाना धोरण शिथिल करण्यात आले. MRTP कायद्याचे निर्बंध दूर करण्यात आले. सार्वजनिक उद्योगांसाठीची राखीव वस्तूंची यादी मर्यादित करण्यात आली. परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन औद्योगिक क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण तयार करण्यात आले. व्यापार शिथिलीकरण आणि भांडवल शिथिलीकरण याद्वारे औद्योगिक उत्पादनाला चालना देण्यात आली. मात्र बाह्य स्पर्धा, गुंतवणुकीतील घट, पायाभूत सुविधांची कमतरता, निधीच्या विस्तारीकरणाला मर्यादा, संथ निर्यात वृद्धी, विसंगत कररचना, ग्राहकांच्या मागणीतील घट इत्यादी कारणांमुळे १९९१-९२ ते २०००-२००१ या दशकात सर्वसाधारण वृद्धीदर ६.० टक्के पर्यंत मर्यादित राहिला.

२००८-२००९ हे वर्ष जागतिक मंदीचे असल्याने या वर्षात औद्योगिक उत्पादन वृद्धी दर २.८ टक्क्यांपर्यंत कमालीचा घटला. मात्र २००९-२०१० आणि २०१०-२०११ या वर्षात अनुक्रमे औद्योगिक उत्पादनात अनुक्रमे १०.३ टक्के व ८.२ टक्के पर्यंत वाढ झाली. अमेरिकेला जागतिक वित्तीय अरिष्टाने ग्रासले असताना भारतीय अर्थव्यवस्था बँकिंग आणि वित्तीय अरिष्टांपासून तग धरुन होती. मात्र या मंदीचा फटका भारताच्या औद्योगिक क्षेत्राला बसला. देशांतर्गत व बहिर्गत मागणीत घट झाली. २००१-२००२ ते २०१०-२०११ या दशकात सर्वसाधारण औद्योगिक वृद्धीदर ७.३ टक्के, कारखानदारी क्षेत्रातील वृद्धीदर ७.९ टक्के, खाणकाम क्षेत्रातील औद्योगिक वृद्धीदर ४.६ टक्के आणि वीजनिर्मिती औद्योगिक वृद्धीदर ५.० टक्के इतका राहिला. या मंदीच्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी भारत सरकार व भारतीय रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २००८ पासून मौद्रिक व

राजकोषीय उपाययोजना केल्या. परिणामी देशांतर्गत मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळून औद्योगिक उत्पादन वृद्धीला चालना मिळाली. परंतु असे असले तरी आर्थिक सुधारणोत्तर काळात औद्योगिक क्षेत्राचा विकास अपेक्षित असा समाधानकारक नाही. आर्थिक सुधारणा काळात कारखानदारी क्षेत्राचे GDP मधील योगदान २५ टक्केपर्यंत वाढणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात ते १६ टक्के पर्यंत मर्यादित राहिले.

कुशल श्रमिकशक्तीची अनियमित उपलब्धता, श्रमिकांच्या उत्पादकतेतील घट, अकुशल व असंघटीत श्रमिकांचे वाढते प्रमाण, पायाभुत सुविधांची कमतरता, आधुनिक तंत्रज्ञानाचा व कौशल्याचा मर्यादित वापर, विसंगत कररचना पद्धती ही औद्योगिक विकासासमोरील सद्यस्थितीतील मुख्य आव्हाने आहेत. तर स्वस्त व अर्धकुशल श्रमिकांची मुबलकता, कमी श्रमिक खर्च, लोकसंख्या लाभांश, आदानांची पुरेशी उपलब्धता, उत्पन्नातील वाढ, नवमध्यम वर्गाचा उदय ही भारतीय औद्योगिक क्षेत्राची मुख्य बलस्थाने आहेत. या अनुषंगाने नवप्रवर्तन, तंत्रज्ञान व कौशल्य विकासावर भर, सार्वजनिक व खासगी सहभागातून पायाभूत सुविधांत गुंतवणूक, सुसंगत कररचना, कार्यक्षमता व उत्पादकतेत सुधारणा, विदेशी व्यापार धोरणाचे एकीकरण, सुशासन, नोकरशाहीचा कमी हस्तक्षेप इत्यादी उपायांची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. कारण औद्योगिक क्षेत्र हे अर्थव्यवस्थेत वृद्धी, उत्पादकता, रोजगार आणि इतर क्षेत्राला गती देण्याचे काम करीत असते.

३) आर्थिक सुधारणा आणि सेवा क्षेत्राची कामगिरी:

सद्यस्थितीत सेवा क्षेत्राचा वृद्धीदर (१०.४ टक्के) पाहता, भारतीय अर्थव्यवस्था सर्वात जलद गतीने विकसित होणारी अर्थव्यवस्था संबोधली जाते. भारताच्या एकूण वृद्धीदर, रोजगार, व्यापार, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक यांत सेवा क्षेत्राचे भरीव योगदान आहे. आर्थिक सुधारणोत्तर काळात सेवा क्षेत्राच्या वृद्धीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात सकारात्मक बदल झाला आहे. १९९० नंतरच्या काळात सेवा क्षेत्र विकासाला गती मिळालेली दिसून येते. शिक्षण, बँकिंग, वित्तीय सेवा, विमा, आरोग्यविषयक सेवा, कुशल कर्मचारी, माहिती, तंत्रज्ञान व संवाद या सेवांच्या मागणी रचनेत बदल होऊ लागला. उच्च उत्पन्न मागणी लवचिकतेचा परिणाम सेवा क्षेत्राच्या वृद्धीवर झाला.

१९५०-५१ मध्ये एकूण GDP मधील सेवा क्षेत्राचा वाटा ३० टक्के इतका होता. २०१० पर्यंत त्यात ५४ टक्केपर्यंत वाढ झाली. २००८-२०१० या जागतिक मंदीच्या काळातही सेवा क्षेत्राची वाढ ९.९६ टक्के इतकी होती. कालगणिक सेवा क्षेत्रातील विभिन्न घटकांच्या कामगिरीत भिन्नता आढळते. १९९०-९१ ते २०००-२००१ या दशकात वित्त, बँकिंग, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा यांत तर २०००-२००१ ते २००९-२०१० या दशकात वाहतूक, संग्रहण, संदेश विनिमय, हॉटेल व रेस्टॉरंट सारख्या सेवांत वाढ झाल्याचे दिसते. व्यावसायिक सेवा, संदेश विनिमय व व्यापार विषयक सेवांमध्ये वेगाने वृद्धी होत आहे. तर स्थावर मालमत्ता, कायदेशीर सेवा, वाहतूक, संग्रहण, कर्मचारी प्रशासन व संरक्षणविषयक सेवांमधील वाढ स्थिर आहे. पारंपरिक सेवांकडून ज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधिष्ठीत, कौशल्याधिष्ठीत आणि श्रमप्रधान

सेवांच्या निर्यातीत वाढ होत आहे. १९८० ते २०१० या काळात आंतरराष्ट्रीय व्यापारात सेवा क्षेत्राचा वाटा २० टक्के वरुन ३० टक्के पर्यंत वाढला आहे.

आर्थिक सुधारणा काळात GDP मधील सेवा क्षेत्राचा वाटा वाढत असताना, तसेच श्रमिक शक्ती व श्रमिक सहभागाचा दर वाढत असताना, एकूण रोजगार निर्मितीत सेवा क्षेत्राची कामगिरी समाधानकारक नाही. कृषी क्षेत्राकडून सेवा क्षेत्राकडे झालेल्या उत्पादन रचनेतील बदलाचे प्रतिबिंब व्यवसायिक रचनेतील बदलात प्रमाणशीर नाही. परिणामी सेवा प्रेरित वृद्धी ही रोजगार विरहित वृद्धी (Jobless Growth) समजली जाते. १९९३-९४ ते २००९-१० या काळात शेती क्षेत्रात कार्यरत लोकसंख्येचे प्रमाण केवळ ६४ टक्के वरुन ५१ टक्के पर्यंत कमी झाले तर याच काळात सेवा क्षेत्रातील प्रमाण केवळ २१ टक्के वरुन २६ टक्के पर्यंत वाढले आहे. सेवा क्षेत्राचा जलद विकास होऊनही एकूण रोजगार देण्यात शेती क्षेत्राचेच वर्चस्व आजही कायम आहे. सेवा क्षेत्रात कार्यरत असणारा जवळपास ८० टक्के रोजगार असंघटीत क्षेत्रात एकवटला आहे की जेथे मिळणारे वेतन कमी असून सामाजिक सुरक्षेची हमी नाही. तसेच सेवांच्या उपलब्धतेतही विषमता दिसून येते. भारतातील बहुतांश गरीब लोकांपर्यंत शिक्षण व आरोग्यविषयक मुलभूत सेवा स्वस्त व सुलभरित्या उपलब्ध नाहीत.

सेवा क्षेत्राच्या विकासाला अनेक मर्यादा आहेत. उदा. सुसंगत धोरणाचा अभाव, विविधांगी सरकार व त्यांच्यातील समन्वयाचा अभाव, नियामकतेचा अभाव, विदेशी गुंतवणुकीवरील निर्बंध, पायाभूत सुविधांची कमतरता, सेवा देण्याचा अधिक खर्च, सेवांची गुणवत्ता व दर्जा यातील विषमता, रोजगार हमीचा अभाव इत्यादी. या मर्यादा विचारात घेऊन वाढत्या तरुण वर्गासाठी रोजगारनिर्मिती, रस्ते, वीज, वाहतूक, संदेशवहन यांसारख्या पायाभूत सेवांमध्ये खासगी गुंतवणुकीला चालना देणे महत्त्वाचे आहे. यामुळे उत्पादकता व कार्यक्षमतेला चालना मिळून भारतीय अर्थव्यवस्थेला गती मिळेल.

## सारांश:

आर्थिक सुधारणा काळात शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा समान विकास अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र उद्योग व सेवा क्षेत्राचा झपाट्याने विकास होत जाऊन कृषी विकासाचा वेग मंदावत असल्याचे दिसून येते. पर्यायाने ग्रामीण व नागरी भारतातील विषमता वाढत असल्याचे दिसते. आर्थिक सुधारणोत्तर काळात एकीकडे भारतातील आर्थिक वृद्धीदर, विदेशी विनिमय, माहिती तंत्रज्ञान क्रांती, निर्यात वृद्धी यात उल्लेखनीय सुधारणा होत आहे. यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था जगात जलद गतीने वृद्धींगत होणारी अर्थव्यवस्था म्हणूनही ओळखली जात आहे. तर दुसरीकडे विकासाचे लाभ सर्व भारतीयांना समानतेने होताना दिसत नाहीत. आर्थिक व सामाजिक विषमतेसोबतच दारिद्र्य, बेकारी, शिक्षण व आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा इत्यादी समस्या भेडसावत आहेत. केवळ अर्थव्यवस्थेच्या सार्वत्रिक वृद्धीदरात वाढ होण्यासाठी नव्हे, तर शेतीवर आधारित बहुतांश लोकसंख्येकरीता व शेतीआधारित उद्योगातील रोजगार वृद्धीसाठी आणि देशातील अन्न सुरक्षिततेसाठी कृषीक्षेत्राच्या कामगिरीत उत्तरोत्तर सुधारणा होत जाणे आवश्यक आहे. कृषी विकासाच्या मुख्य उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्थायी

व्यूहरचनेची आखणी व प्रभावी अंमलबजावणी होणे नितांत आवश्यक आहे.

संदर्भसूची:


1. Balla G.S., *Globalization and Employment Trends in India*, The Indian Journal of Labour Economics, 2008, Vol.51, No.1.
2. Bulletin of Unique Academy, September 2016, Vol.III, No.6.
3. Chakrabarti Anjan, *Indian Economy in Transition The New Order of Things*, Economic and Political Weekly, July 2016, Vol.LI, No.29.
4. Dev S. Mahendra, *Challenges for Revival of Indian Agriculture*, National Centre for Agricultural Economics and Policy Research, New Delhi, 2008.
5. Nair and Eapen, *Agrarian Performance and Food Price Inflation in India: Pre and Post Economic Liberalizattion*, Economic and Political Weekly, August 2015, Vol.I. No.31.
6. Sharma Ravindra Kumar, *Industrial Development of India and Post Reform Period*, JOSR Journal of Humanities and Social Sciences, October 2014, Vol.19, No.10.
7. Papola T.S. and Sahu P.P., *Growth and Structure of Employment in India.* Institute for Studies in Industrial Development, New Delhi, March 2012.
8. पाटील सुभाष, *आर्थिक सुधारणा आणि कृषी क्षेत्राची कामगिरी*, अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर २०१५, खंड ३९, अंक २.

# काळा पैसा आणि नोटांचे विमुद्रीकरण

**रामदास भांडवलकर**, यवतमाळ,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६,
ई-मेल: rbbhandwalkar@gmail.com

भारताच्या विकासामध्ये आर्थिक, सामाजिक व राजकीय अडथळे असून ज्यामध्ये वाढती लोकसंख्या, बेकारी, दारिद्र्य, विषमता तसेच सामाजिक व राजकीय अस्थिरता इत्यादींचा समावेश केला जातो. कारण लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये जनता सर्वांगिण श्रेष्ठ असते परंतु प्रत्यक्ष व्यवहारात शासन हे भांडवलशाहीच्या हातचे खेळणे झालेले आहे. नवीन आर्थिक धोरणाने देशात श्रीमंतही वाढले तसेच गरीबही वाढले आहेत वास्तविक आर्थिक जीवनातून पैसा काढून घेतला तर देशाची अर्थव्यवस्था अगदी कोलमडून पडेल. पैशाचा मोह कुणालाही फारसा नसावा हे मर्यादित अर्थाने जरी खरे असले तरी पैसा मिळविण्यासाठीच सर्वजण धडपडत असतात. यातूनच विषमतावादी अर्थप्रणाली उदयास आली. पर्यायाने माफियाराजची मालिका सुरु होऊन भ्रष्टाचार सर्वत्र फोफावला आहे तर भ्रष्टाचार हा भारतातील काळ्या पैशाचा मुख्य स्रोत आहे. एवढेच नव्हे तर काळा पैसा ही भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेली किड आहे. परंतु काळा पैसा नेमका कशाला म्हणावयाचे याची एकच एक, सर्वमान्य प्रमाणित अशी सार्वत्रिक व्याख्या कोठेही सापडत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने दुसऱ्या महायुध्दापासून काळ्या पैश्याच्या प्रवृत्तीस सुरुवात झाल्याचे आढळून येते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या निम्म्यापेक्षा जास्त काळ्या पैश्याची समांतर अर्थव्यवस्था भारतात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. त्यामुळे सरकारला अपेक्षित महसुली उत्पन्न प्राप्त होत नाही हीच देशाच्या अर्थव्यवस्थेपुढील गंभीर समस्या ठरली आहे. नव्हे तर काळा पैसा रोखणे हा कळीचा मुद्दा आहे.

**काळा पैसा:**

भ्रष्टाचार हा दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. तर भ्रष्टाचार आणि अवैध व्यवहार यामुळे काळा पैसा तयार होतो आणि तो अवैध

मार्गाने परत पांढरा करण्यात येतो. काळा पैसा म्हणजे ज्या पैशावर प्राप्तीकर आणि इतर कर भरले नाहीत असा पैसा होय. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अॅन्ड पॉलिसी या संस्थेने करपात्र असणारे परंतु करसंकलन व्यवस्थेपासून दडविलेले उत्पन्न म्हणजे काळा पैसा होय. ज्या व्यवहारातून हा काळा पैसा निर्माण झालेला असतो ते व्यवहार गुन्हेगारी स्वरुपाचे तस्करी, चोरटा व्यापार, शस्त्रास्त्रे, अंमली पदार्थ यांचा व्यापार, दहशतवादी कारवाया यासारख्या व्यवहारातून निर्माण होणारा काळा पैसा केवळ बेहिशेबीच असतो असे नाही तर त्यातून अनेक गुन्हेगारी स्वरुपाचे व्यवहार होत असतात. जगात असा एकही देश नाही की, ज्यांच्या अर्थव्यवस्थेत अनधिकृत व्यावसायिक व्यवहार अस्तित्वात नाहीत. वेगवेगळ्या देशात फरक फक्त इतकाच आहे की, अनधिकृत व्यावसायिक व्यवहाराचे वर्चस्व कुठे खूप जास्त आहे तर कुठे तुलनात्मक दृष्ट्या गुणोत्तर प्रमाण कमी आहे. काळा पैसा भारतात आणि भारताबाहेर साठवला जातो तो बहुतांश रोख स्वरुपात किंवा स्थावर मालमत्ता, सोने किंवा इतर मालमत्तेत दुसऱ्यांच्या नावाने गुंतविला जातो आणि अशा प्रक्रियेत सुध्दा कर भरला जात नाही त्यामुळे सरकारचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते पर्यायाने विकासाची व समाज कल्याणाची कामे करण्यास मर्यादा येतात. तसेच प्रचंड राष्ट्रीय संपत्ती अनुत्पादक कार्याकरिता गोठवून ठेवली जाते.

स्वातंत्र्यपूर्व काळात १९३६ मध्ये ब्रिटीश शासनाने भारतातील काळा पैश्यांचा शोध घेण्यासाठी अय्यर समिती नियुक्त केली होती. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात सुध्दा अनेक समित्या नियुक्त करण्यात आल्यात. भारतात काळा पैसा नेमका आहे तरी किती याचे मोजदाद करण्यासाठी अंदाजानुसार मांडलेले हिशेब हे कधीच निरपवाद आणि सर्वमान्य ठरलेले नाहीत. कारण हा पैसा अधिकृतपणे कागदावर येत नसतो. सन १९५३-५४ मध्ये एन.कालडोर समितीने ६०० कोटी रुपये, सन १९६१-६२ मध्ये न्या.वांच्छू समितीने ७०० कोटी रुपये, सन १९६९-७० मध्ये डॉ. डी. के. रांगणेकर समितीने ३०८० कोटी रुपये, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अॅन्ड पॉलिसी या संस्थेने सन १९७५-७६ मध्ये ९९५८ कोटी ते ११८७० कोटी रुपये, सन १९७६-७७ मध्ये ओ. पी. चोप्रा समितीने ८०९८ कोटी रुपये, सन १९७८-७९ मध्ये पूनम गुप्ता व संजीव गुप्ता समितीने ४६४८७ कोटी रुपये, सन १९८८-८९ मध्ये जागतिक नाणेनिधीनुसार ७२००० कोटी रुपये एवढा प्रचंड काळा पैसा भारतात असल्याचे अंदाज व्यक्त केलेत. तर सन २०११-१२ मध्ये ३००-४०० लाख करोड म्हणजेच देशाच्या अर्थव्यवस्थेएवढा काळा पैसा असल्याचे वर्तविण्यात आले आहे. तसेच भारताबाहेरील स्विस बँकेत सन २०१० मध्ये भारतीयांचे ९२ ते ९५ बिलीयन रुपये असावे असे काळ्या पैश्यावरील श्वेत पत्रिकेत जाहिर केले आहे. इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्राने २०१५ मध्ये एक हजारांच्यावर भारतीयांची नावे तसेच २०१६ मध्ये पनामा पेपर घोटाळ्यात जाहिर नावे ही काळ्या पैशाशी संबंधितच होती. अलिकडच्या काळातील बोफोर्स घोटाळा, हवाला कांड, चारा घोटाळा, टू जी स्पेक्ट्रम घोटाळा, राष्ट्रमंडळ खेळ घोटाळा, हर्षद मेहता व केतन पारेख घोटाळा, आयपीएल घोटाळा, तेलगी घोटाळा, सत्यम घोटाळा,

पुण्यातील लवासा व जमीन घोटाळा, घरकुल घोटाळा, कर्नाटकातील भूमी घोटाळा, आदर्श घोटाळा, कोळसा खाण घोटाळा इत्यादी घोटाळेच काळा पैसा निर्माण करण्याची उगमस्थाने आहेत असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲन्ड पॉलिसी या संस्थेच्या सर्वेक्षणानुसार एकूण काळ्या पैशापैकी ४८ टक्के काळा पैसा प्रत्यक्ष कर प्राप्तीच्या कर चुकवेगिरीतून निर्माण होतो. २८ टक्के काळा पैसा देशात झालेल्या उत्पादनापेक्षा कमी उत्पादनाची नोंद केल्यामुळे निर्माण होते तर १८ टक्के काळा पैसा स्थावर संपत्तीची खरेदी-विक्री करतांना संपत्तीची प्रत्यक्ष किंमत कमी दाखवून त्यावर कमी मुद्रांक शुल्क भरल्यामुळे निर्माण होतो. राजा चेलिया गटाच्या अहवालानुसार भारतात प्रत्येक रुपयांच्या व्यवहारातील एकपंचमांश भाग हा काळ्या व्यवहारात होतो यावर त्वरित उपाय योजले नाहीत तर अर्थव्यवस्था खिळखिळी होऊन धोका होण्याचे गंभीर परिणाम दिसून येतात.

### नोटांचे विमुद्रीकरण:

आपल्या देशातील राजकारण गेल्या चार दशकात टप्याटप्याने सत्तेच्या कुरघोडीमुळे जीवघेणं बनत गेले आहे. अशा वेळी साम, दाम, दंड, भेद या चाणक्यनीतीचा सर्रास वापर होत असतो साहजिकच गेल्या काही वर्षात राजकारण महाग बनत चालल आहे तर भारतातील काळ्या पैशाचे आणि पर्यायाने भ्रष्टाचाराचे मूळ देशातील जीवघेण्या सत्तेच्या राजकारणात आहे. हे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. सन २०१६ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेत बऱ्याच गंभीर घटना घडल्या त्यामध्ये विकसनशील राष्ट्राच्या जोडीला विकसित राष्ट्रामधील जनसामान्यांमध्ये देखील जागतिकीकरणाविरुद्ध एकंदरच नवउदारमतवादी आर्थिक धोरण विरुध्दच्या असंतोषाचा झालेला स्फोट महत्वाची घटना होती. वास्तविक देशातील नागरिकांचे दैनंदिन आयुष्य सहनिय होण्यासाठी देशाची अर्थव्यवस्था आरोग्यदायी असली पाहिजे. विकसनशील अर्थव्यवस्थेकडून विकसित अर्थव्यवस्थेकडे जात असतांना आपले एकूण देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढण्याची गरज असते आणि अशावेळी जीडीपीच्या कक्षेबाहेर समांतर चालणारी अर्थव्यवस्था सहन करता येत नाही. याकरिता स्वच्छ, शुध्द जीडीपीची आवश्यकता असते आणि पैसा हा प्रवाही असणे गरजेचे असते. तर दुसरीकडे कराचा पाया (Tax Base) व्यापक करण्याची गरज असते. कारण समांतर अर्थव्यवस्थेतून कररुपी महसूल जमा होत नसतो. कर हा तर प्रत्येक अर्थव्यवस्थेचा आधार असतो आणि या आधारावरच देशाचा सामाजिक विकास होऊ शकतो.

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत काळ्या पैशाला आळा घालायचा असेल तर दहा वर्षाची चलनी नोटा बदलल्या पाहिजेत असा विचार अनेक दशकापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथामध्ये मांडला होता ज्याला अर्थशास्त्रीय भाषेत नोटाचे विमुद्रीकरण किंवा निश्चलनीकरण असे म्हटले जाते. कारण पैसा हे माध्यम असते वस्तू नाही पैसा हा देशाच्या अर्थव्यवस्थेत नेहमी फिरत राहायला पाहिजे ज्याच्याकडे काळापैसा आहे ते लोक तो जास्त दर्शनी मूल्यांच्या नोटात जमा करुन ठेवतात. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मते सन २०११ ते २०१६ या पाच वर्षाच्या काळात राष्ट्रीय अर्थव्यवस्था

३० टक्के विस्तारली मात्र याच काळात चलनी नोटाच्या प्रमाणात ४० टक्के वाढ झाली. त्यापैकी ५०० रुपयांच्या नोटांच्या संख्येत ७६ टक्के तर एक हजार रुपयांच्या नोटामध्ये १०९ टक्के वाढ झाली. आज सर्वसामान्य नागरिकांकडे असणाऱ्या चलनी नोटांच्या रक्कमेचे प्रमाण सुमारे १६,९८,५४० कोटी रुपये आहे. त्यापैकी अंदाजे ८६ टक्के भाग ५०० आणि १००० रुपयांच्या नोटामध्ये आहे. आज देशातल्या ५० टक्के लोकांचे रोजचे उत्पन्न जेमतेम २५ रुपये आहे त्या देशात रु.१०००, ५०० व १०० च्या नोटांचे प्रमाण एकूण छापलेल्या नोटांच्या तुलनेत ९७ टक्के आहे. अमेरिकेत ४ जुलै १९६९ पासून केवळ १०० डॉलरची नोट सगळ्यात मोठी आहे. ब्रिटनमध्ये केवळ ५० पौंड ही मोठी नोट आहे. आपल्या देशात स्वातंत्र्यानंतर तब्बल सात दशकांनी ६० कोटी लोकांची क्रयशक्ती निर्माण होत नाही, उद्योगांना स्वस्त दराने कर्जपुरवठा होत नाही, सामान्य माणसाची पत तयार होत नाही आणि त्याच वेळी मुठभर लोकाकडे मात्र लाखो कोटींचा बेहिशेबी पैसा आहे. ही फार मोठी अर्थ व्यवस्थेतील विसंगती आहे.

मूल्य जास्त असणाऱ्या नोटा चलनातून रद्द करण्याचा निर्णय मुख्यत: घेतला जातो तो आर्थिक व्यवहारात बनावट नोटांचा सुळसुळाट झाल्यावर गेल्या काही वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याच्या उद्देशाने आयएसआय ही संघटना अब्जावधी रुपयांच्या नोटा भारतात आणून आर्थिक व्यवहारात मिसळत असल्याचे निदर्शनास आले असतांना नोटा विमुद्रीकरणाचा धडाकेबाज निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली होती. याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. नोटा रद्द करण्याचा निर्णय १९४६ आणि १९७८ मध्ये घेण्यात आला होता परंतु त्यावेळी एवढा मोठा आर्थिक कल्लोळ झाला नाही किंवा लोकांना त्याची झळ पोहोचली नाही. त्यानंतर २०१६ मध्ये रुपये ५०० आणि १००० च्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानंतर देशात मोठ्या प्रमाणात चलनकल्लोळ निर्माण झाला आहे. पाचशे व एक हजाराच्या नोटा रद्द झाल्यामुळे ज्या नोटा बँकेत जमा होतील त्या अर्थव्यवस्थेच्या प्रमुख प्रवाहात येतील व त्यावर कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही देखील करता येईल. उरलेल्या नोटा आर्थिक व्यवहारातून व चलनातून बाद झाल्यामुळे काळेधन जमा करणाऱ्यांना मोठा धक्का बसेल. हे सरकारला काळा पैसा मोठ्या प्रमाणावर नियंत्रित करणारे समाजहिताचे पाऊल वाटत आहे. देशातल्या अर्थव्यवस्थेत दि. २८ ऑक्टोबर २०१६ रोजी १७,७७,००० कोटी रुपयाचे चलन होते. ३१ मार्च २०१६ रोजी १०० रुपयांच्या १५७.७८ कोटी रुपयाच्या चलनी नोटाची संख्या असून त्याचे एकूण मूल्य १५७८ अब्ज रुपये होते त्यांचे चलनाशी ९.६० टक्के प्रमाण होते. ५०० रुपयांच्या १५७.०७ कोटी रुपयांच्या चलनी नोटाची संख्या असून त्याचे एकूण मूल्य ७८५४ अब्ज रुपये होते त्याचे चलनाशी ४७.८० टक्के प्रमाण होते. तर १००० रुपयांच्या ६३.२६ कोटी रुपयांच्या चलनी नोटाची संख्या असून त्याचे एकूण मूल्य ६३२६ अब्ज रुपये होते त्याचे चलनाशी ३८.६० टक्के प्रमाण होते. म्हणजे अंदाजे ८६ टक्के ५०० आणि १००० रुपयाच्या नोटा चलनामध्ये असल्याचे स्पष्ट होते. ह्या नोटा सरकारने गोठवून सद्यस्थितीत देशाच्या

अर्थव्यवस्थेस ब्रेक लावला आहे. यामध्ये काळ्या पैशाचा समावेश निश्चितच आहे. परंतु अद्याप पावेतो सरकार किंवा रिझर्व्ह बँक काळ्या पैशाच्या आकडेवारीबाबत स्पष्ट माहिती जनतेला देत नाही तर सरकारने घाईत निर्णय घेवून स्वत:ची फजिती केल्याचे आजच्या परिस्थितीवरुन आढळून येते.

भारतातील ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था जवळजवळ रोखीने होणाऱ्या व्यवहारावर अवलंबून असल्यामुळे बनावट नोटा चलनात असणे ही एक समस्या झाली होती आणि बाजारातील बनावट नोटामध्ये सर्वात जास्त नोटा पाचशे व एक हजार दर्शनी मूल्य असणाऱ्या आहेत. अशा बनावट नोटा देशविरोधी आणि विघातक कामासाठी वापरुन देशातल्याच लोकांना भडकवण्याचे काम दहशतवाद्यांकडून होत असल्याचे विशेषत: काश्मीरमध्ये सरकारच्या निश्चितपणे लक्षात आले होते. तसेच देशातील भाववाढ पाच टक्क्यांच्या आसपास असल्याचे चित्र दिसत असले तरी प्रत्यक्षात ती दहा टक्क्यापेक्षा अधिक आहे. दुसरीकडे तस्करी मार्गाने भारतात येणाऱ्या बनावटी भारी किंमतीच्या चलनी नोटांमुळे देशातील एकूण चलनी नोटांच्या संख्येत अनियंत्रित वाढ झाली त्यामुळे सुद्धा भाववाढीत भर पडली आहे. यावर रिझर्व्ह बँकेला आणि पर्यायाने सरकारला देशातल्या भाववाढीवर अपेक्षित नियंत्रण ठेवता येत नव्हते. तसेच करचुकवेगिरीपासून लोकांना रोखण्यासाठी किंवा कर भरण्यासाठी उपाय योजावेच लागतात शेवटी. काळ्या पैशाची निर्मिती रोखण्यासाठी रोख व्यवहाराऐवजी बँकाच्या माध्यमातून, डिजीटल माध्यमातून अधिकाधिक व्यवहार होणे आवश्यक आहे. मोठ्या मूल्यांच्या नोटा रद्द केल्यामुळे काळ्या पैशाचे समूळ उच्चाटन होणार नाही हे खरे असले तरी असा पैसा काही प्रमाणात नक्कीच कमी होऊ शकतो. काळा पैसा कमी करण्याचा आणि शोध घेण्याचा हा निर्णय योग्य आणि अचूक असला तरी हा अंतिम असू नये कारण काळा पैसा केवळ कागदी चलनातच असतो असे नाही. तर तो जमीन, सोने, हिरे, शेअर्स तसेच इतर अचल संपत्तीमध्येही असतो. साठेबाज लोक जास्त किंमतीच्या नोटांचा साठा करुन काळा पैसा जमवतात आणि म्हणून या जास्त किंमतीच्या नोटा रद्द केल्या हा सरकारचा तर्क असेल तर नवीन दोन हजार रुपयांच्या नोटा वितरित करणे तार्किकदृष्ट्या लोकांना विसंगत वाटते. परंतु जुन्या नोटा रद्द करतांना बाजारातील रोकड तरलता Cash Liquidity अचानक कमी होणार नाही याची सुध्दा काळजी घ्यावी लागते. त्यावर उपाय म्हणून अशा मोठ्या मूल्याच्या नोटा वितरित करण्याचा निर्णय घेतला गेला आहे परंतु हा सरकारच्या नियोजनशून्य नोटा बंदीचा प्रयोग वाटतो. आधीच मंदावलेल्या अर्थव्यवस्थेत विमुद्रीकरणाने अधिक भर घातली. पायाभूत सुविधा, कंपन्यांचे तिमाही वित्तीय निष्कर्ष याबाबत गेल्या अनेक महिन्यापासून असलेली मरगळ या कालावधीत महागाई कमी होऊनही झटकली गेली नाही. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात निम्म्याहून अधिक सेवा क्षेत्राचा वाटा आहे. हे अधिकतर असंघटीत स्वरुपातच आहे यावर झालेला परिणाम फार विपरित आहे. हे विसरता येणार नाही.

काळा पैसा, दहशतवाद आणि आतंकवाद या प्रमुख समस्येच्या आधारावर नोटा बंदीचा निर्णय झाला असला तरी आजही रिझर्व्ह बँक आणि सरकार हे स्पष्ट सांगू शकत नाही की,

नोट बंदीनंतर किती काळा पैसा जमा झाला? किंवा दहशतवादी आणि आतंकवादी हल्ले कमी झाले काय? म्हणजेच सरकार या मूळ उद्देशापासून पळवाट काढत असतांना कॅशलेस अर्थव्यवस्था हा नवीन मार्ग शोधण्याचा यातून प्रयत्न करीत आहे. वास्तविक भारतासारख्या मोठ्या लोकशाहीप्रधान देशात एवढा मोठा निर्णय घेतांना भारतीय लोकसंख्येच्या स्थितीचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते. देशातील अनेक समस्यांवर पांघरुन घालून नोटाबंदीचा प्रवास कॅशलेसकडे जात असेल तर कॅशलेस अर्थव्यवस्थेकरीता नोटबंदीचा निर्णय न घेताही त्याची प्रभावी अंमलबजावणी सरकार करु शकली असती. कॅशलेस व्यवहार खऱ्या अर्थाने गरज असून निर्माण होणाऱ्या काळ्या पैशाला रोखण्याचा तो एक मार्ग ठरु शकेल. कारण कॅशलेस व्यवहाराने करसंकलन जास्त होते कर चुकवेगिरीला आळा असतो हे सत्य असले तरी देशात सद्यस्थितीत ९८ टक्के व्यवहार कॅशवर आधारित आहे किंवा जगात कोणत्याही देशाने पुर्णत: कॅशलेस व्यवहार स्वीकारले नाहीत. म्हणून आवश्यक व अपेक्षित असे आहे की लोकांच्या हातात रोख पैसा असला पाहिजे व त्यांना रोजचे व्यवहार करता आले पाहिजेत. मोठ्या रक्कमेचे व्यवहार डिजीटल किंवा धनादेशाने करावे अशा प्रकारच्या कायद्याची खऱ्या अर्थाने गरज निर्माण झाली आहे. त्याच बरोबर बँक शाखाची, पुरेशा शाखा उघडण्याची सुध्दा आवश्यकता आहे. सध्या देशात १५ हजार लोकसंख्येमागे एक राष्ट्रीयीकृत बँक असे समिकरण आहे वास्तविक दोन हजार लोकसंख्येमागे एक बँक शाखा असावयास पाहिजेत म्हणजेच आज दोन लाख बँक शाखा निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. थोडक्यात एखादी समस्या समूळ नष्ट करायची असेल तर त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना किंवा नियोजन याची सर्वप्रथम व्यवस्था करणे गरजेचे आहे. आज टंचाईमुळे बहुतांश लोक बँकेतून पैसा काढतात परंतु रोख रक्कम बँकेच्या खात्यात जमा करण्यासाठी पुढे येत नाही. पर्यायाने कॅशलेस ऐवजी बँकलेस व्यवहार होण्याची भिती वाटत आहे. देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ याविषयाबाबत स्पष्ट मत व्यक्त करीत आहे तर दुसरीकडे सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्याकडून हा निर्णय नेमका कशासाठी होता याची सुध्दा कल्पना येत नाही. थोडक्यात शासनाच्या आर्थिक धोरणामुळे लोकशाही देशातील बहुसंख्य गरीब, मध्यमवर्गीय, कामगार, कष्टकरी, शेतकरी, स्वयंरोजगारी आणि खाजगी नोकरदार यांच्यावर विपरित परिणाम होत असतील तर ते चुकीचे आहे. यातून मात्र एक नक्की झाले की, लोकांच्या जिव्हाळ्याच्या मूळ प्रश्नांना बगल देण्यात सरकार यशस्वी झाले आहे.

**संदर्भसूची:**


१. महाजन मुकुंद, भारतीय व जागतिक आर्थिक विकास.
२. रुद्र दत्त-सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस. चांद पब्लिकेशन्स, ५९वी आवृत्ती, २००९.
३. महाराव डी., पैसा झाला काळा.
४. दै. लोकसत्ता, नागपूर.
५. दै.तरुण भारत, नागपूर.
६. कुलकर्णी प्र. रा., भारतीय अर्थव्यवस्था, १९९९, विद्या बूक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.३३१ ते ३३४.

# सरदार वल्लभभाई पटेल यांचे आर्थिक विचार

**नीता सुधाकर वाणी**, रावेर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
स.व.प.कला व विज्ञान महाविद्यालय
ऐनपूर, जिल्हा जळगाव.
भ्रमणध्वनी: ८००७६९८५७०

सरदार वल्लभभाई पटेल हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले विविध गुणांनी संपन्न होते. ते कुशल प्रशासक, कुशल राजकारणी, कुशल संघटक, देशभक्त, भावासाठी वकिलीचा त्याग करणारे कुटुंबवत्सल, कुशल वकील, लहानपणापासून निर्भिड होते त्यांच्या अंगी असलेले विविध गुण पाहून त्यांना लोकांनी सरदार ही पदवी १९२९ मध्ये दिली. त्यांना लोक लोहपुरुष म्हणत.

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ ला गुजराथ राज्यातील बोरसद तालुक्यातील करमसद या छोट्याशा गावी झाला देशाला स्वातंत्र्य मिळविण्यात आणि संस्थानांच्या विलिनीकरणात त्यांचा हातभार मोठा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले पण संस्थानिक भारतात सामिल व्हायला तयार नव्हते, त्यांना स्वतंत्र राज्य हवे होते पण देशाच्या सार्वभौमत्वासाठी त्यांचे भारतात विलीनीकरण आवश्यक होते म्हणून सरदार वल्लभभाईंनी गोडीगुलाबीने तसेच साम, दाम, दंड या मार्गांचा अवलंब करुन संस्थानांचे भारतात विलीनीकरण केले.

देशाच्या स्वातंत्र्याइतकेच देशाची प्रगती, देशाचा आर्थिक विकास महत्वाचा आहे हे जाणून सरदार वल्लभभाईंनी आपले आर्थिक विचार मांडले. त्यांचे आर्थिक विचार अभ्यासत असतांना महात्मा गांधींची आठवण होते. कारण सरदार वल्लभभाई आणि महात्मा गांधीचे बरेचसे विचार जुळणारे वाटतात.

**स्वदेशीवर जोर:**

महात्मा गांधींप्रमाणेच सरदार वल्लभभाईंनी स्वदेशीचा पुरस्कार केला. त्यांनी असे म्हटले होते- हाताने विणलेली खादी आणि हाताने काढलेला धागा तयार करण्यासाठी विणकरांना जास्तीचे चरखे पुरविले पाहिजे आणि स्वदेशीची

भावना विकसित केली पाहीजे.

सरदार वल्लभभाईंनी व्यापाऱ्यांना विदेशी कापडाचा व्यापार करु नये असे सांगितले. विदेशातून बनविलेल्या वस्त्राचा एक तुकडाही येथे विकला जाणार नाही असा आपण निश्चय केला पाहिजे. त्यांच्या मते आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर कापसाचे उत्पादन होते तर कापसाच्या सहाय्याने वस्त्र बनविले पाहिजे त्यामुळे आपले ६५ कोटी रु. वाचणार आहे. खादीच्या सहाय्याने आपण कोट्यवधी उपाशी लोकांचे पोट भरु शकणार आहोत. भारतातील सर्व कारखाने देशात आवश्यक असणारे कापड तयार करु शकतात. त्यामुळे २० लाख लोकांना रोजगार मिळेल. चरखा निर्मितीत असंख्य लोहारांनाही काम मिळणार आहे. त्यांनी आपल्या एका भाषणात असे म्हटले होते मुंबईतल्या महिलेला चरखा चालविता येणार नाही पण ती गावात बनविलेले उत्पादन खरेदी करुन त्याचा वापर करु शकते त्यामुळे ग्रामीण विकासाला हातभार लागणार आहे.

### ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योग:

सरदार पटेलांनी महिला शक्ती ओळखली होती. त्यांनी महिलांना ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योगाचा विकास करण्यास प्रेरित केले. ते म्हणतात महिला खरेदी विक्रीचे निर्णय घेत असतात. म्हणून महिलांच्या सहकार्याशिवाय गावातील ग्रामोद्योग व कुटीरोद्योगात बनविलेल्या वस्तु विकल्या जाणार नाही. कुटीरोद्योगाला प्रोत्साहन देणे व त्यात प्राण निर्माण करणे महिलांच्या हातात आहे. यंत्रप्रधानतेला त्यांनी विरोध केला. ते म्हणतात यंत्राचे आगमन भारतीय कुटीरोद्योगांना एक शाप आहे. ग्रामोद्योग व कुटीरोद्योगाद्वारे ग्रामीण भागाचा विकास होणार आहे. ग्रामीण भागावरच देशाचा विकास अवलंबून आहे. ग्रामीण भाग अनेक समस्यांनी युक्त असतो म्हणून ग्रामीण भागाचा विकास होणे आवश्यक आहे.

### संपत्तीचे समान वितरण:

सरदार पटेलांच्या मते देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे किंवा संपत्तीचे लोकांमधे समान वितरण झाले पाहिजे. त्यांनी श्रीमंत व्यापाऱ्यांना गरीब लोकांच्या स्थितीत सुधारणा करण्यात सरकारची मदत घेण्यास सांगितले. ते म्हणत आपल्या देशात करोड लोक उपाशी असताना आरामात दोनवेळा पोटभर जेवण करणे हे पाप आहे. त्यांच्या आर्थिक नीतीचे हे मूलतत्त्वच होते की देशातील उत्पादन अधिक झाले पाहिजे आणि त्याचे समान वितरण झाले पाहिजे.

### मंत्र्यांवरील खर्च:

आजही सरकारच्या तिजोरीतील तूटीस मंत्र्यांवरील वारेमाप खर्च हे एक कारण सांगितले जाते. मंत्र्यांचे दौरे, भत्ते, मानधन, निवास, वाहन, संरक्षण यावर प्रचंड खर्च केला जातो. सरदार पटेलांनी या खर्चास विरोध केला होता. त्यांनी प्रधानमंत्र्यांना अशी सूचना केली होती की मंत्र्याच्या निवासस्थानी दोनापेक्षा जास्त सुरक्षारक्षकांची नेमणुक करण्याची गरज नाही. काही राज्यांच्या राज्यपालांनी त्यांच्या भत्यात वाढ करण्यासंबंधी प्रस्ताव सादर केला होता. त्यास सरदार पटेलांनी विरोध केला होता. त्यांनी लोकसभा अध्यक्षांचे वेतन पाचशे रुपये महिना निश्चित केले होते.

### उद्योगांचे राष्ट्रीयीकरण:

उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यास त्यांचा सक्त विरोध होता. त्यांना असे वाटत होते की उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणातून देशाच्या

विनाशाशिवाय काही होणार नाही. ते त्यासाठी इंग्लंडचे उदाहरण देत. इंग्लंड औद्योगिकदृष्ट्या आघाडीचे राष्ट्र होते. तेथे मजूर पक्षाचे सरकार सत्तेवर होते. पण राष्ट्रीयीकरणानंतर तेथील अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करु शकली नाही. उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणापूर्वी उद्योगांची स्थापना होणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते औद्योगिक विकासासाठी उद्योजक आणि कामगार वर्ग यांच्यातील संबंध चांगले असावेत. संप, हरताळ याच्या ते विरुध्द होते.

**यंत्राला विरोध:**

सरदार पटेल आधुनिक विचाराचे होते पण देशातील परिस्थिती पाहून त्यांचा यंत्राला विरोध होता. त्यांच्या मते इंग्रज येण्यापूर्वी भारतात कारखाने नव्हते. तेव्हा भारतात कपडे बनविले जात आणि त्याचा दर्जा जगात बनविलेल्या कपड्यांपेक्षा कितीतरी चांगला होता. भारतातील धोतरजोडा आगपेटीत मावेल असा बनविला जात होता. तसेच भारतातील पैठणी प्रसिध्द होती. परकीय देशांनी यंत्राची निर्मिती करुन यंत्राच्या सहाय्याने कापड बनविणे सुरु करुन त्याची निर्यात भारतात करणे सुरु केले त्यामुळे भारतातील कोटयावधी लोक गरीब झाले. भारतात लोकसंख्या जास्त असल्यामुळे चरख्याशिवाय पर्याय नाही.

**औद्योगिकरण:**

सरदार पटेलांच्या मते कोणताही देश उद्योगांशिवाय समृध्द होऊ शकत नाही. आधुनिक अर्थव्यवस्थेत उद्योगांशिवाय मजूरही जिवंत राहू शकत नाही. आमच्या भारतासाख्या मोठ्या देशात उद्योगांची जास्त गरज आहे. इंग्लंडमध्ये समाजवाद तेव्हा आला जेव्हा इंग्लडने औद्योगिक प्रगती वेगाने केली. औद्योगिक क्षेत्रात मालक मजूर यांचे संबंध चांगले असावेत. मजुरांनी संप, हरताळ मार्गाचा अवलंब करुन उत्पादनात खंड निर्माण करु नये. मालक मजूर यांच्यातील मतभेद औद्योगिक प्रगतीत अडथळे निर्माण करतात. अर्थात याचा अर्थ मजुरांनी अन्याय सहन करावा असा नाही. तर मजुरांनी आपल्या मागण्यांसाठी मध्यस्थी करावी. संप, हरताळ, केल्यामुळे त्या दिवसांच्या वेतनाला मजुरांना मुकावे लागते तसेच त्या दिवशी जे उत्पादन झाले असते ते होत नाही कामगार संघटना व मालक वर्ग यांच्यात समेट घडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कामगारवर्गाला ते म्हणत कर्तव्य भावनेने काम करा. स्वत:चे स्थान अबाधित ठेवण्यासाठी घातक मार्गाचा स्वीकार करु नका. वेतनवाढ हवी असेल तर प्रथम उत्पादनक्षमता वाढवा. त्यांच्या मते देशात जास्तीत जास्त उत्पादन झाले तर आपल्याला आयात करावी लागणार नाही, देश संपन्न होईल.

**कृषी विकास:**

सरदार पटेलांनी अन्न आणि वस्त्राबाबत देश आत्मनिर्भर झाला पाहिजे असे म्हटले. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले होते की, आपल्या प्रयत्नाद्वारे त्यांनी जास्तीत जास्त उत्पादन करावे. त्यातून जास्तीत जास्त सरकारला देण्याचा प्रयत्न करावा. अन्नधान्याच्या मागणीइतके उत्पादन देशात होणे आवश्यक आहे शेतकऱ्यांनी दृष्टीकोण बदलणे गरजेचे आहे. त्यांनी केवळ श्रम करु नये तर मनापासून शेती करावी त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होऊन आयातीची गरज भासणार नाही. शेतकऱ्यांनी केवळ स्वत:पुरते पीक काढू नये. जी शहरे व गावे त्यांना कपडालत्ता पुरवितात त्यांना त्यांनी

अन्नधान्य पुरविले पाहिजे. स्वातंत्र्याची पहिली निकड अन्नधान्याच्या बाबतीतील स्वयंपूर्णता ही आहे. तसेच शेतकऱ्यांनी आपल्या मालाला जास्त भाव मिळावा म्हणून प्रयत्न केला पाहिजे.

### आर्थिक संकट निर्मूलनार्थ विचार:

अर्थव्यवस्था भांडवलाशाही असो की समाजवादी असो, विकसित असो की अविकसीत असो, प्रत्येक अर्थव्यवस्थेला आर्थिक संकटाला सामोर जावे लागते. आर्थिक विकासाचा दर स्थिर नसतो तो वारंवार बदलत असतो. अर्थव्यवस्थेत तेजी मंदीचे चक्र आलटून पालटून असते. त्याचा परिणाम आर्थिक विकासाच्या दरावर होत असतो. सरदार पटेलांनी असे म्हटले होते की आपल्या अर्थव्यवस्थेला चलनवाढीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे, अनेक प्रयत्न करुनही आपण ही समस्या सोडवू शकलो नाही. ही समस्या सोडविण्यासाठी कमी किंमतीत अधिकाधिक उत्पादन करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या वितरण प्रणालीत आपल्याला सुधारणा केली पाहिजे की ज्यामुळे उपभोक्त्यांपर्यंत त्यांना आवश्यक असलेल्या वस्तू पोहोचतील. देशातील नागरिकांनी देशाच्या प्रति खरी निष्ठा ठेवली आणि देशाच्या व्यापक हितासाठी आपला स्वार्थ बाजूला ठेवला तर देशासमोरील सर्व आर्थिक समस्या सफलतापूर्वक दूर होतील यात संदेह नाही. अहमदाबाद येथे ३१ ऑक्टोबर १९५० रोजी एका सार्वजनिक सभेत त्यांनी व्यापाऱ्यांच्या माल दडवून ठेवण्याच्या कृतीचा विरोध केला. कारण व्यापारी कृत्रिम टंचाई भासवून किंमत वाढ करतात.

### बेरोजगारी निर्मूलन:

सरदार पटेलांनी देशातील बेराजगारीचाही विचार केला. भारतात वाढत्या लोकसंख्येची समस्या असल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न गंभीर आहे. आजही भारतीय अर्थव्यवस्थेसमोर बेरोजगारीचे निर्मूलन कसे करावे हा फार मोठा प्रश्न आहे. बेरोजगारी निर्मूलनासाठी त्यांनी औद्योगिकरण हा मार्ग सांगितला. औद्योगिकरणाच्या माध्यमातून बेरोजगार लोकांना काम मिळेल. अन्यथा संकटाला भारतीय अर्थव्यवस्थेला तोंड द्यावे लागेल.

### उदारीकरणाबाबत विचार:

सरदार पटेलांनी उदारीकरणाबाबत आपले विचार मांडले होते. अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करावे या मताचे ते होते. मंत्रीमंडळाच्या बैठकीत त्यांनी पंडित नेहरुंसमोर अनेकवेळा उदारीकरणाचे धोरण मांडले पण काही कारणास्तव उदारीकरणाच्या धोरणाचा तेव्हा स्वीकार झाला नाही. १९८५-८६ मधे मात्र राजीव गांधी पंतप्रधान असतांना त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करण्यास सुरवात केली. १९९१ च्या आर्थिक सुधारणेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत जाहीरपणे उदारीकरणाचा स्वीकार केला.

### संरक्षण साहित्य निर्मिती:

प्रसिध्द अर्थतज्ज्ञ ॲडम स्मिथने असे म्हटले होते की देशाच्या आर्थिक सामर्थ्याइतकेच देशाचे सार्वभौमत्व महत्वाचे असते म्हणून देश युध्दसाहित्याने समृध्द असावा. याच विचाराचे सरदार पटेल होते. त्यांच्यामते युध्द साहित्याच्या बाबतीत देशाने इतर देशांवर अवलंबून राहू नये. युध्द साहित्य, शस्त्रास्त्रे तयार करणारे कारखाने देशातच असावे आणि त्यांची निर्मिती देशातच करण्यात यावी.

### सरदार वल्लभाई पटेल यांचे विचार आणि

**वर्तमान कालीन स्थिती:**

सरदार वल्लभाई पटेल यांचे विचार अभ्यासले असता असे लक्षात येते की त्यांचे अनेक विचार आजही लागू होतात. त्यांनी सांगितलेल्या अनेक उपायांद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील समस्या सुटण्यास मदत होणार आहे. आजही दारिद्र्य निर्मूलनासाठी ग्रामोद्योगावर शासन भर देत आहे. संपत्तीचे समान वितरण करण्यासाठी प्रत्येक आर्थिक नियोजनात आर्थिक विषमता कमी करणे हे एक उद्दिष्ट ठेवले जाते. करविषयक व खर्चविषयक धोरणाद्वारे संपत्तीचे समान वितरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मंत्र्यावर केला जाणार खर्च गेल्या काही वर्षात प्रचंड वाढला आहे. राजकारण पैसे कमविण्याचा अड्डा बनला आहे.ही समस्या सरदार पटेलांनाही जाणवली होती. त्यांनी त्यावर आक्षेप घेतला होता. कृषी विकास, औद्योगिक विकास, ग्रामीण विकास यावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून आहे असे मत त्यांनी मांडले होते. त्यावेळेस त्यांनी जे उदारीकरणाचे धोरण मांडले होते ते तेव्हा तुडवले गेले, त्याचा स्वीकार करण्यात आला नाही पण आज आर्थिक सुधारणेच्या नावाखाली त्याच उदारीकरणाच्या धोरणाला जवळ करण्यात आले आहे.

सरदार व वल्लभभाई पटेल म्हणत आपल्या देशात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते तर कापडाचे उत्पादनही आपल्या देशात बनविले पाहिजे. त्यामुळे आपल्या देशातील लोकांना रोजगार मिळेल. आजही आपल्या देशात कृषीप्रधान उद्योगांचा विकास करण्यात आला तर उत्पादनात व रोजगारात तर वाढ होईलच त्याचबरोबर आयातीत घट होउन प्रतिकुल व्यवहार तोलाची समस्या सुटण्यास मदत होईल.

सरदार वल्लभभाई पटेल यांचा संप, हरताळ याला विरोध होता. ते म्हणतात वेतनवाढीची अपेक्षा करतात तर आपली कार्यक्षमताही वाढवा. आज सरकारी क्षेत्राचे जे खाजगीकरण होत आहे याला सरकारी क्षेत्रातील अकार्यक्षमता जबाबदार आहे. सरकारी क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी त्यांना मिळणाऱ्या वेतनाईतके काम करीत नाही. त्यांच्या कामचुकारपणामुळे नागरिकांना आपली कामे पूर्ण करण्यासाठी फार मोठा त्रास सहन करावा लागतो.

उत्पादकांनी किंवा विक्रेत्यांनी केलेली मालाची कृत्रीम टंचाई हे एक कारण चलनवाढीचे आहे. उत्पादक किंवा विक्रेता वर्ग मालाला जास्त भाव मिळावा म्हणून मालाची कृत्रीम टंचाई भासवत असतो. त्यामुळे ग्राहकांना निकृष्ट प्रतीचा मालही जास्त किंमतीला खरेदी करावा लागतो. व्यापाऱ्यांच्या या वृत्तीचा निषेध सरदार वल्लभभाई पटेलांनी केला होता.

सरदार पटेलांचे एक महत्वाचे वाक्य असे होते देशातील नागरिकांनी देशाच्या व्यापक हितासाठी आपला स्वार्थ बाजूला ठेवला तर देशासमोरील सर्व आर्थिक समस्या सुटण्यास मदत होईल. आज देशासमोर ज्या अनेक समस्या आहेत त्याला कारण म्हणजे लोक आपल्या स्वार्थी वृत्तीमुळे, स्वहितासाठी देशाला लुबाडत आहे. प्रत्येकाने आपला स्वार्थ सोडला, देशहिताचा विचार केला तर भ्रष्टाचार कमी होईल, निस्वार्थीपणाने काम केले जाईल आणि त्यातून देशाची आर्थिक प्रगती वेगाने होऊन देशासमोरील आर्थिक समस्या सुटण्यास मदत होईल.

सरदार वल्लभभाई पटेल यांचे आर्थिक

विचार अतिशय अभ्यासपूर्ण आहे त्यातील बरेचसे विचार आजही लागू होण्यासारखे आहेत. अर्थव्यवस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने त्यांनी अनमोल असे विचार दिले आहेत.

**निष्कर्ष:**

सरदार वल्लभभाईंच्या आर्थिक विचाराच्या अभ्यासातून खालील निष्कर्ष निघतात. १) सरदार वल्लभभाई पटेल आणि महात्मा गांधीचे विचार बरेचसे मिळते जुळते आहे. २) सरदार वल्लभभाईंच्या उदारीकरणाच्या विचारातून त्यांचे विचार आधुनिक, परिस्थितीनुसार बदलणारे आहेत असे दिसते. ३) सरदार वल्लभभाईंचा स्वदेशीवर भर होता. ४) सरदार वल्लभभाईंचा मंत्र्यांवरील वारेमाप खर्चाला विरोध होता. ५) सरदार वल्लभभाईंच्या मते आर्थिक संकट दूर करायचे असेल तर लोकांनी आपला स्वार्थ बाजूला ठेवून देशाच्या प्रति खरी निष्ठा ठेवणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची:**


१. सं.पी.एन. चोपडा, प्रभा चोपडा, *आर्थिक एवं विदेश नीती*, २०१०, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली, पृ.२७, २९, ३१.

२. भास्कर महाजन, *लोहपुरुष*, प्रथम आवृत्ती,३१ ऑक्टोंबर २०१० तेजस प्रकाशन, खिरोदा, पृ.१६, २०३.

३. केवळ एल. पंजाबी, अनुवाद विश्वास भोपटकर, प्रथम आवृत्ती २००७, प्रतिभा प्रकाशन, पृ. २६८, २६९.


## श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य व सोलापूर विद्यापीठात अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.चंद्रकांत भानुमते यांचे हृदयविकाराच्या आजाराने वयाच्या ४२ व्या वर्षी ०४ जानेवारी २०१७ रोजी दु:खद निधन झाले. डॉ.चंद्रकांत भानुमते यांनी कृषि विपणन तसेच विडी उद्योगातील मजुरांची आर्थिक स्थिती या विषयावर संशोधन केलेले आहे. त्यांना मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

अर्थसंवाद

# जागतिकीकरणाचे परिणाम व आव्हाने

सुरेखा अर्जुन फाकडे, पेठ वडगांव,
श्रीमती सुशिलादेवी म. देसाई कन्या महाविद्यालय,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी८००७२७९७४१

समस्या:

१९९१ मध्ये भारताने आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला आणि भारतीय अर्थव्यवस्था जागतिकीकरणाकडे खेचली गेली. जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर भारत सरकारने त्याप्रमाणे आपल्या अर्थव्यवस्थेत बदल केले. आयातीवरील संख्यात्मक निर्बंध दूर करण्याची अट जागतिकीकरणाच्या धोरणात समाविष्ट असल्यामुळे भारताने १९९१ पासून आयातीवरील निर्बंध कमी करण्यास प्रारंभ केला. त्यानंतर १९९६-९७ मध्ये ४८८, १९९७-९८ मध्ये ३८१, १९९८-९९ मध्ये ८९४ याप्रमाणे १७६३ वस्तुंच्या आयातीवरील निर्बंध उठविण्यात येऊन या वस्तुंची आयात खुली करण्यात आली. त्याचप्रमाणे परकीय भांडवलात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त प्रवेश देण्यात येऊ लागला. शेती अनुदानावरील कपात करण्यात आली. परंतु या बदलाचे शेतीवर सुरूवातीच्या काळात विपरित परिणाम झाले आहेत.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये काही मोठे बदल घडून आले. साधारणतः १९८५ नंतर वेगाने घडून आलेल्या या बदलांना जागतिकीकरण असे नाव मिळाले व त्यामुळे बहुतेक सर्व देशांच्या अर्थव्यवस्था प्रभावित झाल्या. जगातील विविध राष्ट्रीय अर्थव्यवस्थांना परस्पर जोडणारी, त्यांच्यामध्ये वस्तू-सेवा, भांडवल, तंत्रज्ञान, श्रम यांचा मुक्त प्रवाह सुरू करण्याची एक रचना म्हणजे जागतिकीकरण.

ॲडम स्मिथ यांच्या काळापासून मुक्त व्यापाराच्या तथाकथित लाभांचा जो हिरिरीने पुरस्कार केला जात होता, त्याचेच सुधारित व आधुनिक रूप म्हणजे जागतिकीकरण होय. मुक्त व्यापाराच्या पुरस्कारामागे तत्कालिन वसाहतवादी राष्ट्रांचा

निहित स्वार्थ होता तर आजच्या जागतिकीकरणामागे निवडक विकसित देशांचे आर्थिक हितसंबंध आहेत. त्यावेळी विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झालेली नव्हती. या क्रांतीमुळे सर्व संदर्भ बदलले असून, संपूर्ण जग अतिशय जवळ आले आहे. त्यामुळे जागतिकीकरणाची व्याप्ती मोठी आहे, त्यातूनच विश्वग्राम (Global Village) ही संकल्पना पुढे आली. प्रस्तुत लेखात जागतिकीकरणामुळे शेती आणि ग्रामीण विकासावर झालेले परिणाम, आर्थिक सुधारणानंतर भारतीय शेतीची स्थिती, भारतीय शेतीसमोर असलेल्या अडचणी व सद्य स्थितीतील आव्हाने, उपाय यांचा आढावा घेतलेला आहे.

प्रस्तुत लेखाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१. जागतिकीकरणामुळे शेती आणि ग्रामीण विकासावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२. आर्थिक सुधारणानंतर भारतीय शेतीची स्थिती अजमावणे.

३. भारतीय शेतीसमोर असलेल्या अडचणींचा अभ्यास करणे.

४. सद्यस्थितीतील आव्हाने व उपाय सुचविणे.

**शेती आणि ग्रामीण विकासावरील परिणाम:**

भारतातील बहुसंख्य लोकांच्या जीवनाचा व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार शेती हाच आहे. शेतीप्रधान ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरण यांचा जवळचा संबंध आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांचा मुक्त संचार १९८५ नंतरचा असला तरी प्रारंभ मात्र १९७० च्या दशकातील शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानात आढळतो. या हरितक्रांतीच्या निमित्ताने ॲग्रो बिझनेस असे गोंडस नाव घेऊन या कंपन्यांनी विकसनशील देशांच्या ग्रामीण भागात प्रवेश केला. खते, बियाणे, पीक संरक्षणाचे उपाय, किटकनाशके या बाबतीत स्वावलंबी असलेला शेतकरी या कंपन्यांच्या आधीन झाला. शेतीवरील खर्च वाढत गेला पण पिकांच्या उत्पादकतेत अपेक्षित वाढ झाली नाही. परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावली. तसेच विदेशी कंपन्या हंगामी उगवण शक्ती असणारे कमी फायदेशीर असणारे बियाण्यांची विक्रेत्यांना आमिष देऊन विक्री केली. वास्तविकत: शेती उत्पादनात बियाणे आणि मशागत या एकमेकांना पूरक बाबी असून ३०% उत्पादन वाढ ही वापरलेल्या बियाण्यांवर तर ७०% उत्पादन वाढ ही मशागतीच्या तंत्रावर अवलंबून असते. ही वस्तुस्थिती शेतकऱ्यांना सांगितली जात नाही. प्रतिकारक्षमता नसणारी किटकनाशके बाजारात खपवली गेली. शेतीला लुटण्याच्या या पध्दतशीर तंत्रामुळे विकसनशील देशातील शेतकऱ्यांचा खर्च वाढला.

साधारणत: जागतिकीकरणाच्या पहिल्या दशकात जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे उपलब्ध शेतजमीन पर्यायी उपयोगांकडे वाढविण्यात आल्या. भारतीय संसदेने विशेष आर्थिक क्षेत्रा चा कायदा २००५ मध्येच मंजूर केला. जागतिकीकरणाच्या काळात सेझ, करार शेती, निगम शेती अशा विविध रूपांनी बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशांच्या ग्रामीण क्षेत्रात स्वार्थासाठी प्रवेश करीत आहेत. पूर्वी आपल्यासाठी शेती ही काळी माय होती. आज ती व्यापारी फायद्याचे व झटपट श्रीमंत होण्याचे (जमीन विकून) साधन झाली आहे. उद्या मात्र

मोठ्या कंपन्यांसाठी ती शोषणाचे साधन झालेली असेल. रस काढून ऊसाचे चिपाड फेकून द्यावे तशी सुपीक जमिनीची अवस्था होईल हे नुकसान दीर्घ काळापर्यंत भरून न निघणारे असेल. परिणामतः जमिनीची मालकी जाण्यासोबत तिचा कस जाण्याचीही शक्यता आहे. तसेच यातून नव-वसाहतवाद जन्मण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जागतिकीकरणामुळे विकसनशील देशांचा वेगाने विकास होईल असे वाटत होते. पण तसे झाले नाही. मर्यादित अर्थाने केवळ शहरी भागाचा विकास झाला. उच्चशिक्षीत मध्यम वर्गाला आकर्षक पॅकेजचा रोजगार मिळून त्यांची राहणी उंचावली. परंतु बहुसंख्य अशा सामान्य वर्गाला जागतिकीकरणाने काय दिले हा खरा प्रश्न आहे. प्रत्यक्षात मात्र इ.स. २००० मध्ये अनुसूचित जातींचे ३६% लोक, तर अनुसूचित जमातींचे ४४% लोक दारिद्र्य रेषेखाली होते, मागासवर्गीय लोकांना, विस्थापित होत असलेल्या आदिवासींना जागतिकीकरणामुळे कोणताही फायदा झालेला नाही.

जागतिकीकरणामुळे आयात-निर्यात निर्बंध अतिशय शिथिल झाले. पण त्याचा फायदा विकसनशील देशांना झाला नाही. प्रत्यक्षात व्यापाराची सर्व सूत्रे आता (विकसित देशांचे वर्चस्व असलेल्या) जागतिक व्यापार संघटनेच्या हाती एकवटलेली आहेत. या संघटनेच्या करारामध्ये शेतीला दिल्या जाणाऱ्या अनुदानांचे तीन खण निर्देशित केले आहेत.

अ. पिवळा खण - या गटात समाविष्ट करण्यात आलेली अनुदाने विकसित देशांमध्ये कृषी उत्पादन मूल्याच्या ५% व विकसनशिल देशांमध्ये १०% पेक्षा जास्त नसावीत आणि जास्त असल्यास रद्द करावीत असे संघटनेच्या करारात म्हटले आहे. शेतकऱ्यांना किंमतीच्या रुपाने, उत्पादन-परिमाण निश्चित करण्याच्या दृष्टीने किंवा व्यापाराला अनुचित वळण देण्याच्या दृष्टीने जी अनुदाने दिली जातात ती पिवळ्या खणात असून त्यांची मर्यादा १०% आहे.

ब. निळा खण - शेतकऱ्यांना उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून दिली जाणारी अनुदाने आणि पिवळ्या खणातील अनुदाने या गटामध्ये येतात व ही अनुदाने टप्प्याटप्प्याने कमी केली जातील अशी अपेक्षा आहे.

क. हिरवा खण - जी अनुदाने व्यापाराला अनुचित वळण देत नाहीत, जी शेतमालाच्या किंमतीला आधार देत नाहीत व जी शासकिय निधीतून दिली जातात त्यांचा समावेश हिरव्या खणात होतो. या अनुदानावर संघटनेने काही मर्यादा घातलेली नाही.

जागतिक व्यापार संघटनेने अनुदानांमध्ये जे नियम केले आहेत ते प्रत्यक्षात विकसित देशच डावलत आहेत व स्वतःच्या शेतीचा फायदा व इतरांचे नुकसान करीत आहेत. पिवळ्या खणातील जी अनुदाने अतिरिक्त असल्यामुळे रद्द करणे अपेक्षित होते, त्यांना अमेरिका व युरोपीय गटाने हिरव्या खणात दाखविणे सुरू केले आणि वाढ सुध्दा केली. त्यामुळे तेथील शेतकरी स्वतःचा माल स्वस्त दराने निर्यात करू लागला. परिणामतः जागतिक बाजारात शेतमालाच्या किमती कोसळल्या. अशा परिस्थितीत विकसनशील देशांमधील शेतकऱ्यांना शेतमालाची निर्यात करणे अशक्य झाले. अमेरिकेच्या या धोरणाविरूध्द ब्राझीलने संघटनेच्या लवादाकडे तक्रार केली असता त्या लवादानेही मान्य केले की, या किंमत

दाबण्याच्या प्रकारामुळे ब्राझीलच्या कापूस निर्यातीवर विपरित परिणाम झाला आहे. १९९७ च्या मानवी अहवालात तर स्पष्टपणे म्हटले आहे की, शेतमालाची निर्यात हेच असे एकमेव क्षेत्र आहे जेथे राशीपातनाच्या व्यापार प्रथेला कायदेशीर म्हणून स्वीकारले जात आहे. २००७ मध्ये ब्रिक राष्ट्रांच्या (Brazil, Russia, India, China, South Africa) नेतृत्वाखाली १०० देशांनी विकसित देशांच्या धोरणाविरूध्द आवाज उठविला तेव्हा अमेरिकेने स्पष्टपणे सांगितले की, जागतिक व्यापार संघटनेच्या कराराचे काहीही झाले तरी चालेल. पण शेतीची अनुदाने कमी केली जाणार नाहीत. म्हणजे विकसित देशांमधील शेतकऱ्यांना अनुदानाचा भक्कम पाठिंबा असल्याने ते शेतमालाच्या निर्यातीत पुढे राहतात आणि त्यांच्या मानाने कमी अनुदाने मिळणारा इतर देशातील शेतकरी मात्र स्पर्धेमध्ये मागे पडतो. अर्थात जागतिकीकरणामुळे शेतमालाच्या निर्यातीच्या संधी वाढल्या आहेत हे म्हणणे प्रत्यक्ष परिस्थितीशी जुळणारे नाही.

जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार निरनिराळ्या देशांमध्ये बौध्दिक संपदा अधिकाराचे कायदे (TRIPS) ; Trade Related Intellectual Property Rights अस्तित्त्वात आले आहेत. त्यांचा संबंध मुख्यतः औषध निर्माण आणि शेती यांच्याशी आहे. म्हणजे या क्षेत्रांमध्ये जो कोणी बौध्दिक श्रम खर्च करून एखादे उपयुक्त संशोधन करेल त्याला त्या वस्तूचे एकस्व म्हणजे पेटंट प्राप्त करण्याचा अधिकार राहील. अर्थात ती क्रिया किंवा वस्तू जर इतरांना वापरायची असेल तर त्या एकस्वधारकाला स्वामित्वधन (रॉयल्टी) द्यावे लागेल. याचा परिणाम म्हणजे औषध निर्माण क्षेत्रातील संशोधन हे अतिशय खर्चिक असल्याने, बहुराष्ट्रीय कंपन्याच ते करू शकतील व रॉयल्टीच्या रूपाने करोडो रुपये त्यांना द्यावे लागतील. दुसरा परिणाम म्हणजे विकसनशील देशामधील शेतकरी आपल्या भौगोलिक परिस्थितीशी जुळणारी पिके घेतात व तसे जैवविविधता पूरक स्थानिक वाण विकसित करतात. सर्वसाधारण शेतकऱ्याला कायद्याची जाणीव नसल्याने ते या वाणाची नोंदणी करण्याच्या भानगडीत पडत नाहीत. पण हेच वाण मोठ्या कंपन्यांनी घेऊन त्याचे पेटंट घेतले तर शेतकऱ्यांच्या, शेतीच्या अधिकारावरच गदा येईल. सारांश शेतकऱ्यांना कंपनीचे पेटंट घेतलेले बियाणे वापरण्याशिवाय पर्याय न राहिल्याने ते पूर्णपणे परावलंबी होतील, कर्जबाजारी होतील, आणि आत्महत्त्येच्या स्थितीत येतील.

## आर्थिक सुधारणानंतर भारतीय शेतीची स्थिती:

१९९१ मध्ये भारताने आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला आणि भारतीय अर्थव्यवस्था जागतिकीकरणाकडे खेचली गेली. जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर भारत सरकारने त्याप्रमाणे आपल्या अर्थव्यवस्थेत बदल केले. १९९६-९७ मध्ये ४८८, १९९७-९८ मध्ये ३८१, १९९८-९९ मध्ये ८९४ याप्रमाणे १७६३ वस्तुंच्या आयातीवरील निर्बंध उठविण्यात येऊन त्या वस्तूंची आयात खुली करण्यात आली. त्याचप्रमाणे परकीय भांडवलात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त प्रवेश देण्यात येऊ लागला. परंतु या बदलाचे शेतीवर विपरित परिणाम होत आहेत. जागतिकीकरणामुळे भारतीय शेतकरी भरडला जात आहे. भारतीय शेती संकटात आली आहे.

जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर विपरित परिणाम होत आहेत.

जागतिकीकरणामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत शिरकाव केलेला आहे. अमेरिकेतील कारगिल कॉन्टिनेन्टल ग्रेन आणि युरोपमधील मोठ्या कंपन्या अशा एकूण पाच कंपन्यांच्या हाती जगातला ८०% धान्य बाजार आहे. या कंपन्या आर्थिक ताकदीच्या बळावर त्या संपूर्ण जगावर वर्चस्व प्रस्थापित करू शकतात. शेतमालाचा व्यापार करणारा जगातील सर्वात मोठा देश म्हणून अमेरिकेकडे पाहिले जाते. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या करार करून कंत्राटी पध्दतीने शेती करत आहेत. स्वदेशी कंपन्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागत आहे. औद्योगिक क्षेत्राची परकीय कंपन्यांमुळे जशी स्थिती झाली आहे तशीच शेतीचीही होणार आहे.

डंकेल प्रस्तावानुसार भारत सरकारने शेती अनुदानात प्रचंड कपात केली आहे. जपान एकूण कृषी उत्पन्नाच्या ७२.५% अनुदान शेतीला देतो. चीन ३४%, अमेरिकेकडून २९% व भारताकडून फक्त ३% अनुदान दिले जाते. वास्तविक भारतीय शेतीला अनुदानाची नितांत गरज आहे. भारतातील जवळजवळ ८०% शेतकरी छोटे व मध्यम आहेत. जागतिकीकरणाच्या या वाऱ्यात छोटे शेतकरी टिकू शकणार नाहीत. त्यांच्या दारिद्र्यात वाढ होईल.

भारतीय शेतीच्या विकासाच्या सर्वसाधारण दरात जागतिकीकरणानंतर वेगाने घट झाल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या सुरवातीच्या काळात म्हणजे १९९०-९२ या काळात विकासदर १.३ टक्के झाला. आठव्या योजनेत म्हणजेच १९९२ ते ९७ या काळात हा दर वाढून ४.७ टक्के झाला. नवव्या योजनेच्या काळात १९९२-२००२ या काळात तो २.१ टक्के झाला. २००४-०५ मध्ये हा दर आणखी कमी होऊन १.१ टक्के झाला.

जागतिकीकरणानंतर अन्नधान्य उत्पादनात निश्चित वाढ झाली असली तरी सरासरी अन्नधान्य उत्पादन वाढीचा दर घटत आहे. याचे कारण पीक संरचनेत बदल झाले आहेत. शेतकरी व्यापारी पिकांकडे वळले आहेत. त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात घट होत आहे. त्यातून अन्नधान्याची मागणी व पुरवठा यात असंतुलन निर्माण होऊन किंमत वाढीची परिस्थिती निर्माण होत आहे. प्रसंगी आयात करावी लागून व्यवहार तोलावर ताण पडण्याची शक्यता आहे.

वरील परिणामांखेरीज जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रातील बेरोजगारीत वाढ होत आहे. तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत.

### सद्यस्थितीतील आव्हाने:

भारतातील मोठ्या लोकसंख्येला अजूनही रोजगारासाठी शेती हाच पर्याय आहे. ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक रोजीरोटीसाठी शेतीवर अवलंबून आहेत. या क्षेत्रात रोजगार कमावणाऱ्या लोकांचे प्रमाण १९९३-९४ मध्ये ६४.८ टक्के होते ते २०११-१२ मध्ये ४८.९ टक्के झाले पण अजूनही जास्तीत जास्त लोकांना रोजगारांसाठी शेतीवरच अवलंबून रहावे लागते.

हवामान बदलामुळे होणाऱ्या नुकसानीला तोंड देण्यासाठी शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांच्या कल्याणासाठी तसेच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक बाबींचा विचार करावा लागेल. उत्पादनशीलता वाढवणे, शेतकऱ्यांच्या मालाला किफायतशीर दर मिळवून देणे, पिक

फेरपालट करणे, व्यापारी पिके घेणे यासाठी सरकार विविध धोरणे व उपाय योजत आहे. अनेक योजना सुरू केल्या आहेत. शेतीपुढील आव्हानांचा विचार करतानाच शेतकरी कल्याणावर भर दिला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक योजना जाहीर केल्या आहेत. उदा. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, प्रधानमंत्री कृषी विमा योजना, मृदा आरोग्य कार्ड योजना, ईशान्येकडील परंपरागत कृषी विकास योजना व सेंद्रीय शेती, एकात्मिक राष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजारपेठ, किंमत स्थिरीकरण निधी, राष्ट्रीय गोकुळ योजना, राष्ट्रीय कामधेनू पैदास केंद्र, नीलक्रांती इ.

या सर्व योजनांसाठी सरकारने २०१६-१७ या वर्षात ३५,९८४ कोटी रुपयांची तरतुद केली आहे. त्या अंतर्गत २८.५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचिताखाली आणणे, अपूर्ण असलेल्या ८९ सिंचन योजना त्वरित कार्यान्वित करणे, नाबार्ड अंतर्गत २० हजार करोड रुपयांचा प्रारंभिक निधी देऊन त्या निधीचा सिंचित निधी म्हणून वापर केला जाणार, मनरेगा अंतर्गत ५ लाख शेततळे, विहिरींची निर्मिती, सेंद्रीय शेतीला प्राधान्य, १४ कोटी शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्ड, मृदा बीज परिक्षण सुविधा, ई-बाजारासाठी कृषि विपणन ई प्लॅटफॉर्म, शेतकऱ्यांना कृषी कर्जावरील व्याज सवलतीसाठी १५ हजार कोटींची तरतूद, पंतप्रधान विमा योजना यासाठी ५,५०० कोटी रुपयांची तरतूद, पशुधन संजीवनी, नकुल स्वास्थपत्र, ई पशुधन हाट आणि राष्ट्रीय देशी जेनोमिक केंद्रासाठी ८५० कोटी रुपये देऊन डेअरी योजना कार्यान्वित केल्या जातील. खताची सबसिडी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे, तसेच रु.९ लाख कोटी कृषी कर्जाचे ध्येय, दाळ उत्पादनाला प्रोत्साहन, २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट करण्यासाठी प्रयत्न, सेवा कर अर्धा टक्का लावलेला आहे.

अर्थसंकल्पातील तरतुदींचा एकंदरीत अभ्यास केला तर शेतकऱ्यांचे मुलभूत प्रश्न सुटतील असे वाटत नाही. शेतकऱ्यांचा शेतमाल विकून त्यातून शेतीचा उत्पादन खर्चही भरून निघत नाही. त्यामुळे शेतीची नापिकी, कर्ज अशा अनेक कारणांमुळे शेतकरी आत्महत्येकडे वळतो आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून कृषी अर्थव्यवस्थेला सरकारच्या धोरणाचा केंद्रबिंदू ठरविणे आवश्यक ठरते.

चालू अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे उत्पन्न पाच वर्षात दुप्पट केले जाईल याचे आश्वासन दिले आहे. पण त्या संदर्भात ते दुप्पट कसे केले जाईल यासाठी कोणताही ठोस कृती कार्यक्रम दिलेला नाही. पाच लाख शेततळ्यांच्या संदर्भात केलेली घोषणा पाहता एवढी शेततळे संपूर्ण देशासाठी कमी पडतात. कोरडवाहू क्षेत्रासाठी सिंचन व्यवस्थेत बदल करणे आवश्यक असताना त्याबाबत कोणताही ठोस कार्यक्रम दिसत नाही. तसेच स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारणे आवश्यक आहे.

जी.एम. तंत्रज्ञान घेणे - शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी जी.एम. तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे.

भारताला विकासाच्या दृष्टीने आर्थिक व सामाजिक क्षेत्रात बरीच मजल गाठावयाची आहे. अन्न, वस्त्र, निवारा, उद्योग, शिक्षण, आरोग्य, शेती, आधारभूत संरचना अशा विविध क्षेत्रात गुंतवणुकीची गरज आहे. सध्या भारतासमोर अनेक समस्या आहेत. म्हणून अशा परिस्थितीत

विदेशांतर्फे होणारी गुंतवणूक वाढविणे हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. जागतिकीकरणाचा, मुक्त वातावरणाचा फायदा उठविण्यात भारतीय कंपन्याही मागे नाहीत. १९९५ अखेर १८५ भारतीय कंपन्या विदेशात कार्यरत होत्या. बहुराष्ट्रीय कंपन्या यापुढेही वाढत जाणाऱ्या आहेत.

संरक्षित उद्योगांनी आधुनिकीकरणाकडे दुर्लक्ष केले आहे. गुणवत्ता वाढविण्याबाबत फारसे प्रयत्न नाहीत. आजारी उद्योगांचे प्रमाण सतत वाढत आहे. संरक्षणामुळे उद्योगांना स्पर्धेची भीती वाटते. म्हणून या सर्व दुखण्यांवर आधुनिकीकरण हा उपाय ठरतो.

शेती आणि शेती आधारित उद्योगांनी आधुनिकीकरणासाठी नवे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात नवीन कारखाने काढले तर त्यांनी भारतीयांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती, प्रशिक्षण स्थानिक कामगारास द्यावयास हवे. तंत्रज्ञान आयात करताना, संयुक्त उपक्रम सुरू करताना अशा प्रकारच्या अटी घालावयास हव्यात. स्पर्धेची टांगती तलवार असल्याशिवाय स्वदेशी उद्योग कार्यक्षम होणार नाहीत. तसेच जागतिकीकरण ही उपभोक्त्यांच्या दृष्टीनेही चांगली व उपयुक्त गोष्ट आहे. कारण उपभोक्त्यांना कमी किंमतीत दर्जेदार व आकर्षक वस्तू मिळू शकतात. उत्पादकांना नवीन वस्तूंची, नव्या तंत्रज्ञानाची, नवीन प्रणालीची माहिती मिळते व जाणीव होते. स्पर्धेमुळे या गोष्टी स्वीकाराव्याच लागतील. आर्थिक प्रगतीकरिता या गोष्टी अपरिहार्य आहेत. सृजनशील विध्वंस हे आर्थिक प्रगतीचे स्वरूप आहे. म्हणून त्याचा स्वीकार करण्यातच शहाणपणा आहे. यामुळे बेकारी येते पण नव्या क्षेत्रात रोजगारीच्या संधी उपलब्ध होतात.

बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे आर्थिक वसाहतवाद येईल अशी भीती व्यक्त करण्यात येते. परंतु ही नाकर्तेपणाची भीती आहे. कोरिया, चीन, तैवान, सिंगापूर या देशांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे सार्वभौमत्त्वाला धक्का लागलेला नाही. याउलट या देशांचे औद्योगिकरण वेगाने होऊन ते भारताच्या पुढे गेले आहेत. बेकारीत वाढ होईल, संस्कृती नष्ट होईल ही भीतीही अनाठायी आहे.

भारतानेही शेतमाल विक्री व्यवस्थेवर, जाहिरातीवर, विक्री तंत्रावर अधिक भर दिला पाहिजे. स्वदेशीचा खरा अर्थ म्हणजे प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करणे, उत्पादनाची गुणवत्ता वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे, वस्तूंच्या किंमती कमी करणे असा आहे. याकरिता बहुराष्ट्रीय कंपन्यांचा कसा उपयोग करून घ्यावयाचा याबाबत हुशारी व दक्षता बाळगावयास हवी.

जी.एम. तंत्रज्ञानामुळे जागतिक कृषी क्षेत्राचे उत्पन्न मोठया प्रमाणात वाढले आहे. जी. एम. पिकाच्या उत्पादनामुळे अमेरिकेचे १९९६ ते २०१६ या काळातील समुच्चित वार्षिक मुल्य ५७,८२७.९ दशलक्ष डॉलरनी वाढले. त्या खालोखाल अर्जेंटीनाचे १७,६२२.२ दशलक्ष डॉलरनी आणि ब्राझीलचे ११,८०९.६ दशलक्ष डॉलरनी वाढले. सुमारे २१ राष्ट्रांमध्ये जी.एम. पिकांची लागवड होते. अमेरिकेमध्ये सुमारे ९८% कृषिमालामध्ये जी.एम. तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. पारंपरिक पिकांपेक्षा जी.एम. वाणांमुळे जगाची अन्नसुरक्षा अधिक मजबूत होण्यास मदत होईल. तसेच शेती उत्पादनातील खर्च झपाट्याने कमी होईल व त्यामुळे शेतकऱ्यांना शेती

किफायतशीर होईल.

भारतात शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाचे प्रमाण दुप्पटीपेक्षा अधिक आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या गरीब, मागासलेल्या लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रामुख्याने शेतीचा विकास करणे आवश्यक आहे. शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी झाला आहे. पण शेती क्षेत्र आजही इतर क्षेत्राच्या तुलनेत जास्त रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती क्षेत्र असल्याने केंद्रिय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी शेतीच्या विकासासाठी रु.३५,९८४ कोटींची तरतुद केली आहे. शेतीच्या सिंचनाचे प्रमाण वाढावे म्हणून देशात ५ लाख विहिरी व तलावाची निर्मिती करण्यात येणार आहे. परंतु सरकारने भूजल सर्वेक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचे पंख शेती क्षेत्र आहे. तेंव्हा देशातील शेतीक्षेत्राचा विकास होणे हे देशासमोर आव्हान आहे.

**निष्कर्ष:**

जागतिक व्यापार संघटनेच्या जाचक अटींचा भारताने स्वीकार केलेला असल्याने जागतिकीकरणाचे चांगले व वाईट दोन्ही परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले आहेत. तथापि वाईट परिणामांपेक्षा चांगले परिणामच जास्त झालेले आहेत. उदा. विदेशी भांडवल गुंतवणुकीत वाढ, विकसनशील देशांना नवीन तंत्रज्ञानाचा लाभ, भांडवल बाजाराचा जलद विकास, विदेशी विनिमय बाजारपेठेचा विकास, औद्योगिक विकास, संस्कृतींची देवाण-घेवाण, उपभोग पातळीत वाढ, रोजगार संधीची उपलब्धता, राहणीमानाच्या दर्जात सुधारणा इ. भविष्यकाळात जागतिकीकरणाचे कोणते परिणाम भारताच्या दृष्टिकोनातून फायद्याचे ठरतील हे पाहून भारताने पाऊले उचलावीत. भारतीय शेतकऱ्याच्या आत्महत्त्या बंद झाल्या पाहिजेत, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे. शेतकऱ्यांच्या ताकदीवरच भारत महासत्ता होईल.

**संदर्भ सूची:**


१. वसुधा पुरोहित, *कृषी अर्थशास्त्र,* प्रथम आवृत्ती २०१६, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. ५६८

२. जी.एन. झामरे, *भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र,* सहावी आवृत्ती, ऑक्टोबर २०११, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर, पृ.१६९

३. श्री.पु.देसाई-भालेराव, *भारतीय अर्थव्यवस्था,* दहावी आवृत्ती, मे २०१२, निराली प्रकाशन, पृ.६०.२,२२.२०

४. एस.बी.कटमुसरे, *कृषी अर्थशास्त्र,* पहिली आवृत्ती, एप्रिल २०१३, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर, पृ. १७१

५. दत्तात्रय भुत्तेकर, *कृषी अर्थशास्त्र,* प्रथम आवृत्ती, सप्टेंबर २०१५, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.१७१

६. किरण जी. देसले, *आर्थिक व सामाजिक विकास,* तिसरी आवृत्ती, मार्च २०१६, दिपस्तंभ प्रकाशन, जळगांव, पृ.२६१

७. विजय कविमंडन, *कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र,* सहावी आवृत्ती, २०१२, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर पृ. ५१२, ५१३

८. ए. बी. सवदी, *भारताचा समग्र भुगोल,* द्वितीय आवृत्ती, २०११, निराली प्रकाशन, पृ. १५,३१

९. योजना, जून २०१६, पृ. ५२

# कायेदशीर नोटा रद्द:विविध आर्थिक स्तरांचे अनुभव

वैशाली जयंत जोशी, नाशिक,
३, अवधुत प्राईड, काठे लेन, माणेकशा नगर, द्वारका.
भ्रमणध्वनी: ९७६५६९६०९८
ई-मेल: jayant100@hotmail.com

## प्रस्तावना व इतिहास :

८ नोव्हेंबर २०१६ हा भारतीय बँकिग प्रणालीच्या इतिहासातील एक सोनेरी दिवस ठरला. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऐतिहासिक निर्णय घेतला जो सामान्य भारतीय लोकांच्या स्वप्नवत वाटणारा परंतु प्रत्यक्षात आलेला घणाघाती निर्णय होता. ८ नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपासून ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा रद्द. अखेर लोकशाहीचा विजय झाला. देशातील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आणि परदेशातील काळा पैसा बाहेर पडण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही घोषणा राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात केली.

या रु. ५०० व रु. १००० च्या कायदेशीर रद्द झालेल्या नोटा पुढील ५० दिवस म्हणजे १० नोव्हेंबर ते ३० डिसेंबर २०१६ पर्यंत देशातील सर्व बँका व पोस्ट कार्यालयामध्ये जमा करता येतील. सुरवातीला रु. २००० मग रु. ४००० नंतर २५ डिसेंबर पासून ही मर्यादा रु. ४०००/- पेक्षा जास्त असेल. त्यासाठी आधारकार्ड दाखवून ओळख पटवावी लागेल. या निर्णयाची कार्यवाही रिझर्व्ह बँकेने केली आहे आणि या कार्यवाहीची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केली आहे.

## कायदेशीर नोटा रद्द करण्याची उद्दिष्टे :

१. निवडणूकीच्या काळातील पैशाची देवाण-घेवाण नष्ट करणे.
२. भ्रष्टाचारला पायबंद घालणे.
३. समांतर अर्थव्यवस्था संपविणे.
४. सामान्य लोकांना आर्थिक न्याय मिळवून देणे.

## कायदेशीर नोटा रद्द करण्याची वैशिष्ट्ये:

१. कायदेशीर नोटा रद्द करण्याची कार्यवाही फक्त आणि फक्त रिझर्व्ह बँकेला

आहे. कारण ती सर्वोच्च स्तरावरील राष्ट्रीय बँक आहे.

२. या कार्यवाहीच्या निर्णयाची पंतप्रधान घोषणा करतात. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर नाही कारण पंतप्रधान देश प्रमुख असतात.

३. देशवासियांना हा निर्णय बंधनकारक असतो कारण लोकशाहीत लोकांनी, लोकांसाठी, लोकांकरिता निर्णय घ्यायचे असतात.

भारतातील स्थिती:

देशातील सर्व राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये या निर्णयाचे विविध माध्यमातून प्रसारण झाल्यावर देशवासियांनी या दूरदर्शी निर्णयाचे स्वागत केले. योगगुरू बाबा रामदेव म्हणतात, या साहसी, धाडसी व देशहितास योग्य निर्णय घेणाऱ्या पक्ष प्रमुखास करोडो- करोडो धन्यवाद. देशात रोजगार वाढेल, महागाई नियंत्रणात येईल. व्यापारी गटांच्या मते, अनावश्यक खर्च आपोआपच या निर्णयामुळे आटोक्यात येतील, खाऊन जा धोरणापेक्षा जाऊन खा हेच धोरण यशस्वी ठरल्याचे दिसते. जाऊनखा म्हणजे जा-जागतिकीकरण, उ-उदारीकरण, न-नको, खा-खाजगीकरण. शेअरबाजारात या निर्णयाचा फारसा परिणाम झालेला दिसला नाही. सध्या त्यावर अमेरिकी निवडणुकांचे सावट आहे.

प्रवाशांचे हाल(८ नोव्हेंबर २०१६):

अचानक झालेल्या या ५०० व १०० रुपयांच्या नोटा रद्द झाल्यामुळे प्रवासी नाराज झाले एका देशातून दुसऱ्या देशात जाण्यासाठी या मोठ्या चलनातच ते मूल्य संग्रहण करू शकत होते. परंतु चलन रद्द झाल्यामुळे दुसऱ्या देशात जातांना एका कुटुंबाकडे शंभराच्या फक्त ५ नोटा होत्या त्यात त्यांना मुंबई एअरपोर्टवर रात्र, मधला दोन तासांचा दुसऱ्या देशातील थांबा आणि इप्सित देशात उतरल्यावरचा खर्च केवळ ५ नोटात अशक्य. यावर तो प्रवासी उत्तरला, *बिना खर्चाचा व बिना पैशाचा - पैसे असूनही आयुष्यातला पहिला प्रवास माणूसकीच्या विश्वासावर पार पडेल.*

सामान्य टॅक्सी ड्रायव्हर(८ नोव्हेंबर २०१६):

याने असे मत नोंदविले, चांदवड ते नाशिक दिवसाला दहा फेऱ्या करतो प्रसारमाध्यमांपासून दूर असतो. ८ तारखेला नेहमीप्रमाणे रात्री जवळील छोट्या चलनी नोटा लोकांना देऊन त्या मोबदल्यात रु. ५०० व रु. १००० च्या नोटा घेऊन घरी आलो आणि बातम्या ऐकून डोक्याला हात लावायची वेळ आली. पण नंतर समजले की या नोटा बदलवून मिळतील. मग जीव भांड्यात पडला आणि सरकारचं चांगभलं म्हणत माझी आठ तारीख संपली.

एका पालकाची प्रतिक्रिया(८ नोव्हेंबर २०१६):

दिवाळीनंतरच्या द्वितीय सत्राची शाळेची फी भरायची म्हणून ऑफिसमधून येताना एटीएम वर थांबलो. दोन तास रांगेत उभे राहून पैसे काढले व घरी आल्यावर ऐकतो तर ५०० व १००० च्या नोटा रद्द. पैसे रद्दीत द्यायचे काय या विचाराने डोके सुन्न झाले. पण देशपातळीवरचा योग्य व अनुकुल निर्णय ऐकून शांत झालो.

मजूराची बोलकी प्रतिक्रिया(८ नोव्हेंबर २०१६):

१००० रु. पेक्षा ५०० रु. ची नोट रद्द झाल्याचे जास्त दु:ख आहे. कारण हंगामाच्या दिवसात एक तरी नोट घरी न्यायचो आता पुढे काय? रु. २०००/- ची नवीन नोट चलनात येणार म्हटल्यावर तो आनंदाने बोलला, मग मी

तक्ता क्र.१

कायदेशीर नोटा रद्दबाबत समाजातील विविध आर्थिक स्तरांचे अनुभव

| समाजातील विविध आर्थिक स्तर | ८ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर २०१६ अल्पकालावधी | | ३० डिसेंबर २०१६ नंतर दिर्घकालावधी | |
|---|---|---|---|---|
| | निर्णयाच्या बाजूने | निर्णयाच्या विरोधात | निर्णयाच्या बाजूने | निर्णयाच्या विरोधात |
| व्यापारी गट | - | ✓ | ✓ | - |
| प्रवासी | - | ✓ | ✓ | - |
| टॅक्सीड्रायव्हर | - | ✓ | ✓ | - |
| पालक | ✓ | - | ✓ | - |
| मजूर | ✓ | - | ✓ | - |
| ग्रामीण जनता | ✓ | - | ✓ | - |
| शहरी जनता | ✓ | - | ✓ | - |
| गृहिणी | - | ✓ | ✓ | - |
| राजकारणी | - | ✓ | - | ✓ |
| अर्थशास्त्रज्ञ | ✓ | - | ✓ | - |
| सुवर्णकार व पेट्रोल पंपचालक | ✓ | - | ✓ | - |

स्त्रोत: लेखिकेचा निरिक्षण अहवाल

ती घेऊन घरी जाईन.

ग्रामीण जनता(८ नोव्हेंबर २०१६):

खेड्यातील घरात पोत्यात पैसा ठेवण्यापेक्षा तो कृषीधनावर खर्च होईल खेड्यातील अशिक्षितता, बेरोजगारी कमी होऊन परस्परात जागरूकता वाढेल. खरा भारत खेड्यांमध्ये राहतो हे महात्मा गांधीजींचे वाक्य या निर्णयामुळे खरे ठरण्यास मदत होईल.

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की अल्प कालावधीसाठी व्यापारी, प्रवासी, गृहिणी व राजकारणी हे समाजातील विविध आर्थिक स्तरातील लोक केंद्र शासनाच्या निर्णयाबाबत नाखुश होते. त्यांच्यामते किमान ५ दिवस आधी सांगून निर्णयाची अंमल बजावणी करणे शक्य होते. परंतु सरकारने आर्थिक निर्णय लादला. दीर्घ कालावधीत राजकारण्यांव्यतिरिक्त सगळेच आर्थिक प्रवाहात सहभागी होतील असे या निरीक्षणातून दिसून येते.

शहरी जनता(८ नोव्हेंबर २०१६):

सरकारने भ्रष्टाचाराच्या मुळावरच घाव घातला आहे. त्यामुळे आता सरकारी कामासाठी जाताना किंवा खासगी व्यवहारांवर आपसुक प्रतिबंध घातले गेले आहेत. नवीन रु. ५०० व रु. २००० च्या नोटा येणार असल्याने जुन्या नोटा जुने श्रीमंत हे खरे ठरणार.

गृहिणी(८ नोव्हेंबर २०१६):

सुरवातीला गृहिणी या निर्णयाच्या विरोधात दिसल्या पण नुकतीच मिळालेली भाऊबीज नवीन नोटांमध्ये बदलून मिळाल्याचे कळल्यावर दीर्घ कालावधीसाठी त्यांनी निर्णयाचे स्वागत केले.

राजकारणी(८ नोव्हेंबर २०१६):

रु. ५०० व रु. १००० च्या नोटा रद्द केल्याबद्दल राजकारणी खूष होते. परंतु नवीन नोटा रु. २०००/- निघणार या निर्णयाने सरकार भ्रष्टाचार वाढवणार का असा प्रतिप्रश्न करून दीर्घ कालावधीसाठी चिंतीत वाटले. या निर्णयाआधी चिंतन आवश्यक होते असे त्यांनी मत मांडले.

अर्थशास्त्री(८ नोव्हेंबर २०१६):

अल्पकालावधीत सूक्ष्म स्तरावर त्रासदायक वाटणारा निर्णय दीर्घ कालावधीत समग्र स्तरावर लाभदायी ठरणार आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात समांतर अर्थव्यवस्थेला स्थगिती देता येईल. अर्थव्यवस्थेच्या जलद चलनवलनाला या ऐतिहासिक निर्णयामुळे फायदाच होईल. ३० डिसेंबर पर्यंत व मार्च १७ पर्यंत सर्व काळा पैसा अर्थव्यवस्थेत समाविष्ट होईल अन्यथा देशा-विदेशातील भारतीय रु. ५०० व रु. १००० च्या नोटा कालबाह्य होतील. २०१६-१७ हे आर्थिक वर्ष भारताच्या दृष्टीने धनदायी ठरले आहे. या विषयी अर्थशास्त्रज्ञांचे एकमत आहे.

सुवर्णपेढीवाले व पेट्रोलपंप चालक (८ नोव्हेंबर २०१६):

यांच्या मते नोटा मोजण्याचे काम व सांभाळण्याचे जोखमीचे काम कमी होणार यामुळे अल्पकालावधीत व दीर्घ कालावधीसाठी हा निर्णय उपयुक्त आहे. अशा विविध आर्थिक स्तरातील मते आपण जाणून घेतली.

समारोप:

वरील विवेचनावरून असे लक्षात असे लक्षात येते की समाजातील विविध स्तरातील लोकांच्या मनातले प्रत्यक्षात आल्यावर अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी भारतीय बँकिंग प्रणालीकडून पार पाडली आहे. यामध्ये लोकांना पैशाची देवाण-घेवाण न करता सहजपणे कामे पार पाडता येतील विविध कर कार्यालयातील लोकांचा कामाचा व्याप वाढणार असला तरी देशहिताचा निर्णय असल्याने सर्व समांतर अर्थव्यवस्थेचे रूपांतरण काळा पैशातून चलनीय अर्थव्यवस्थेत होईल याबद्दल पंतप्रधानांचे, विविध धार्मिक यंत्रणांवर काम करणाऱ्यांचे आणि रिझर्व्ह बँकेचे लाख लाख धन्यवाद.

संदर्भसूची:


१. श्रीनिवास खांदिवाले, *पैशाचा मूल्य सिद्धांत,* नागपूर पब्लिकेशन.

२. लोकसत्ता, ९ नोव्हेंबर २०१६.

३. टाईम्स ऑफ इंडिया, ९ नोव्हेंबर २०१६

४. डॉ. सुखदेव खंदारे (२०१३), *भारतीय अर्थव्यवस्था* एज्युकेशनल पब्लिशर्स.

अर्थसंवाद

# ग्रामीण महिला सक्षमीकरणात जीवनोन्नती अभियानाची भूमिका

**आशिष सुधाकरराव निमकर**, अमरावती,
जिजाऊनगर, विद्यापीठ रोड, कॅम्प.
भ्रमणध्वनी : ८२७५२१७२४८

भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी भारतामध्ये विशेषतः ग्रामीण भागात पराकोटीचे दारिद्र्य होते. जनता वर्षानुवर्षापासून कमालीच्या दारिद्र्यात खितपत पडली हाती. तेव्हा जनतेची आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, शेती व्यवसायाची स्थिती सुधारणे, ग्रामीण भागामध्ये पायाभुत सुविधा उपलब्ध करून देऊन उद्योगाची वाढ करणे व जनतेला स्वावलंबी बनविणे या जाणीवेतून दारिद्र्य निर्मुलनाकरीता रोजगार निर्माण व शेती सुधारणेच्या दृष्टीकोनातून समुदाय विकास कार्यक्रम (१९५२), ग्रामीण आवास योजना (१९५७), गहन कृषिक्षेत्र कार्यक्रम (१९६०), ग्रामीण लोकशक्ती कार्यक्रम (१९६०), पत अधिकृतता योजना (१९६५), रोजगार हमी योजना (१९६९), अशा विविध योजनांची आखणी व अंमलबजावणी शासनाने सुरू केली. इ.स. १९८० ला दारिद्र्य निर्मुलन, रोजगार निर्मिती व ग्रामीण विकास या हेतुने एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची सुरूवात केली. मात्र अशा योजनांना अपेक्षित यश आले नाही. तेव्हा शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या दारिद्र्य निर्मुलन, रोजगार निर्मिती व ग्रामविकासाच्या विविध योजनांचा आढावा घेण्याच्या दृष्टीने इ.स. १९९७ ला प्रा. एस. आर. हाशीम यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. हाशीम समितीने आपला अहवाल इ.स. १९९९ ला सादर केला.

हाशीम समितीने आपल्या अहवालामध्ये व्यक्तिगत अनुदान व लाभ मिळवून देणाऱ्या योजनांच्या ऐवजी सामुहिक विकासाला प्राधान्य देऊन ग्रामीण भागामध्ये समुह स्थापून (विशेषतः महिला) समुहांना अनुदान व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची शिफारस केली. तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेई यांनी या शिफारशीवरून ग्रामीण विकास मंत्रालयाअंतर्गत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP, १९८०), ग्रामीण युवक रोजगार

प्रशिक्षण योजना (TRYSEM, १९७९), ग्रामीण महिला व बालविकास कार्यक्रम (DWCRA, १९८२), ग्रामीण कारागिरांना आधुनिक औजारांचा पुरवठा (SITRA, १९९२), गंगा कल्याण योजना (GKY, १९९७) आणि दशलक्ष विहीर योजना (MWS, १९८८) या सहा योजना एकत्र करून स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY) सुरू करण्याचा निर्णय १६ मार्च १९९९ ला घेतला व १ एप्रिल १९९९ पासून ग्रामीण भागात स्वयंसहायता गट स्थापून लघु उपक्रमांच्या माध्यमातून शाश्वत रोजगार निर्मितीकरीता वित्त, तंत्रज्ञान, विपणन व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू केली.

इ.स. १९९९ पासून मार्च, २०११ पर्यंत या योजनेअंतर्गत महाराष्ट्रात एकूण २,५४,६७३ स्वयंसहायता गट स्थापन केल्या गेले त्यातील ८०,८४२ गटांनी (३१.७४ टक्के) उपक्रम सुरू केलेत. या एकूण गटांपैकी २,०१,८१७ गट महिलांचे (७९.२४ टक्के) असून त्यातील ७१,७१३ महिला गटांनी व्यवसाय/उपक्रम सुरू केले आहे.

या काळातील एकूण स्थापन झालेल्या गटांपैकी प्रथम वर्गवारी स्थापन झालेले गट १,५६,१२९ इतके असून द्वितीय वर्गवारी ९८,५४४ इतक्या गटांनी प्राप्त केली. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुमारे २,७०,००० ग्रामीण कुटुंबे ही दारिद्र्य रेषेखालून (BPL) दारिद्र्य रेषेच्या वर (APL) झाली. या योजनेच्या कार्यान्वितीमुळे ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेत घट होऊन, कौशल्य व उद्योगधंद्यामध्ये विकास होत होता. मात्र अजूनही दारिद्र्य निर्मुलनाचे ध्येय पूर्ण होऊ शकलेले नव्हते. भारतातील ७.५ कोटी दारिद्र्यरेषेखालील (BPL) कुटुंबांपैकी अजूनही ४.५ कोटी कुटूंबे या योजनेपासून दूर होते तर महाराष्ट्रातील ५६,००० ग्रामीण कुटुंबांना या योजनेत सामावून घेणे शिल्लक होते. तेव्हा पतविषयक बाबी संदर्भात अभ्यास करण्याकरिता भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने एप्रिल, २००८ मध्ये प्रा. रामकृष्ण समितीची स्थापना केली.

या समितीने विद्यमान योजनेत बदल सुचवून ग्रामीण भागातील प्रत्येक दारिद्र्य रेषेखालील कुटुंबापर्यंत पोहचून त्यांच्या संस्था/स्वयंसहायता गट स्थापून सदस्यांची व स्वयंसहायता गटांची भक्कम उभारणी करून देऊन, गरिबांना शाश्वत स्वयंरोजगार व वेतन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन, त्यांना दारिद्र्य रेषेच्या बाहेर आणून जीवनमान उंचावण्याकरिता, सक्षम बनविण्याकरिता स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेची पुनर्बांधणी करून राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) आजीविकाची शिफारस केली व जुलै, २०११ पासून या अभियानाअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील महिलांचा स्वयंसहायता गट स्थापन करून महिलांच्या पुढाकाराने सर्व परिवाराला शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही केंद्रीय योजना असून दिल्ली व चंडीगढ वगळता सर्वच राज्य व केंद्रशासित प्रदेशात हे अभियान राबविले जात आहे.

या योजनेअंतर्गत केंद्र व राज्याचा आर्थिक भार पुढीलप्रमाणे -

तक्ता क्र.१

| अ.क्र. | राज्य/संघराज | केंद्र वाटा (शेकडा प्रमाण) | राज्य वाटा (शेकडा प्रमाण) |
|---|---|---|---|
| १ | पूर्वेत्तर राज्य (अरूणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा, सिक्किम) | ९० | १० |
| २ | पूर्वेत्तर राज्य वगळता सर्व राज्ये | ७५ | २५ |
| ३ | केंद्रशासित प्रदेश | १०० | ०० |

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानामध्ये महिला स्वयंसहायता गट स्थापनेला प्राधान्य दिले जात आहे. या सोबतच SGSY अंतर्गत अस्तित्वात असलेल्या स्वयंसहायता गटांचा बळकटीकरणाचा कार्यक्रम प्राधान्याने हाती घेण्यात आला. त्याचप्रमाणे अकार्यक्षम व बंद पडलेल्या स्वयंसहायता गटांची माहिती घेऊन त्यांची पुनर्बांधणी करण्याचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. आजीविका हे अभियान देशपातळीवरील ६०० जिल्ह्यांतील ६००० ब्लॉकमधील २.५ लाख ग्रामपंचायतीतील ६.० लाख गावातील ७ कोटी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांपर्यंत पोहचून त्यांना १० वर्षात दारिद्र्यातून बाहेर काढण्याकरिता विविध सुविधा व सहाय्य उपलब्ध करून देण्याकरीता कटिबध्द आहे.

भारतातील एकूण दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रमाणापैकी जवळपास ९०% दारिद्र्य रेषेखालील लोक राहणाऱ्या अशा तेरा घटक राज्यांमधील (आसाम, बिहार, छत्तीसगड, झारखंड, उत्तरप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान, प. बंगाल, कर्नाटक, तामिळनाडू) १०७ जिल्ह्यातील ४२२ ब्लॉकमध्ये राष्ट्रीय ग्रामीण आजीविका प्रकल्प (NRLP) राबविला जात आहे.

तक्ता क्र.२

| वर्ष १ | वर्ष - ३ | वर्ष - ५ | वर्ष - ७ | वर्ष - १० | वर्ष - १२ |
|---|---|---|---|---|---|
| १५० जिल्हे | १५० + जिल्हे | ३०० + जिल्हे | १,८००+ ब्लॉक | शेवटचे गाव, शेवटचे कुटुंब | इंटेन्सिव्ह सहाय्य |
| ६०० ब्लॉक | १,५०० + ब्लॉक | २,१०० + ब्लॉक | | | |
| एकूण जिल्हे | ३०० जिल्हे | ६०० जिल्हे | ६,००० ब्लॉक | | |
| एकूण ब्लॉक | २,१०० ब्लॉक | ४,२०० ब्लॉक | | | |

महाराष्ट्र शासनाने राज्याचा विस्तार पाहता हे अभियान इंटेन्सिव्ह (Intensive) व नॉन इंटेसिव्ह (Non Intensive) अशा दोन टप्प्यात राज्यामध्ये राबविण्याचा निर्णय घेतला आहे. इंटेन्सिव्ह जिल्ह्यांमध्ये ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, जालना, सोलापूर, उस्मानाबाद, वर्धा, यवतमाळ, गडचिरोली व गोंदिया या १० जिल्ह्यातील ३६ तालुक्यांचा समावेश आहे तर राज्यातील (मुंबई शहर व उपनगर वगळता) उर्वरित जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये नॉन इंटेन्सिव्ह पध्दतीने अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या यशस्वितेकरीता राज्य, जिल्हा, तालुका व क्लस्टर पातळीवर समर्पित (Dedicated) व संवेदनशील (Sensitive) कर्मचारी वृंद महिलांचा सर्वसमावेशक सामाजिक सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. गावोगावी खेड्यापाड्यापर्यंत पोचून प्रत्येक दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील एका महिला सदस्याला या अभियानामध्ये सहभागी होण्याकरीता समन्वयक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. सर्वसामान्यतः १० ते २० महिलांचा (दुर्गम भागात ५ ते २० महिलांचा) एक असे स्वयंसहायता गट निर्माण केला जात आहे. सर्वसाधारणपणे या स्वयंसहायता गटामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांनाच सदस्यत्व असते पण आवश्यकतेनुसार (उदा. लेखापाल) सर्वसाधारणपणे २०% व विशेष परिस्थितीत ३०% APL कुटूंबातील सदस्यांना स्वयंसहायता गटाचे सदस्यत्व दिले जाऊ शकते. गटाला मिळणारे आर्थिक सहाय्य सामान्यपणे गटातील सदस्यांपर्यंत मर्यादित असते. मात्र निराधार महिला, गंभीर आजारी, एड्सग्रस्त, अपंग अशा वंचित वर्गाला आवश्यकता असल्यास गटाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिले जाऊ शकते.

**जीवनोन्नती अभियानाची भूमिका:**

१. गाव पातळीवर प्रत्येकी १० ते २० सदस्यांचा स्वयंसहायता गट स्थापून गटाचे बळकटीकरण व सदस्यांच्या उन्नतीकरिता सर्वतोपरी मदत केली जाते.

२. स्वयंसहायता गटाच्या सदस्यांना स्वयंरोजगार सुरू करण्याकरिता व्यवस्थापकीय व कौशल्य विषयक प्रशिक्षण दिले जाते. (ज्यामध्ये स्वयंसहायता गटाच्या नोंदणी पासून, उद्योग/रोजगार निश्चिती, उद्योगाची कार्यान्विती, बाजाराचे ज्ञान विपणन व अंकेक्षण इत्यादी विषयक)

३. प्रत्येक स्वयंसहायता गटाचे नेतृत्व करण्याकरिता एका प्रभावी माहिलेची समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) म्हणून व एकीची लेखापाल म्हणून निवड केल्या जाते व त्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण दिले जाते.

४. स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंचे तालुका व जिल्हा स्तरावर प्रदर्शन भरविण्यात येते तसेच स्वयंसहायता गटाच्या सदस्यांना विविध यशस्वी गटांच्या कार्याचे अवलोकन करण्याकरिता क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते.

५. स्वयंसहायता गटांच्या तात्काळ आर्थिक गरजा भागविण्याकरीता फिरता निधी उपलब्ध करून दिला जातो.

६. स्वयंसहायता गटाच्या यशस्वीतेकरिता NGO, Industry Association d Chamber of Commerce यांच्यासोबत विचार विनिमय केला

जातो.

७. स्वयंसहायता गटांच्या सदस्यांना अधिक चांगले प्रशिक्षण देण्याकरिता जिल्ह्यातील उत्कृष्ट प्रशिक्षक व प्रशिक्षण संस्था ज्यामध्ये ITI, अभियांत्रिकी महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, कृषी विज्ञान केंद्र, शेतकरी महाविद्यालये यांची मदत घेतली जाते.

८. स्वयंसहायता गटांना आवश्यकतेनुसार भांडवली अनुदान व पतपुरवठा केला जातो.

९. स्वयंसहायता गटांना घेतलेले कर्ज परवडावे म्हणून उचल केलेल्या कर्जावर व्याज अनुदानाची तरतुद केली आहे. गटांना केवळ ४% वार्षिक व्याजदरावर कर्जपुरवठा केला जातो.

१०. कार्यरत असलेल्या स्वयंसहायता गटांचे नियमित बैठका, नियमित बचत, अंतर्गत कर्जाचे वाटप, नियमित कर्जाची परतफेड व लेखापुस्तके अद्ययावत ठेवणे या पंचसूत्रीच्या आधारावर गटाचे मूल्यमापन केले जाते.

महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान प्रभावीपणे राबविल्या जात आहे. इ.स. २०१२-१३ ला महाराष्ट्रामध्ये एकूण ५,६७७ स्वयंसहायता गटांची स्थापना करण्यात आली ज्यामध्ये एकूण ६०,८०१ स्वयंरोजगारी सदस्यांचा समावेश होता. या स्वयंरोजगारींना इ.स. २०१२-१३ मध्ये ७२.१९ कोटी रुपये अनुदान व २०७.९९ कोटी रुपये कर्ज पुरविण्यात आले. इ.स. २०१३-१४ ला एकूण ९,०२४ स्वयंसहायता गटांची स्थापना केल्या गेली ज्यामध्ये एकूण १,०२,७८९ स्वयंरोजगारी समाविष्ट होते व त्यांना एकूण ४०५.६९ कोटी रुपये कर्ज उपलब्ध करून दिल्या गेले. तर इ.स. २०१४-१५ वर्षअखेरपर्यंत ४६,०४८ स्वयं-सहायता गटांची स्थापना झाली ज्यामध्ये एकूण १२,७१,८०८ सदस्यांचा समावेश होता. या सर्व स्वयंरोजगारांना एकूण ५३.६१ कोटी रूपये अनुदान व ५२७.७८ कोटी रुपये पतपुरवठा केला गेला.

इ.स. २०१५-१६ वर्षामध्ये डिसेंबर, २०१५ पर्यंत एकूण ८२,८१७ स्वयंसहायता गटांची स्थापना झाली ज्यामध्ये १५,७३,५६७ सदस्यांना सामावून घेतले गेले. त्यांना १४.९१ कोटी रुपये अनुदान व २१४.४५ कोटी रुपये

तक्ता क्र. ३

महाराष्ट्रात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रगती

| अ. क्र. | विवरण | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ (डिसें. पर्यंत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वयंसहायता गटांची संख्या | ५,६७७ | ९,०२४ | ४६,०४८ | ८२,८१७ |
| २ | एकूण स्वरोजगारी संख्या | ६०,८०१ | १,०२,७८९ | १२,७१,८०८ | १५,७३,५६७ |
| ३ | एकूण अनुदान (कोटी रू.) | ७२.१९ | उ.ना. | ५३.६१ | १४.९१ |
| ४ | एकूण कर्ज (कोटी) | २०७.९९ | ४०५.६९ | ५२७.७८ | २१४.४५ |

*स्त्रोत : ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र शासन*

इतक्या रक्कमेचा कर्जपुरवठा केला गेला.

भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या नावामध्ये नोव्हेंबर, २०१५ ला बदल करून दिन दयाल अंत्योदय योजना (DAY-NRLM) असे केले आहे.

**संदर्भसूची:**


१. Devi R. Uma., *A study on Swarna Jayanti Gram Swarojgar Yojana, Scheme in Generating Self-employment Opportunies*, Vol. 1, 2012, IJSST, pp. 9 to 21.

२. Jerinabi U., *Micro Credit Management by Women's Self Help Groups*, First Edition, 2006, Discovery Publishing House, Chennai, pp. 8, 9.

३. त्रिपाठी मधुसूदन., *गावों में रोजगार के साधन*, प्रथमावृत्ती, २०१२, ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, पृ. ३, ७, १७.

४. पंत डी. सी., *भारत में ग्रामीण विकास*, द्वितीयावृत्ती, २०११, कॉलेज बुक डेपो, जयपुर.

५. मुलाणी एम. यु., *महिला स्वयंसहाय्यता बचत गट*, प्रथमावृत्ती, २०१२, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ.४८ ते ५६.

६. *राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन (कार्यान्वयन का स्वरूप)*, २०१३, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली.

७. नियोजन विभाग, महाराष्ट्र., *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी*, २०१४-१५, महाराष्ट्र : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई, पृ.६५, ६७.

८. https://mahaschemes. maharashtra. gov.in/mr/mahila

९. https://rdd.maharashtra.gov.in/1032 swarna-jayanti-gram

१०. www.aajeevika.gov.in/content/guide-lines.

अर्थसंवाद

# सोलापूर जिल्ह्यातील कापूस शेतीच्या उत्पादकतेतील कल

संतोष नागनाथ कदम, सोलापूर,
श्रीकांत जेटींगा होटकर, सोलापूर,
संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप.
भ्रमणध्वनी: ९८८१८९९१८४

**प्रस्तावना:**

कापूस व कापसाचा सुती कापडासाठी होणाऱ्या उपयोगाविषयीचे ज्ञान भारतियांना फार प्राचीन काळापासून आहे. ऋग्वेदात कापसाचा उल्लेख आहे. मनूनेही धर्मशास्त्रात सुती कापडाचा उल्लेख केलेला आहे. माहीत असलेले सर्वात जुने कातलेले सूत मोहेंजोदडो येथील उत्खननात आढळले आहे. यावरून इ. स. पूर्व ३००० वर्षापूर्वी भारतात कापूस लागवड होत होती असे सिध्द झाले आहे. इ. स. पूर्व १५०० ते इ. स. अठराव्या शतकापर्यंत म्हणजे जवळ जवळ ३,३०० वर्षे भारत कापूस उद्योगात आघाडीवर होता. त्यानंतर मात्र इंग्रज राजवटीत इंग्रज सरकारच्या धोरणामुळे भारतीय कापड उद्योगावर प्रतिकुल परिणाम झाला.

कापूस हे एक जगातील महत्त्वाचे आणि मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाणारे कृषी व औद्यागिक पीक आहे. जगातील सुमारे १०० दशलक्षापेक्षा जास्त कुटुंबे कापूस उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष गुंतलेली आहेत. त्याचप्रमाणे कापसाला पूरक असणाऱ्या सेवा म्हणजे वाहतूक, जिनिंग, गाठी तयार करणे, साठा करून ठेवणे यासारख्या कामामध्ये कुटुंबातील व्यक्ती व मजुरीवरील कामगार मिळून सुमारे ३५० दशलक्ष लोक कापूस उत्पादन क्षेत्रात सहभागी आहेत. तसेच कापूस शेतीशी संबंधित असणारा जोडधंदा म्हणजे शेती आदाने, यंत्रसामग्री आणि हातमाग व यंत्रमागाच्या सहाय्याने कापडनिर्मिती उद्योगामध्ये कोट्यवधी लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. फक्त महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास राज्यातील २४ जिल्ह्यामधील २२,००० गावातील सुमारे २४ लाख शेतकरी कुटुंबे कापूस उत्पादनात सहभागी झाली आहेत.

महाराष्ट्र राज्यातील अतिपूर्वेकडील आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही

जिल्हे वगळल्यास महाराष्ट्र राज्याच्या २४ जिल्ह्यांमध्ये कापसाचे उत्पादन घेतले जाते. त्यामध्ये कापूस हे प्रमुख व्यापारी पीक असून, देशातील कापूस पिकाखालील क्षेत्राच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा पहिला क्रमांक तर कापूस उत्पादनाच्या बाबतीत दुसरा क्रमांक आणि कापूस पिकाच्या उत्पादकतेच्या बाबतीत ९ वा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रातील एकूण कापूस उत्पादन क्षेत्राचे विदर्भ विभाग, मराठवाडा विभाग, खानदेश विभाग आणि दख्खनचे पठार विभाग असे चार विभाग केले जातात. महाराष्ट्र राज्यातील कोकण व अतिपूर्वेकडील आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळल्यास राज्याच्या २४ जिल्ह्यांमध्ये कापसाचे उत्पादन घेतले जाते.

**अभ्यासाची उद्दिष्टये:**

१) सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्राचा कल अभ्यासणे.

२) सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाचे उत्पादन व उत्पादकतेचा कल अभ्यासणे.

अभ्यास पध्दती-

प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना संशोधकाने विविध प्रकाशित साहित्य-संदर्भग्रंथ, सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रिसर्च अहवाल, महाराष्ट्रातील शेतीचा अहवाल, सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन अहवाल, इंटरनेट वरील विविध संकेतस्थळे इत्यादी द्वितीयक साधन सामग्रीचा आधार घेतला असून, प्राप्त सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी आवश्यकतेनूसार संयुक्त वार्षिक वाढीचा दर, सरासरी, टक्केवारी आणि त्यातील बदल इत्यादी सांख्यिकी साधनांचा वापर केला आहे.

सोलापूर जिल्ह्याची कृषी अर्थव्यवस्था-

जिल्ह्यातील बहुसंख्य लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असून, जिल्ह्यातील अर्थ व्यवस्थेत शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही शेती प्रधान अर्थव्यवस्था असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या सुमारे ७६ टक्के इतके सर्वाधिक क्षेत्र एकूण अन्नधान्य पिकाने व्यापले आहे. सन १९९० ते २०१३ या कालावधी दरम्यान सोलापूर जिल्ह्यात एकूण अन्नधान्य पिकांखालील क्षेत्र २०.११ टक्क्यांनी घटले आहे. तर याचवेळेस नगदी पिके विशेषत: ऊस, कापूस, फळे व भाजीपाला आणि एकूण चारा पिकांखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. यावरून जिल्ह्यातील शेतकरी पारंपरिक अशा अन्नधान्य पिकांखालील क्षेत्राऐवजी व्यापारी किंवा नगदी पिके लागवडीखालील क्षेत्रात वाढ करीत असल्याचे दिसून आले आहे.

जिल्ह्यातील पिकांच्या उत्पादनात अन्नधान्य पिकांचे वर्चस्व असून त्यामध्ये तृणधान्य पिकांचा प्रमुख वाटा असून जिल्ह्याच्या एकूण अन्नधान्य उत्पादनात कडधान्य उत्पादनाचा ९.५६ टक्के वाटा आहे. तसेच जिल्ह्यात ऊसाचे १,२५,११,०४५ केन उत्पादन, कापसाचे २०८८ गाठींचे उत्पादन झाले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख पिकांच्या उत्पादन बदलांचा कल पाहिल्यास असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील ऊस, गहू, मका, हरभरा, उडीद, इतर तेलबिया इत्यादीं पिकांच्या उत्पादनाचा कल जरी वाढत असला तरी ज्वारी, बाजरी, तांदूळ, तूर, मूग यासारख्या अन्नधान्याच्या पिकांचा आणि भुईमूग, एकूण तेलबिया आणि

कापूस उत्पादनातील घटीचा कल ही चिंतेची बाब ठरत आहे. तसेच जिल्ह्यात ऊस, मका, गहू इत्यादी पिकांची उत्पादकता अधिक आहे. याशिवाय भुईमूग, एकूण कडधान्ये आणि एकूण तेलबियांची उत्पादकता अधिक आहे. त्याच वेळेस जिल्ह्यात तांदूळ, कापूस, तूर, ज्वारी, बाजरी, इतर कडधान्य आणि एकूण अन्नधान्य पिकाची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते.

### कापूस पिकाखालील क्षेत्र:

सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्राविषयी माहिती तक्ता क्र.१ मध्ये दर्शविली आहे. या तक्त्यामध्ये सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्र दर्शविली आहे.

जिल्ह्यात सन १९९०-९१ मध्ये २६१४ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखाली होते, त्यापुढे सन २००७-०८ पर्यंत काही वर्षांचा अपवाद वगळता सातत्याने वाढ होऊन सन २००७-०८ मध्ये ६९९६ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखाली होते. त्यानंतर मात्र जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होऊन सन २०१२-१३ मध्ये जिल्ह्यात फक्त ७७५ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखाली असून, सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीतील जिल्ह्यातील कापूस पिकाखाली क्षेत्राचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर ०.५५ टक्के राहिला आहे. पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण, शेती आदानांच्या किमतीत वाढ, परंतु त्याप्रमाणात कापसाला न मिळणारी किंमत यामुळे जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी कापूस पिकाऐवजी इतर पिकांकडे वळू लागल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.१ सोलापूर जिल्ह्यातील कापूसक्षेत्र

| वर्षे | क्षेत्र हेक्टरमध्ये |
|---|---|
| १९९०-१९९१ | २६१४ |
| १९९१-१९९२ | २०५६ |
| १९९२-१९९३ | ३४११ |
| १९९३-१९९४ | ३७११ |
| १९९४-१९९५ | ३३८० |
| १९९५-१९९६ | ३७८६ |
| १९९६-१९९७ | ४२०६ |
| १९९७-१९९८ | ५६८६ |
| १९९८-१९९९ | ५३८२ |
| १९९९-२००० | ५०२० |
| २०००-२००१ | ४२०३ |
| २००१-२००२ | ५६८६ |
| २००२-२००३ | ५३८२ |
| २००३-२००४ | ४४९३ |
| २००४-२००५ | ४५९५ |
| २००५-२००६ | ५७७७ |
| २००६-२००७ | ६९९६ |
| २००७-२००८ | ६९९६ |
| २००८-२००९ | ४६५० |
| २००९-२०१० | ३९६४ |
| २०१०-२०११ | ४३९२ |
| २०११-२०१२ | ४३९२ |
| २०१२-२०१३ | ३७७५ |
| सरासरी | ४४१५ |
| संयुक्त वार्षिक वाढीचा दर | ०.५५ |

*स्रोत: सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन*

तक्ता क्र. २ सोलापूर जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाचे क्षेत्र

| वर्षे | ओलिताखालील क्षेत्र (क्षेत्र हेक्टरमध्ये) | कापसाखालील एकूण क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|
| १९९०-१९९१ | १८८८ | ७२.२३ |
| १९९१-१९९२ | १४५५ | ७०.७७ |
| १९९२-१९९३ | २२०० | ६४.५० |
| १९९३-१९९४ | २६१० | ७०.३३ |
| १९९४-१९९५ | २७२० | ८०.४७ |
| १९९५-१९९६ | ३२८३ | ८६.७१ |
| १९९६-१९९७ | ३३२१ | ७८.९५ |
| १९९७-१९९८ | ३७०० | ६५.०७ |
| १९९८-१९९९ | ३८४० | ७१.३४ |
| १९९९-२००० | ३६१० | ७३.५० |
| २०००-२००१ | ३७२१ | ८८.५३ |
| २००१-२००२ | ३७०० | ६५.०७ |
| २००२-२००३ | ३८०० | ७०.६० |
| २००३-२००४ | ३६८० | ८१.९० |
| २००४-२००५ | ३७२० | ८०.९५ |
| २००५-२००६ | ४६१० | ८१.१८ |
| २००६-२००७ | ४७९६ | ६८.५५ |
| २००७-२००८ | ४७९६ | ६८.५५ |
| २००८-२००९ | ३८४४ | ८२.६६ |
| २००९-२०१० | २१०० | ५२.९७ |
| २०१०-२०११ | २१०० | ४७.८१ |
| २०११-२०१२ | २१०० | ४७.८१ |
| २०१२-२०१३ | ७७५ | १००.०० |
| सरासरी | ३१५३.५६ | ७२.६३ |
| संयुक्त वार्षिक वाढ दर | - ०.५८ | -१.४ |

*स्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन*

**सोलापूर जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाचे क्षेत्र:**

कापूस हे एक असे व्यापारी पीक आहे की, जे कोरडवाहू आणि ओलिताखालील शेतजमिनीत त्याची लागवड केली जाते. त्यामुळे या ठिकाणी जिल्ह्यातील एकूण कापूस लागवडीखालील क्षेत्रापैकी ओलिताखालील कापूस क्षेत्राची माहिती घेणे गरजेचे ठरते. तक्ता क्र.२ मध्ये ती दर्शविली आहे.

तक्त्यामध्ये सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीत जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाचे क्षेत्र, कापूस पिकांखालील क्षेत्राशी ओलिताखालील क्षेत्राचे प्रमाण दर्शविली आहे. सन १९९०-९१ ते सन २०१२-१३ या कालावधीत जिल्ह्यात सरासरी ३१५३.५६ हेक्टर कापूस पिकाचे क्षेत्र ओलिताखाली आहे. सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यातील १८८८ हेक्टर कापसाचे क्षेत्र ओलिताखाली होते. त्यानंतर पुढे सन २००७-०८ पर्यंत त्यामध्ये सातत्याने वाढ होत जाऊन ते ४७९६ हेक्टर क्षेत्र पर्यंत गेले. परंतु त्यानंतरच्या काळात त्यामध्ये घट होऊन सन २०१२-१३ मध्ये जिल्ह्यातील फक्त ७७५ हेक्टर कापूस पिकाचे क्षेत्र ओलिताखाली आहे.

सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीत एकूण कापूस पिकांखालील क्षेत्रापैकी सरासरी ७२.६३ टक्के क्षेत्र ओलिताखाली असल्याचे दिसून येते. सन १९९०-९१ मध्ये कापसाचे ७२.६३ टक्के क्षेत्र ओलिताखाली होते, पुढे सन २००८-०९ पर्यंत त्यामध्ये काही वर्षांचा अपवाद वगळता वाढ होत जाऊन सन २००८-०९ मध्ये ८२.६६ टक्के कापसाचे क्षेत्र ओलिताखाली होते. त्यानंतरच्या काळात जरी ओलिताखालील कापसाच्या क्षेत्रात घट झाली. परंतु सन २०१२-१३ मध्ये मात्र जिल्ह्यातील कापूस लागवडीपैकी १०० टक्के क्षेत्र ओलिताखाली आहे. म्हणजे मुळात सन २०१२-१३ मध्ये जिल्ह्यात फक्त ७७५ हेक्टर क्षेत्रावरच कापसाची लागवड झाली आहे, ज्याचे ओलीताखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण १०० टक्के झाले आहे. सन १९९०-९१ ते सन २०१२-१३ या कालावधीतील जिल्ह्यातील ओलिताखालील कापूस पिकाच्या क्षेत्राचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर ऋण ०.५८ टक्के राहिला आहे. तर जिल्ह्यातील एकूण कापूस लागवडीखालील क्षेत्राशी ओलिताखालील कापूस क्षेत्राच्या टक्केवारीचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर देखील ऋण १.४ टक्के राहिला.

**कापूस पिकाचे उत्पादन:**

सोलापूर जिल्ह्यातील कोरडवाहू आणि ओलिताखालील क्षेत्रातील कापूस पिकाच्या उत्पादनाची माहिती तक्ता क्र.३ मध्ये दर्शविली आहे. तक्ता क्र.३ मध्ये सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाचे उत्पादन दर्शविले आहे. सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीत जिल्ह्यात सरासरी ५७५९ कापूस गाठींचे उत्पादन झाल्याचे दिसून येते. सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात २४०० कापूस गाठींचे उत्पादन झाले होते. त्यापुढील काळात सन २००७-०८ पर्यंत सन २००१-०२ चा अपवाद वगळता कापसाच्या उत्पादनात वाढ होत गेल्याचे दिसून येते. परंतु सन २००८-०९ पासून जिल्ह्यातील कापूस उत्पादनात घट होताना दिसते. सन २०१२-१३ मध्ये जिल्ह्यात फक्त ३४६ कापूस गाठींचे उत्पादन

झाले आहे. सन १९९०-९१ ते सन २०१२-१३ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाच्या उत्पादनाचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर ७.५२ टक्के राहिला आहे. तक्त्यामध्ये सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाची प्रतिहेक्टरी उत्पादकता दर्शविली आहे. सन १९९०-९१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील कापूस पिकाची प्रतिहेक्टरी उत्पादकता १५६ कि.ग्रॅ. होती, सोलापूर जिल्ह्याची कापूस पिकाची उत्पादकता सन १९९३-९४ आणि सन २००१-०२ या दोन वर्षांचा अपवाद वगळता अधिक असल्याचे दिसून येते. परंतु त्यानंतर सन २००४-०५ पासून सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादकतेत मात्र घट झाल्याचे दिसून येते. सन २०१२-१३ मध्ये सोलापूर जिल्ह्याची प्रतिहेक्टरी कापूस उत्पादकता ७६ कि.ग्रॅ. आहे.

सन १९९०-९१ ते २०१२-१३ या कालावधीत जिल्ह्यातील कापूस पिकाच्या उत्पादकतेच्या संयुक्त वार्षिक वाढीचा दर २.२५ टक्क्यांनी घटला आहे. ही जिल्ह्यातील कापूस शेती अर्थव्यवस्थेबाबत गंभीर चिंतन करण्याची बाब आहे. कारण देशात आणि राज्यात बीटी बियाण्यांसारख्या सुधारित तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कापसाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढत असताना सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादकतेत घट होत चालली आहे.

**सारांश:**

मागील काही वर्षात जिल्ह्यातील पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण, तसेच शेती आदाने व मजुरीच्या दरातील वाढीमुळे कापूस पिकाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे.

तक्ता-३: सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादन

| वर्षे | उत्पादन ०० गाठीमध्ये |
|---|---|
| १९९०-१९९१ | २४ |
| १९९१-१९९२ | ३६ |
| १९९२-१९९३ | ६५ |
| १९९३-१९९४ | २९ |
| १९९४-१९९५ | ३२ |
| १९९५-१९९६ | ५५ |
| १९९६-१९९७ | ६५ |
| १९९७-१९९८ | ७३ |
| १९९८-१९९९ | ६८ |
| १९९९-२००० | १०२ |
| २०००-२००१ | ११२ |
| २००१-२००२ | ३५ |
| २००२-२००३ | ७५ |
| २००३-२००४ | ७८ |
| २००४-२००५ | ६५ |
| २००५-२००६ | ७० |
| २००६-२००७ | ८२ |
| २००७-२००८ | ८२ |
| २००८-२००९ | ६० |
| २००९-२०१० | ५४ |
| २०१०-२०११ | ३३.९ |
| २०११-२०१२ | २५.३ |
| २०१२-२०१३ | ३.४६ |
| सरासरी | ५७.५९ |
| संयुक्त वार्षिक वाढ दर | ७.५२ |

स्रोत:१) सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन
२) सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रीसर्च-http//:www.circr.org.in/Database/dbcapp3.html

तक्ता-४:सोलापूर जिल्ह्यातील कापूस पीक उत्पादकता (प्रतिहेक्टरी कि.ग्रॅ.मध्ये)

| वर्ष | उत्पादकता |
|---|---|
| १९९०-१९९१ | १५६ |
| १९९१-१९९२ | २९७ |
| १९९२-१९९३ | ३२४ |
| १९९३-१९९४ | १२४ |
| १९९४-१९९५ | १६५ |
| १९९५-१९९६ | २४७ |
| १९९६-१९९७ | २६३ |
| १९९७-१९९८ | २१९ |
| १९९८-१९९९ | २१५ |
| १९९९-२००० | ३४५ |
| २०००-२००१ | २९२ |
| २००१-२००२ | १४९ |
| २००२-२००३ | २९० |
| २००३-२००४ | २९५ |
| २००४-२००५ | २४० |
| २००५-२००६ | २०६ |
| २००६-२००७ | १९९ |
| २००७-२००८ | १९९ |
| २००८-२००९ | २१९ |
| २००९-२०१० | २३२ |
| २०१०-२०११ | १३१ |
| २०११-२०१२ | ९८ |
| २०१२-२०१३ | ७६ |
| सरासरी | २१६.५६५ |
| संयुक्त वार्षिक वाढ दर | -२.२५ |

*स्रोत: १) सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन*
*२) सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रिसर्च*

परंतु त्याप्रमाणात कापसाला मिळणाऱ्या दरात वाढ न झाल्याने जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी कापूस पिकाऐवजी इतर पिकांकडे वळू लागल्याने जिल्ह्यातील कापूस पिकाखालील क्षेत्र व त्यातून मिळालेले एकूण उत्पादनाच्या संयुक्त वार्षिक दरात वाढ दिसत असली तरी कापुस पिकाच्या उत्पादकतेतील संयुक्त वार्षिक दरात घट झाल्याचे दिसून आले.

जिल्ह्यातील नैसर्गिक स्थिती कापूस पिकासाठी अनुकूल असल्याने कापूस पिकाखालील क्षेत्रात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना कापूस शेतीचे महत्त्व व फायदे माहित करून देणे गरजेचे आहे. कापूस उत्पादनात वाढ करण्यासाठी सुधारित बीटी कापूस बियाणांचा वापर करणे, कापसाचा किमान दर वाढवून देणे गरजेचे आहे. तसेच कापूस दर्जा व दराबाबत निश्चित असे नियम असले पाहिजे, कापूस शेतीविषयक मार्गदर्शन व सल्ला देणारी यंत्रणा स्थापन करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची:**


1. V. Santhanam and V. Sundarm 1997, *Agri - History of Cotton in India - An Overview*, downloaded from - www.Cicr.org./resea rch.notes/ cotton_history _india.pdf. on 14 Feb.2014.
2. Dinkar Baban Chavan (2009), *A Study of Problems of Cotton Growers Farmers (With Special Reference To Phulmbri Taluka)*, (unpublished Ph.D. thesis), University of Pune, Pune, downloaded from -http://

dinkarchava.blospot.in/2011/07/study-of-problems-of-cotton-growers.htm. on 23 March 2014.

3. Sanjaykumar Jagannath Patil and Meenakshi Waykole 2013, *Status of Cotton Global to Khandesh*, Global Research Analysis, Vol.2, Issue 12, pp. 137-138, downloaded from- http://worldwidejournals.com/gra/file.php?vol= December_2013_ 1387275878 _75066_43.pdf. on 10 Dec. 2014.
4. Santosh N. Kadam, 2009 *New Agricultural Technology: Socio- Economic Impact*, Reliance Publishing House, New Delhi.
5. Central Institute for Cotton Research, downloaded from - http: // www. cicr. org.in on 20 March 2015.
6. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सन १९९० ते २०१३.

## श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य व जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक वामन चिंधू घरटे यांचे हृदयविकाराच्या आजाराने वयाच्या ६१ व्या वर्षी १५ डिसेंबर २०१६ रोजी दु:खद निधन झाले. प्रा. वामन घरटे यांचा सार्वजनिक वित्त व्यवहार या विषयावर सखोल अभ्यास होता. त्यांना मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# काळा पैसा आणि पायाभूत सुविधांचा विकास

**कृष्णा शंकर शहाणे, नाशिक,**
बी. वाय.के. (सिन्नर) कॉलेज ऑफ कॉमर्स,
नाशिक.
भ्रमणध्वनी : ९८५०७४८४८१

भारतीय अर्थव्यवस्थेत नुकत्याच झालेल्या निश्चलनीकरणामुळे किंवा नोटाबंदीमुळे स्वदेशातील काळा पैसा बाहेर निघण्यास मदत होत आहे. त्याप्रमाणेच स्विस बँकेतील पैशाचे काय? हा पैसा देखील एक दिवस भारतात येणे महत्त्वाचे आहे. भारतीय नागरिकांचा काळा पैसा मग तो स्वदेशात ठेवलेला असो वा विदेशात. तो चलनात येणे किंवा देशाच्या उत्पन्नाच्या आकडेवारीत येणे महत्त्वाचे आहे. या पैशाची गुंतवणूक शासकीय पातळीवर विविध पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी, त्यांच्या विकासासाठी केल्यास त्यातून व्यापक समाजहित साध्य होऊन देशाच्या आर्थिक व सर्वांगीण विकासासाठी मदत होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री ८ वाजता ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा चलतानूत रद्द करत असल्याचे जाहीर केले. या निर्णयामुळे देशाच्या सर्वसामान्य नागरिकांसह अर्थव्यवस्थेवर बरेच अल्पकालीन व दीर्घकालीन परिणाम संभवतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मंत्रीमंडळाच्या २६ मे २०१४ रोजी झालेल्या पहिल्याच बैठकीत भारतीय नागरिकांनी परकीय देशात व तेथील बँकांमध्ये गुंतवलेला पैसा भारतात आणण्याविषयी निर्णय घेण्यात आला होता. हे दोन्ही निर्णय म्हणजे भारतीय नागरिकांचा भारतातील व भारताबाहेरील काळा पैसा बाहेर काढण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे.

काळा पैसा ही भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेली एक कीड आहे. काळा पैसा, नकली चलन, भ्रष्टाचार या प्रमुख समस्यांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होत आहेत. या समस्यांवर मात केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेची निकोप वाढ शक्य आहे. त्या दिशेने मार्गक्रमणाचा एक भाग म्हणून पंतप्रधान

नरेंद्र मोदी यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून ५०० आणि १००० रुपये किमतीच्या नोटा चलनातून बाद करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे.

भारतासारख्या देशात काळ्या पैशाची एक समांतर अर्थव्यवस्था तयार झालेली आहे, ती नेस्तनाबूत होणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून काळा पैसा, नकली नोटांचे जाळे उध्वस्त करणे काळाची गरज आहे. सत्तेवर येताना नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना काळा पैसा बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले होते म्हणून हा निर्णय महत्त्वाचा समजला जातो.

काळा पैसा याचा सर्वसाधारण अर्थ म्हणजे चुकीच्या, अयोग्य मार्गाने कमावलेला पैसा किंवा जो पैसा कमवत असतांना त्यावरील उत्पन्न कर चुकविलेला पैसा होय. म्हणजेच वास्तविक पाहता हा पैसा देशाच्या अर्थव्यवस्थेत तयार होतो. पण त्याची नोंदणी शासन दरबारी किंवा कोठेही कागदोपत्री झालेली नसते. त्यामुळे राष्ट्राच्या एकत्र उत्पन्नाची किंवा राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे मापन करीत असतांना या काळ्या पैशाचा समावेश त्या उत्पन्नात न झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा आहे त्यापेक्षा कमी दिसतो.

सर्वसाधारणपणे काळा पैसा हा चलनाच्याच माध्यमात अस्तित्त्वात असतो असे नाही तर तो सोने, जमीन, इतर स्थावर व जंगम मालमत्ता इत्यादी स्वरूपात देखील साठवलेला असतो. भारतात सद्यस्थितीत ८६ टक्के चलन हे ५०० रुपये आणि १००० रुपये या चलनात अस्तित्वात आहे. सरकारने या चलनाला बाद केल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक घटकावर त्याचे बरे-वाईट परिणाम अल्प व दीर्घकाळात पहावयास मिळतील. अशा प्रकारे चलन बाद करण्याचा निर्णय यापूर्वी जागतिक पातळीवर तसेच भारतातही घेतला गेला होता.

**निश्चलनीकरणाची किंवा नोटा बंदीची पार्श्वभूमी:**

इ.स. १९८२ मध्ये जागतिक पातळीवर घाना या देशाने भ्रष्टाचार व करचोरी थांबवण्यासाठी ५० सेडीच्या नोटा बंद केल्या ही जागतिक पातळीवरील पहिल्यांदाच झालेली नोट बंदी ठरते. त्यानंतर इ. स. १९८४ मध्ये नायजेरीया या देशाने मोहम्मद बुखारी यांच्या नेतृत्त्वाखालील लष्करी सत्तेने विविध रंगांच्या नोटा जारी केल्या आणि जुन्या नोटा बदलण्याकरिता काही कालावधी दिला. नंतर इ. स. १९८७ म्यानमार मध्ये तत्कालिन सत्ताधाऱ्यांनी प्रचलित ८० टक्के चलन रद्द केले. जनतेत मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण होवून सरकार विरोधात मोठी निदर्शने यावेळी झाली, इ. स. १९९० मध्ये झैरे या देशात नोटांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या नावाखाली झैरेचा हुकुमशहा मोबुतु सेसे सेलो याने नोटाबंदी केली. या देशात यावेळी स्थानिक चलन अमेरिकन डॉलरच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर घसरले, इ.स. १९९१ मध्ये सोव्हिएत युनियन या देशात मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या नेतृत्वाखाली नोटाबंदीचा निर्णय काळ्या पैशावर नियंत्रण मिळवण्यासाठी घेण्यात आला. यावेळी ५० व १०० रूबल किंमतीचे चलन रद्द करण्यात आले तर इ. स. २०१० मध्ये उत्तर कोरिया या देशात हुकुमशहा किम जोंग इल याने अर्थव्यवस्था व काळाबाजार यावर नियंत्रण मिळविण्यासाठी जुन्या चलनाच्या नोटेतून दोन शून्य काढून टाकले त्यामुळे शंभरच्या नोटेचे मूल्य १ वर आले.

तर भारतातील नोटा बंदीचा इतिहास पाहता १९७८ या वर्षात १०००, ५०००, १०००० या नोटा चलनातून रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी मोरारजी देसाई पंतप्रधान असताना राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी यांनी अशा आशयाचा वटहुकूम काढला होता.

एकूणच काळा पैसा नियंत्रित करण्यासाठी घेतल्या गेलेल्या या चलन बंदीचे अनेक बरे-वाईट परिणाम अर्थव्यवस्थेवर होतील.

**निश्चलनीकरणाचे विधायक परिणाम:**

१.मोठे मासे गळाला लागतील:

मोठे मासे या प्रकारात प्रामुख्याने मोठमोठे व्यापारी, राजकारणी, सावकार, बिल्डर्स, डॉक्टर्स किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कर चुकवेगिरी करणारी मंडळी यांनी मोठ्या प्रमाणावर काळापैसा या चलनाच्या स्वरूपात दडविलेला आहे अशा मोठ-मोठ्या आसामी या मुळे हातात येवून त्यांच्याकडील काळा पैसा बाहेर येण्यास मदत होईल.

२.घरगुती अर्थव्यवस्थेतील पैसा:

भारतामध्ये घरोघरी महिला वर्ग, लहान मुले यांचेकडे देखील काही प्रमाणावर पैसा बंदिस्त स्वरूपात पडलेला आहे. या निमित्ताने या नोटांच्या स्वरूपात असणारा पैसा खर्च करणे किंवा बँकांमध्ये जमा करणे याशिवाय पर्यायच नाही. त्यामुळे हा पैसा बाहेर निघण्यास यातून मदत झालेली आहे.

३. मुख्य प्रवाहात पैशाचे आगमन:

मोठमोठे व्यापारी, राजकारणी, बिल्डर्स, डॉक्टर्स, सावकार, घरगुती बचती, महिला वर्ग, बालक या व इतर प्रकारच्या व्यक्ती ज्यांनी बँकेच्या व्यतिरिक्त या नोटांच्या स्वरूपात रोख रक्कम घरात किंवा इतर सुरक्षित ठिकाणी ठेवलेली होती. ती रक्कम आता बाहेर काढण्याशिवाय पर्याय नाही.

आता हा पैसा घरातील कुणाच्या तरी बँक खात्यावर दिसू लागेल. त्या निमित्ताने अर्थव्यवस्थेमध्ये असूनही हा पैसा प्रवाही नसल्यामुळे त्याचा विकास कामासाठी उपयोग होत नव्हता. हा पैसा आता बँक खात्यात दिसू लागल्यामुळे त्याचा उपयोग विकासकामासाठी करता येऊ शकेल. येथे फक्त जुने चलन रद्द करून त्या ऐवजी नवीन चलन त्या रूपाने चलनात येणार आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

४. पायाभूत सुविधांचा विकास:

मोठ्या प्रमाणावर असणारा हा पैसा बँक खात्यामध्ये दिसू लागल्यावर त्याचा विविध विकास कामांमध्ये उपयोग करता येऊ शकेल. विविध पायाभूत सुविधांमध्ये हा पैसा गुंतवता येऊ शकेल. ज्यायोगे विविध लोकोपयोगी उपक्रम राबवता येतील. देशातील जनतेचा मोठ्या प्रमाणावर फायदा होवून कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होईल. बँकांकडील पैशाचे प्रमाण वाढल्यामुळे कमी व्याजदरावर कर्ज उपलब्ध होऊ शकते. ज्यातून गृहनिर्माण प्रकल्प, वाहन कर्ज इतर कर्जे यांची उभारणी करून सर्वसामान्य नागरिक आपले जीवन पूर्वीपेक्षा चांगल्या पद्धतीने जगण्याचा प्रयत्न करतील. पूर्वी ज्या वस्तूंची खरेदी जेमतेम स्वरूपात केली जात होती त्यांची खरेदी चांगल्याप्रकारे केली जाईल, विविध उद्योगांना सवलती दिल्या गेल्यास त्या उद्योगांतून तयार होणाऱ्या वस्तूंची विक्री किंमत कमी राहील. त्यामुळे पूर्वी खरेदी न केल्या जाणाऱ्या वस्तूंचीही खरेदी नव्याने केली जाईल. याचा

एकूणच परिणाम म्हणून देशातील बहुसंख्य नागरिकांचे सर्वसामान्य जीवनमान उंचावेल.

५.शासकीय उत्पन्नात वाढ:

हा पैसा बँकांमध्ये भरल्यामुळे त्याची बँकांमध्ये नोंदणी होईल. म्हणजेच प्रत्येकाच्या नावावर किती पैसा आहे त्याची नोंदणी करून त्यावर प्राप्तिकर विभागाच्या नियमाप्रमाणे कर आकारणी करून तेवढा पैसा कर रुपाने कापून घ्यावा, त्यातून शासकीय उत्पन्नात भर पडेल आणि पडणारी ही भर फार मोठ्या प्रमाणावर असेल तेवढ्या मोठ्या रकमेने शासकीय खजिना समृद्ध होण्यास मदत होईल.

६.भ्रष्टाचार व काळा पैसा नियंत्रण:

या निर्णयामुळे आगामी कालावधीत थोड्या फार अंशी का होईना भ्रष्टाचार नियंत्रण करण्यास मदत होणार आहे. तसेच विविध मोठ-मोठ्या प्रकारच्या व्यवहारात नोंदणीकृत रकमेपेक्षा जास्त रकमेच्या होणाऱ्या व्यवहारांना पायबंद बसण्यास मदत होईल म्हणजेच काळा पैसा निर्मितीवर मर्यादा येतील. उदा. बिल्डर्सचे व्यवसाय, निवडणूकांतील नोटा वाटप इ.

७. नकली चलनावर परिणामकारक:

सरकारच्या या निर्णयाचा सर्वाधिक यशस्वी परिणाम हा नकली चलनावर होणारा आहे. भारतीय चलन व्यवस्थेत नकली चलन ही सर्वात मोठी समस्या आहे. शत्रू राष्ट्र, असामाजिक तत्त्वे अशा प्रकारचे नकली चलन छापून देशात पसरवून मोठ्या प्रमाणावर पैसा जमा करत होते. यामुळे ५०० आणि १००० रुपये या स्वरूपातील नकली चलन अर्थव्यवस्थेतून आपोआपच बाजूला येईल व या सर्व कारवायांसाठी वापरला जाणारा पैसा बंद होईल त्यामुळे या क्षेत्रांची आर्थिक नाकेबंदी होईल. यामुळे नकली चलनाच्या बाबतीत हे पाऊल कमालीचे यशस्वी ठरणार आहे.

८.दीर्घ कालावधीसाठी योग्य:

दीर्घ कालावधीमध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी हा निर्णय योग्य ठरेल. आर्थिक विकास व वृद्धी होण्यासाठी त्यामुळे मदतच होईल. भविष्यात बँकांचा वापर करणाऱ्या नागरिकांचे प्रमाण वाढेल. आर्थिक व्यवहारात प्लास्टिक कार्डस्चे प्रमाण वाढेल, आयकर वसुली मोठ्या प्रमाणावर होईल, पारदर्शक अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी मार्गक्रमण करणे शक्य होइल, भारतीय चलनाची किंमत वाढेल, तसेच अर्थव्यवस्था बलशाली होण्यास मदत होईल. भारतातील नकली चलनाच्या बाबतीत हे पाऊल जेवढे यशस्वी ठरेल तेवढे काळ्या पैशाच्या बाबतीत ठरणार नाही. परंतु काळा पैसा बाहेर काढण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी हे सकारात्मक पाऊल ठरेल. याचबरोबर परदेशातील भारतीयांचा भारतीय चलनाच्या स्वरूपातील काळा पैसा भारतात येणे अपेक्षित आणि महत्त्वाचे आहे. तसेच मोठ्या धनिकांचा मोठा काळा पैसा कसा बाहेर येईल यासाठी विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे.

९.कॅशलेस अर्थव्यवस्थेकडे वाटचाल:

नोटांच्या तुटवड्यामुळे नागरिकांना इंटरनेट बँकिंग, कार्डने व्यवहार करण्याची सवय लागण्यास मदत होईल. शक्य त्या ठिकाणी चलनी नोटांच्या अभावी कार्डच्या माध्यमातून व्यवहार होतील व याची सवय झाल्यास अर्थव्यवस्था कॅशलेस पद्धतीकडे मार्गक्रमण करेल.

१०.आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेत वाढ:

राष्ट्रीय उत्पन्नात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यास प्रती माणसी किंवा दरडोई उत्पन्नात फार

मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. देशाचे दरडोई उत्पन्न जितके जास्त तितकी त्या देशाची आंतरराष्ट्रीय बाजारात आर्थिक प्रतिष्ठा जास्त असते, या आर्थिक प्रतिष्ठेत त्यामुळे वाढ होईल. भारतातील कोणत्या व्यक्तीचा किती काळा पैसा स्विस बँकेत आहे? याची थक्क करणारी आकडेवारी समोर आल्यावर व हा पैसा भारतात आल्यास भारताच्या सुजलाम सुफलामतेत निश्चितच भर पडेल.

## निश्चलनीकरणाचे विघातक परिणाम:

### सर्वसामान्य जनतेची धावपळ:

अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा भाग असलेला मध्यम वर्ग व दारिद्र्य रेषेखालील अत्यंत गरीब वर्ग यांचा विचार करता बँकेत खातेदेखील नसणाऱ्यांचे मोठे प्रमाण या वर्गात दिसून येते. बँकेत खाते नाही, बँकेचे व्यवहार माहित नाही, अशिक्षितपणा, रोजंदारीची कामे करणारा मजूर वर्ग या घटकांना यामुळे त्रास संभवतो. या वर्गांकडून थोडी थोडी बचत करून आपला पैसा जो ५०० आणि १००० च्या नोटांच्या स्वरूपात रूपांतरित करून ठेवलेला आहे, अशा जनतेला हा निर्णय त्रासदायक ठरू शकतो. या धावपळीमुळे जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर वाढला असून त्यातून सर्व सामान्यांची होरपळ झाली आणि होत आहे.

### बाजारात पैशांचा अचानकपणे तुटवडा:

या निर्णयामुळे चलनातील ८६% नोटा बंद झाल्यामुळे अचानकपणे बाजारामध्ये पैशांचा तुटवडा निर्माण झाला. दैनंदिन व्यवहार करण्यासाठी पैशांचा तुटवडा उग्र रूप धारक करतो की काय? या भितीने बँका व ए. टी. एम. समोर नागरिकांनी रांगा लावल्या आणि या नोटा देखील नागरिकांनी शक्य होईल तितक्या घरात किंवा खिशात दडवून ठेवल्या.

### वस्तू व सेवांचे दर अचानक कमी:

नागरिकांच्या हाती पुरेसे चलन उपलब्ध नसल्यामुळे विविध नाशवंत वस्तू उदा. दूध, भाजीपाला व तत्सम वस्तू ज्या दीर्घकाळ पर्यंत साठवून ठेवू शकत नाही अशा वस्तूंच्या किंमती घसरल्या यामुळे अशा वस्तू विक्रेत्यांचे नुकसान झाले, त्यापेक्षा अधिक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

### काळ्या पैशावर पूर्णपणे नियंत्रण अशक्य:

काळापैसा हा या रकमेच्या नोटा, सोने, जमीन, चीजवस्तू इतर स्थावर व जंगम मालमत्ता या आणि इतर स्वरूपात देखील आहे. या नोटा रद्द करून असा काळा पैसा पूर्णपणे बाहेर काढणे अशक्य आहे. या निर्णयामुळे हा काळा पैसा काही अंशी बाहेर येण्यास मदत होईल एवढेच.

### मंदीसदृश परिस्थिती:

नागरिकांच्या हातामध्ये पुरेसे चलन नसल्यामुळे अल्प कालावधीत विविध प्रकारच्या वस्तू व सेवा यांना असणारी प्रभावी मागणी कमी होईल. बाजारात वस्तू व सेवा असून पैशाच्या अभावामुळे या कालावधीत मंदीसदृश परिस्थिती निर्माण होवून त्यातून दैनंदिन व्यवहार ठप्प होतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

### रोजगारात घट:

वस्तू व सेवांची मागणी कमी झाल्यामुळे अल्प कालावधीसाठी त्याचा उत्पादनावर विपरीत परिणाम होईल. उत्पादनात घट होईल आणि त्यामुळे रोजगारात काही अंशी का होईना घट निर्माण होईल. त्यातून परत प्रभावी मागणी मोठ्या प्रमाणावर कमी होईल.

### चलन छपाईचा खर्च:

८६% चलनी नोटा या निर्णयामुळे बाद केल्या त्या छापण्यासाठी खर्च आलेला आहे आणि या किंमतीच्या नवीन नोटा छापल्या गेल्या किंवा छापल्या जात आहेत त्यांची छपाई करणे आवश्यक आहे. त्यासाठी देखील खर्च येत आहे, हा खर्च फारसा नसला तरी शेवटी तो खर्चच आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. हा खर्च अर्थव्यवस्थेला सहन करावा लागत आहे.

काळा पैसा पांढरा करण्याचा प्रयत्न:

श्रीमंतांकडे काळा पैसा पांढरा करण्याची अनेक साधने उपलब्ध असताना ज्याठिकाणी या ५०० आणि १००० च्या नोटा स्वीकृत करण्याची मुभा दिली त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर या नोटा खपविण्यात आल्या. तेथे चांगले संबंध निर्माण करून सामाजिक प्रभावाचा वापर करून अशा नोटा व्यवहारात खर्च केल्या. तसेच बँकेतून नोटा बदल करून आणण्यासाठी अनेकांनी भाडोत्री व्यक्तींची नेमणूक देखील केली. परंतु याचा खरा त्रास मध्यमवर्ग व गरीबांनाच अधिक झाला आहे.

सदोष नोटा:

नोटा रद्द करून ५०० आणि २००० रूपये किंमतीच्या नवीन नोटा बाजारात आणण्याचा कार्यक्रम हा बराच घाईघाईमध्ये झालेला आहे. त्यामुळे या नोटांमध्ये काही छपाईच्या चुका झालेल्या आहेत. उदा. २००० च्या नोटांचा रंग जात असल्याच्या तक्रारी. त्यासाठी अपूर्ण पूर्वतयारी कारणीभूत आहे. तसेच नाशिकरोड येथील नोटप्रेसमध्ये नोटांसाठी लागणाऱ्या शाईची अचानक टंचाई निर्माण झाली.

काळापैसा आता २००० रुपयांच्या चलनात:

नवीन चलन ५०० आणि २००० रुपये असल्याने काळा पैसा धारण करणाऱ्यांनी आता पहिल्यापेक्षा मोठ्या रकमेच्या चलनात काळा पैसा साठवण्यास सुरूवात केली. उदा. २०००. असा पैसा आता मोठ्या चलनात व कमी जागेत साठवणे शक्य होणार आहे.

सामाजिक त्याग:

नोटाबंदी आणि नवीन चलन पदरात पाडून घेणे किंवा नोटा बदली करणे या गरजेपोटी समाजातील जवळ जवळ सर्वच थरातील नागरिकांनी आपले दैनंदिन कामकाज सोडून बँकांमध्ये व ए.टी.एम. समोर लांबच लांब रांगा लावल्या त्यामुळे रोजंदारीवर काम करणाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले हा एक प्रकारचा त्यागच आहे. या रांगांमध्ये अनेक ठिकाणी काही लोक मृत्युमुखी पडले.

निष्क्रीय पैशात वाढ:

भारतातील गृहिणी लहान मुलांकडील पिगी बँक किंवा गल्ले यामध्ये आता यापुढे २००० च्या नोटांचा देखील समावेश मोठ्या प्रमाणावर रहाणार आहे. त्यामुळे ही रक्कम घरात ठेवल्यामुळे या रकमेचा पैसा आर्थिक व्यवहारच्या बाहेर जावून तो निष्क्रीय बनेल त्यामुळे निष्क्रीय पैशाचे प्रमाण वाढेल.

स्थूल राष्ट्रीय उत्पादनात घट:

नोटाबंदीच्या निर्णयामुळे आगामी कालावधीतील चलन टंचाईमुळे मंदीसदृश्य परिस्थिती, रोजगारात घट निर्माण होऊन स्थूल राष्ट्रीय उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे स्थूल राष्ट्रीय उत्पादनात २ टक्क्यांपर्यंत घट होईल असे मत अर्थतज्ज्ञ व माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी व्यक्त केले.

आर्थिक विकासावर परिणाम:

नोटाबंदी किंवा निश्चलनीकरणामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासदरावर त्याचा विपरित परिणाम होणार असून सर्व सामान्यांना वेठीस धरणारा नोटाबदलाचा घोळ मार्च अखेरपर्यंत सुरूच राहील अशी भीति देखील माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी व्यक्त केली आहे. तसेच फायद्यापेक्षा अर्थव्यवस्थेवर प्रचंड भार टाकणाऱ्या या निर्णयाने किमान वर्षभर अर्थवृद्धीचा मार्ग भरकटेल असा इशाराही त्यांनी दिला.

स्विस बँकेतील काळा पैसा:

नुकत्याच अंमलात आणलेल्या चलन बंदीमुळे स्वदेशातील काळा पैसा काही अंशी बाहेर काढण्यास मदत झाली आणि होत आहे. पण भारतीयांनी भारताबाहेर दडविलेल्या काळ्या पैशाचे काय? असा एक महत्त्वाचा प्रश्न समाजात नेहमीच विचारला जातो. अनेक भारतीयांची स्वीस बँकेत खाती आहेत. त्याबद्दल भारत सरकारला आता माहिती मिळणार आहे. भारत आणि स्वित्झर्लंड यांच्या दरम्यान नुकताच या विषयी एक करार झाला असून सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसचे अध्यक्ष सुनील चंद्रा आणि स्वित्झर्लंडचे भारतातील राजदूत गिल्स रॉड्यूट यांनी या करारावर स्वाक्षरी केल्या. या अन्वये सप्टेंबर २०१९ नंतर स्वीस बँकांच्या खात्याची माहिती भारत सरकारला मिळणे शक्य होईल.

काळा पैसा आणि पायाभूत सुविधांचा विकास:

निश्चलनीकरणाच्या विधायक व विघातक परिणामाचा सारासर विचार करता रोख रकमेच्या स्वरूपात असणारा काळा पैसा बाहेर काढण्याच्या दृष्टीकोनातून हे एक चांगले पाऊल म्हणावे लागेल. कारण ही रक्कम आता घरातील कुणाच्या तरी खात्यात जमा करावी लागेल. तेवढ्या रकमेने बँकेच्या खात्यातील रोख रक्कम वाढीस लागेल आणि देशभरात वेगवेगळ्या कारणांनी बंदिस्त असणारा पैसा जो आर्थिक व्यवहारांच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर गेलेला होता असा मृत पैसा आता आर्थिक व्यवहाराच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत होणार आहे. त्या पैशाचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी विविध लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यासाठी किंवा पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी होणार आहे. उदा. रस्ते, लोहमार्ग राष्ट्रीय व राज्य महामार्ग, फ्री वे, उड्डाण पूल, जुन्या रस्त्यांचे रूंदीकरण, संपर्क व दळणवळण यंत्रणा, स्वच्छता अभियान, स्वच्छता गृहांची निर्मिती, बहुउद्देशीय धरणांची निर्मिती, पाटबंधारे, जलसिंचनाचे प्रकल्प, पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा, कार्यक्षम सार्वजनिक परीवहन यंत्रणा, शेती विकासाच्या विविध शासकीय योजना, नवनवीन सार्वजनिक उद्योगांची उभारणी, जुन्या उद्योगांचे विस्तारीकरण, त्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ, विद्युत पुरवठ्यात सुधारणा व सुसुत्रता, टेलीफोन व भ्रमणध्वनीवरील संपर्क यंत्रणा यांचा विकास, संगणक साक्षरता, विविध उपक्रमांमध्ये संगणकाचा वाढता वापर, शैक्षणिक संपन्नता आणण्यासाठी विविध शाळा-महाविद्यालयांची निर्मिती, रोजगार भिमुख शिक्षण, औद्योगिक, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण, आरोग्य सुविधांमध्ये वाढ, दारिद्र्य रेषेखालील नागरिक व कुटुंबे यांच्यासाठी शासकीय पातळीवर निवासस्थानांची निर्मिती, गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण आणि वसतीगृहांची निर्मिती, विविध सामाजिक सुधारणा करणे की ज्या सुधारणा अप्रत्यक्षपणे आर्थिक विकासास हातभार लावतील जसे सामाजिक शांतता, दहशतवाद मुक्त समाजाची

निर्मिती इत्यादी या आणि यासारख्या इतर पायाभूत सुविधा व समाजोपयोगी उपक्रमांच्या विकासासाठी या पैशाचा वापर केला जाईल. या निश्चलनीकरणामुळे अल्प कालावधीत विविध अडचणींमुळे नागरिक व समाज त्रस्त होईल आणि दीर्घ कालावधीत याचे विविध फायदे दृष्टीपथात येवू लागतील.

अशा दीर्घ कालावधीत या पैशांचे गुंतवणुकीत रूपांतर होऊन रोजगार वृद्धी होईल, विविध वस्तू व सेवांच्या निर्मितीत वाढ होईल, याच पैशातून पायाभूत सुविधांचा विकास शक्य होईल, अर्थव्यवस्थेत पैसा खेळता राहण्यास मदत होईल, नागरिकांच्या उत्पन्नात वाढ होईल, त्यातून राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यामध्ये वाढ होण्यास मदत होईल. यात वाढ झाल्यास आंतरराष्ट्रीय बाजारातील भारताच्या आर्थिक प्रतिष्ठेतही वाढ होईल. थोडक्यात निश्चलनीकरणातून गोळा झालेल्या स्वदेशातील पैसा तसेच आगामी कालावधीत स्वीस बँकेतून मिळवलेला भातीयांचा पैसा यातून पायाभूत सुविधांचा विकास झाल्यामुळे भारताच्या आर्थिक विकासाची चाके गतिमान होण्यास मदतच होणार आहे.

**संदर्भसूची:**


१. राजेंद्र शहाणे, दै. *पुढारी*, नाशिक, १३ नोव्हेंबर, २०१६, पृ.०७.
२. दै. *केसरी* पुणे, १७ जानेवारी, १९७८, पृ.०१.
३. दै. *सार्वमत*, नाशिक, ३० मे २०१४, पृ.०४.
४. दै. *सकाळ*, नाशिक, १२ नोव्हेंबर, २०१६, पृ.०१.
५. दै. *सकाळ*, नाशिक, १३ नोव्हेंबर, २०१६, पृ.०१.
६. दै. *सकाळ*, नाशिक, १७ नोव्हेंबर, २०१६, पृ.०१.
७. दै. *महाराष्ट्र टाईम्स*, नाशिक, २२ नोव्हेंबर, २०१६, पृ.१२..
८. दै. *लोकसत्ता*, नाशिक, २५ नोव्हेंबर, २०१६, पृ.०१.
९. दै. *लोकसत्ता*, नाशिक, २७ नोव्हेंबर, २०१६, पृ.०१.


## श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य व पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक मधुकरराव रामभाऊ बिबवे यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी १२ डिसेंबर २०१६ रोजी दु:खद निधन झाले. प्रा. मधुकरराव बिबवे हे अखिल भारतीय जाणीव संघटना व जाणीव सामाजिक संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष व शिवछत्र पुरस्कार विजेते होते. त्यांना मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

अर्थसंवाद

# महाराष्ट्रातील कामकरी लोकसंख्या

**रामेश्वर अण्णासाहेब तांबे**, औरंगाबाद,
भ्रमणध्वनी:९८८१२८३१३३
**धनश्री महाजन**, औरंगाबाद,
अर्थशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
भ्रमणध्वनी:९८८११३१०९३

लोकसंख्याशास्त्रानुसार एखाद्या प्रदेशातील १५ ते ६० वयोगटातील लोकसंख्या हे त्या प्रदेशातील मनुष्यबळ आहे असे मानले जाते. या मनुष्यबळातून ऐच्छिक बेकारांना वगळले तर आपल्याला श्रमशक्ती माहित होते. या श्रमशक्तीतून अनैच्छिक बेकारांची संख्या वजा केली असता रोजगारावरील व्यक्तींची संख्या माहिती होते.

प्रो.ऑर्थर लेविस यांनी १९६५ साली शेतीमधल्या अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर उद्योगात करुन उत्पादकता वृध्दीसह आर्थिक विकास कसा करता येईल याचे विवेचन Economic Development with Unlimited Supply of Labour या लेखात केले होते. याच सिध्दांताचा संदर्भ घेऊन महाराष्ट्रातील विविध प्रशासकीय विभागात कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात १९७१ ते २०११ या काळात घट झाली आहे का ? याचा अभ्यास प्रस्तुत लेखात केला आहे.

## कामकरी लोकसंख्या:

प्रस्तुत अभ्यासात शेतकरी आणि शेतमजुरांचा समावेश कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येत केला आहे तर उर्वरित कामकरी लोकसंख्येचा समावेश बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येत केला आहे.

## कामकरी लोकसंख्येचे विभागनिहाय वर्गीकरण:

महाराष्ट्राचे एकूण सहा प्रशासकीय विभाग आहेत : कोकण (मुंबईसह), नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर. या विभागांपैकी नाशिक आणि अमरावती विभागाची निर्मिती १९७१ च्या जणगणनेनंतर झाल्यामुळे

१९७१ च्या जनगणनेमध्ये महाराष्ट्राचे चार प्रशासकीय विभाग कोकण, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर असे होते. महाराष्ट्र राज्यात कामकरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण १९७१ मध्ये ३६.४७ टक्के होते. ते २०११ मध्ये ४३.९८ टक्के असे म्हणजे ७.५१ बिंदुंनी वाढले आहे.

१९७१ ते २०११ या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील विभागनिहाय कामकरी लोकसंख्येचे महाराष्ट्रातील एकूण कामकरी लोकसंख्येशी असलेले प्रमाण तक्ता क्र.१ मध्ये दिले आहे. तक्ता क्र.१ वरुन असे दिसून येते की, १९७१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण कामकरी लोकसंख्येपैकी सर्वाधिक कामकरी लोकसंख्या (३५.१३ टक्के) एवढी कोकण विभागामध्ये होती. हे प्रमाण इतर विभागांच्या तुलनेत राज्यात सर्वाधिक होते. १९८१, १९९१, २००१ तसेच २०११ च्या जनगणनेनुसार देखील कोकण विभागातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण राज्यातील सर्व विभागात सर्वाधिक होते.

**कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे विभागनिहाय वर्गीकरण:**

१९७१ ते २०११ या कालखंडामध्ये महाराष्ट्राच्या कामकरी लोकसंख्येतील कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे विभागनिहाय प्रमाण तक्ता क्र.२ वरुन स्पष्ट होते. तक्ता क्र.२ मध्ये प्रत्येक विभागातील कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे एकूण कामकरी लोकसंख्येशी प्रमाण दर्शविले आहे. १९७१ ते २०११ या कालावधीमध्ये कोकण विभागामध्ये कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण इतर विभागाच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून येते. १९७१ मध्ये कोकण विभागाची कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्या ५० टक्के एवढी होती तर २०११ मध्ये १६ टक्के एवढी होती. तसेच पुणे विभागामध्ये १९७१ साली हे प्रमाण ७० टक्के एवढे होते तर २०११ मध्ये ५० टक्के एवढे होते. कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे सर्वाधिक प्रमाण सर्व संदर्भ वर्षात अमरावती विभागामध्ये दिसून येते. तर त्या पाठोपाठ नाशिक व औरंगाबाद विभागाचा क्रमांक लागतो. १९७१ च्या जनगणनेनुसार अमरावती विभागामध्ये कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण ८२ टक्के

तक्ता क्र.१

**महाराष्ट्राच्या कामकरी लोकसंख्येत विविध विभागांचा वाटा**

| वर्ष | महाराष्ट्राची कामकरी लोकसंख्या | कोकण | नाशिक | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७१ | १००% | ३५.१३% | -- | २३.४६% | १५.६९% | -- | २५.७२% |
| १९८१ | १००% | २१.४४% | १७.४% | १९.७९% | १७.०५% | १२.०९% | १२.२३% |
| १९९१ | १००% | २२.६% | १६.९६% | २०.८५% | १७.०३% | ११.३२% | ११.२४% |
| २००१ | १००% | २३.६२% | १६.८९% | २१.५५% | १६.१६% | १०.५३% | ११.२५% |
| २०११ | १००% | २३.५६% | १७.३२% | २०.६७% | १७.१५% | १०.४२% | १०.८८% |

*स्त्रोत : भारतीय जनगणना अहवाल (१९७१, १९८१, १९९१, २००१, २०११)*

तक्ता क्र.२

कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे त्या त्या विभागातील एकुण कामकरी लोकसंख्येशी प्रमाण

| विभाग/ वर्ष | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | शेकडा दशांश बदल (१९७१ ते २०११) | (१९८१ ते २०११) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण(मुंबईसह) | ५० | २९ | २६ | २० | १६ | -३४ | -१३ |
| कोकण(मुंबईशिवाय) | ७४ | ६० | ५१ | ४१ | २८ | | |
| पुणे | ७० | ६३ | ६१ | ५६ | ५० | -२० | -१३ |
| औरंगाबाद | ८३ | ८१ | ८० | ७४ | ७३ | -१० | -०८ |
| नागपूर | ७७ | ६९ | ६७ | ६० | ५८ | -१९ | -११ |
| नाशिक | -- | ७६ | ७४ | ६९ | ६९ | - | -०७ |
| अमरावती | -- | ८२ | ८० | ७६ | ७६ | - | -०६ |
| महाराष्ट्र | ६७ | ६४ | ६२ | ५५ | ५३ | -१४ | -११ |

*(आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात)*

*स्रोत : भारतीय जनगणना अहवाल (१९७१, १९८१, १९९१, २००१, २०११)*

एवढे होते तर २०११ मध्ये ७६ टक्के एवढे होते तर औरंगाबाद विभागामध्ये १९७१ साली ते प्रमाण ८३ टक्के एवढे होते तर २०११ च्या जनगणनेनुसार ७३ टक्के एवढे होते.

वरील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, १९७१ ते २०११ या कालावधीमध्ये जवळ जवळ सर्वच विभागामध्ये कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण कमी झाले आहे मात्र ही घट काही विभागामध्ये फार मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते तर काही विभागामध्ये ही घट फार थोड्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. सर्व संदर्भ वर्षात कोकण विभागामध्ये ३४ शेकडा दशांश एवढी प्रचंड घट झाली आहे. तर अमरावती विभागामध्ये ६ शेकडा दशांश एवढी सर्वात कमी घट झाल्याचे दिसून येते.

संपूर्ण महाराष्ट्राची आकडेवारी बघता असे लक्षात येते की, महाराष्ट्रामध्ये कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. १९७१ साली महाराष्ट्रात कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण ६७ टक्के एवढे होते तर २०११ साली ते प्रमाण ५३ टक्के एवढे झाले. म्हणजेच १९७१ ते २०११ या काळात त्यामध्ये १४ शेकडा दशांश एवढी घट झाली.

१९७१ ते २०११ या काळात केवळ औरंगाबाद विभागात कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात राज्य सरासरी पेक्षा कमी घट झाली. १९८१ ते २०११ या काळात महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात ११ शेकडा दशांश एवढी घट आढळली. राज्य सरासरीपेक्षा कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येत कमी घट औरंगाबाद (८

तक्ता क्र.३

**बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे त्या त्या विभागातील एकुण कामकरी लोकसंख्येशी प्रमाण**

| विभाग/ वर्ष | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | शेकडा दशांश बदल | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | (१९७१ ते २०११) | १९८१ ते २०११) |
| कोकण(मुंबईसह) | ५० | ७१ | ७४ | ८० | ८४ | + ३४ | + १३ |
| कोकण(मुंबईशिवाय) | २६ | ४० | ४९ | ५९ | ७२ | | |
| पुणे | ३० | ३७ | ३९ | ४४ | ५० | + २० | + १३ |
| औरंगाबाद | १७ | १९ | २० | २६ | २७ | + १० | + ८ |
| नागपूर | २३ | ३१ | ३३ | ४० | ४२ | + १९ | + ११ |
| नाशिक | -- | २४ | २६ | ३१ | ३१ | -- | + ७ |
| अमरावती | -- | १८ | २० | २४ | २४ | -- | + ६ |
| महाराष्ट्र | ३३ | ३६ | ३८ | ४५ | ४७ | + १४ | + ११ |

*(आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात)*

*स्रोत : भारतीय जनगणना अहवाल (१९७१, १९८१, १९९१, २००१, २०११)*

शेकडा दशांश), नाशिक (७ शेकडा दशांश) आणि अमरावती (६ शेकडा दशांश) अशी आढळली.

**बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे विभागनिहाय वर्गीकरण:**

१९७१ ते २०११ या कालखंडामध्ये महाराष्ट्राच्या कामकरी लोकसंख्येतील बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे विभागनिहाय प्रमाण तक्ता क्र.३ मध्ये दर्शविले आहे. तक्ता क्र.३ वरुन असे स्पष्ट होते की, १९७१ ते २०११ या कालावधीमध्ये जवळ-जवळ सर्वच विभागांमध्ये बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण सर्वच विभागांमध्ये वाढत असल्याचे दिसून येते. मात्र ही वाढ काही विभागामध्ये फार मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. तर काही विभागामध्ये ही वाढ फार थोड्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. कोकण विभागामध्ये ही वाढ ३४ शेकडा दशांश एवढी झाल्याचे दिसून येते. तर अमरावती विभागामध्ये झालेली वाढ ही सर्वात कमी असल्याचे दिसून येते. अमरावती विभागामध्ये केवळ ६ शेकडा दशांश एवढी वाढ झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यात बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. १९७१ साली महाराष्ट्रात बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण ३३ टक्के होते तर २०११ ला ते प्रमाण ४७ टक्के झाले.

महाराष्ट्र राज्यामध्ये १९७१ ते २०११ या काळात बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येमध्ये १४ शेकडा दशांश एवढी वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच १९७१ ते २०११ या काळात केवळ औरंगाबाद विभागात बिगर कृषी

क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात राज्य सरासरीपेक्षा कमी वाढ झाली. १९८१ ते २०११ या काळात महाराष्ट्राच्या बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात ११ शेकडा दशांश एवढी वाढ आढळली. राज्य सरासरीपेक्षा बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येत कमी वाढ औरंगाबाद (८ शेकडा दशांश), नाशिक (७ शेकडा दशांश), अमरावती (६ शेकडा दशांश) विभागात आढळली.

**राज्य उत्पन्न रचना:**

महाराष्ट्र राज्याच्या उत्पन्नामधील कृषी क्षेत्र आणि बिगर कृषी क्षेत्राचा वाटा १९६०-६१ ते २०११-१२ या कालावधीमध्ये किती होता व त्यामध्ये कशाप्रकारे व किती प्रमाणात बदल झाला हे तक्ता क्र.४ वरुन स्पष्ट होते.

तक्ता क्र.४ वरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्राच्या उत्पन्नामध्ये १९६०-६१ ते २०११-१२ या कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत गेल्याचे दिसून येते. १९७०-७१ साली महाराष्ट्राचे उत्पन्न रु.५७८० कोटी होते, तर २०१०-११ मध्ये ९५०७७१ कोटी रुपये एवढे होते.

महाराष्ट्राच्या वाढत्या उत्पन्ना बरोबर कृषी क्षेत्राच्या उत्पन्नात व बिगर कृषी क्षेत्राच्या उत्पन्नामध्येही वाढ होत गेल्याचे दिसून येते. १९६०-६१ मध्ये कृषी क्षेत्राचे उत्पन्न ५८५ कोटी रु. एवढे होते, तर २०१०-११ साली १२२९३२ कोटी रुपये एवढे होते, त्याचबरोबर बिगर कृषी क्षेत्राचे उत्पन्न १९६०-६१ मध्ये १६६४ कोटी रुपये एवढे होते, म्हणजे २०१०-११ मध्ये रु.८२७८३८ एवढे होते, म्हणजेच कृषी व बिगर कृषी क्षेत्राच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

कृषी व बिगर कृषी क्षेत्रातील उत्पन्नाची तुलना केले असता असे दिसून येते की, कृषी क्षेत्राचे उत्पन्न अधिक आहे, १९७०-७१ साली कृषी क्षेत्राचे उत्पन्न १०७८ कोटी रुपये

तक्ता क्र.४

राज्य उत्पन्नातील कृषी व बिगर कृषी क्षेत्राचा वाटा

(२००४-०५ च्या चालू किमतीनुसार)

| वर्ष | राज्य उत्पन्न (कोटी रु.) | कृषी क्षेत्राचे उत्पन्न(कोटी रु.) | बिगर कृषी-क्षेत्राचे उत्पन्न (कोटी रु.) |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | २२४९ | ५८५ | १६६४ |
| १९७०-७१ | ५७८० | १०७८ | ४७०१ |
| १९८०-८१ | १९३७७ | ३७५६ | १५६२१ |
| १९९०-९१ | ६८८६१ | १२३२६ | ५६५३५ |
| २०००-०१ | २४३५८४ | ३२७११ | २१०८७३ |
| २०१०-११ | ९५०७७१ | १२२९३२ | ८२७८३८ |

*स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-१३.*

होते. तर बिगर कृषी क्षेत्राचे उत्पन्न ४७०१ होते.

१९९०-९१ मध्ये कृषी क्षेत्राच्या उत्पन्नात वाढ होऊन ते १२३२६ कोटी रुपये एवढे आहे, तर बिगर कृषी क्षेत्राचे उत्पन्न ५६५३५ कोटी रुपये एवढे होते तर २०१०-११ साली कृषी व बिगर कृषी क्षेत्राचे उत्पन्न अनुक्रमे १२२१३२ कोटी रुपये व ८२७८३८ कोटी रुपये एवढे म्हणजेच महाराष्ट्राच्या एकूण उत्पन्नामध्ये बिगर कृषी क्षेत्राचा वाटा अधिक आहे व त्यामध्ये होणारी वाढ जलद आहे. तर कृषी क्षेत्राचा उत्पन्नातील वाटा कमी आहे व त्यामध्ये होणारी वाढ बिगर कृषी क्षेत्राच्या तुलनेत मंद आहे.

**विषमता निर्देशांक:**

निर्देशांक आणि अनुशेष समितीने १९९७ मध्ये आपल्या अहवालात १९७८-७९, १९८५-८६ आणि १९९१-९२ या वर्षासाठी विभागनिहाय विषमता निर्देशांक मोजला होता. प्रस्तुत लेखात तीच अभ्यास पध्दती वापरुन विषमता निर्देशांक काढला आहे.

विषमता निर्देशांकाचे सूत्र या पृष्ठावरच खाली दिलेल्या लहान चौकटीप्रमाणे आहे.

एखाद्या विभागासाठी विषमता निर्देशांकाचे मुल्ये १०० पेक्षा अधिक असेल तर तो विभाग विकसित आहे असे मानले जाते. राज्य सरासरीपेक्षा विषमता निर्देशांक कमी असणे हे मागासपणाचे लक्षण मानले आहे.

तक्ता क्र.५ वरुन असे स्पष्ट होते की, २०११ साली मराठवाड्याचा प्राथमिक, व्दितीयक आणि तृतीयक क्षेत्राचा विषमता निर्देशांक अनुक्रमे ८४, ५२ आणि ५१ असा होता. तो महाराष्ट्र राज्य सरासरीपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. तर २०११ साली विदर्भाचा प्राथमिक, व्दितीयक आणि तृतीयक क्षेत्राचा विषमता निर्देशांक अनुक्रमे १०३, ६१ आणि ८२ एवढा होता. विदर्भाचा

विषमता निर्देशांकाचे सूत्र:

$$\text{विषमता निर्देशांक} = \frac{\text{उत्पादनातील वाटा}}{\text{कामकरी लोकसंख्येतील वाटा}} \quad १००$$

तक्ता क्र.५

**विभागनिहाय विषमता निर्देशांक**

| विभाग | विषमता निर्देशांक २०११ | | |
|---|---|---|---|
| | प्राथमिक क्षेत्र | व्दितीयक क्षेत्र | तृतीयक क्षेत्र |
| मराठवाडा | ८४ | ५२ | ५१ |
| विदर्भ | १०३ | ६१ | ८२ |
| उर्वरित महाराष्ट्र | १०६ | १२५ | ११९ |
| एकुण महाराष्ट्र | १०० | १०० | १०० |

*Source : Mahajan (2014) Efficacy of Policies for Industrialization of Marathwada Region Unpublished Research Report.*

२०११ साली प्राथमिक क्षेत्राचा विषमता निर्देशांक राज्य सरासरी पेक्षा अधिक होता. मात्र व्दितीयक व तृतीयक क्षेत्राचा विषमता निर्देशांक राज्य सरासरीपेक्षा कमी होता. २०११ साली उर्वरित महाराष्ट्राचा प्राथमिक, व्दितीय आणि तृतीय क्षेत्राचा विषमता निर्देशांक अनुक्रमे १०६, १२५ आणि ११९ एवढा होता. उर्वरित महाराष्ट्राच्या तिन्हीही क्षेत्राचा विषमता निर्देशांक राज्य सरासरीपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा की, महाराष्ट्र राज्यात मराठवाडा विभाग सर्वच क्षेत्रात सर्वाधिक मागासलेला आहे तर मराठवाडा व विदर्भाच्या तुलनेत उर्वरित महाराष्ट्र तिन्हीही क्षेत्रामध्ये अधिक विकसित आहे.

निष्कर्ष:

१) महाराष्ट्रातील कोकण (मुंबईसह), नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती या सहा प्रशासकीय विभागामधील कामकरी लोकसंख्येच्या विश्लेषणातून असे स्पष्ट होते की, कोकण विभागामध्ये कामकरी लोकसंख्येचे प्रमाण इतर विभागांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. कोकण विभागापाठोपाठ पुणे विभागामध्ये कामकरी लोकसंख्येचे प्रमाण इतर विभागांच्या तुलनेत अधिक आहे.

२) १९७१ ते २०११ या कालावधीमध्ये कोकण विभागात कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात घट होतांना तर बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होतांना दिसली. कोकण विभागा प्रमाणेच इतर सर्वच प्रशासकीय विभागांमध्ये कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येत घट होत आहे. तर बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येत वाढ होत आहे.

३) इतर विभागांच्या तुलनेत कोकण व पुणे विभागामध्ये बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. याचाच अर्थ असा की, कोकण आणि पुणे या विभागाचा औद्योगिक विकास आणि सेवा क्षेत्राचा विकास इतर विभागाच्या तुलनेत अधिक झाला आहे.

४) अमरावती, औरंगाबाद या विभागामध्ये जास्तीत जास्त कामकरी लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. इतर विभागांच्या तुलनेत हे विभाग कमी विकसित आहेत.

५) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील कृषी आणि बिगर कृषी क्षेत्राच्या उत्पन्नातील वाट्यात मोठ्या प्रमाणात तफावत आहे.

६) कृषी क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील वाटा घटत असून बिगर कृषी क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील वाटा वाढत आहे.

७) महाराष्ट्र राज्याचा विचार केला असता असे दिसून येते की, १९७१-२०११ या संपूर्ण कालावधीमध्ये महाराष्ट्राच्या एकूण कामकरी लोकसंख्येत कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या कामकरी लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे तर बिगर कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या कामकरी लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे. मात्र कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात हळू-हळू घट होत आहे. बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात हळू-हळू वाढ होत आहे.

८) हा बदल होत असताना कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात होणारी घट किंवा बिगर कृषी क्षेत्रातील कामकरी लोकसंख्येच्या प्रमाणात होणारी वाढ मराठवाडा आणि विदर्भात तसेच उर्वरित महाराष्ट्रातील नाशिक विभागात राज्य सरासरीपेक्षा कमी आहे.

९) प्रो.लेविस यांच्या सिध्दांतानुसार आर्थिक

विकासाच्या प्रक्रियेत बिगर कृषी क्षेत्राच्या वृध्दीतूनच लोकसंख्येचे कृषी क्षेत्रावरील अवलंबित्व कमी होत असते. ही प्रक्रिया महाराष्ट्राच्या कोकण आणि पुणे विभागात वेगाने होत असल्याचे आणि इतर विभागामध्ये मंद गतीने होत असल्याचे चित्र वरील विश्लेषणातून दिसून आले आहे.

कृषी क्षेत्राच्या विषमता निर्देशांकानुसार २०११ या वर्षी विदर्भ व उर्वरित महाराष्ट्राचा तर द्वितीयक आणि तृतीय क्षेत्राच्या विषमता निर्देशांकानुसार उर्वरित महाराष्ट्राचा निर्देशांक राज्य सरासरी पेक्षा अधिक आहे. राज्यात प्राथमिक, व्दितीयक आणि तृतीयक अशा तिनही क्षेत्रात मराठवाडा मागासलेला असून प्राथमिक क्षेत्र वगळता विदर्भ प्रदेश व्दितीयक व तृतीयक क्षेत्रात मागासलेला आहे.

**संदर्भसूची:**


१) *भारताची जनगणना*, (१९७१), मालिका, ११, महाराष्ट्र, भाग-दोन-ब (एक).

२) *भारताची जनगणना*, (१९८१), मालिका, १२, महाराष्ट्र, भाग-दोन-ब.

३) *भारताची जनगणना*, (१९९१), मालिका, १४, महाराष्ट्र, भाग-दोन-ब (एक).

४) *भारतीय जनगणना अहवाल*, २००१.

५) *भारतीय जनगणना अहवाल*, २०११.

६) दीपक भारती, (२००६), *मराठवाड्यातील लोकसंख्येच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे अध्ययन*. पीएच.डी. शोधनिबंध.

७) महाराष्ट्र शासन, (२०११), *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी*, २०१२-१३.

8) Lewis W A (1965), *Development Planning: The Essentials of Economic Planning*; Simson Shand Ltd., London.

9) Mahajan D J (2014), *Efficacy of Policies for Industrialization of Marathwada Region* (Unpublished Research Report).

# ७३ व्या घटना दुरुस्तीअंतर्गत वित्तीय स्वायत्तता व ग्रामपंचायतींची कामगिरी

माधव एच.शिंदे , गणेश बी.पोटे, अहमदनगर,
सहायक प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी,
अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९४२०४७०५३४

भारत लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश असून जगातील एकूण लोकसंख्येच्या १७.६% लोकसंख्या भारतात वास्तव्य करते. यापैकी जवळपास ६९% लोकसंख्या देशातील ग्रामीण भागात वास्तव्य करते. त्यामुळे देशातील सरकारचे ग्रामीण विकासाला प्राधान्य राहणे गरजेचे आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी अनेक योजना सरकारकडून आखल्या जातात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राबविल्या जातात. या स्थानिक स्वराज्य संस्थांना पंचायती राज संस्था म्हणून ओळखले जाते. पंचायत राज संस्थांची रचना ही त्रिस्तरीय असून ग्रामपंचायत ही या रचनेतील शेवटची महत्वाची संस्था आहे. केंद्र व राज्य सरकारांकडून ग्राम विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या अनेक योजना ग्रामपंचायतीद्वारे अंमलात आणल्या जातात. एकंदरीतच, ग्रामीण विकासामध्ये ग्रामपंचायतीसह जिल्हा परिषद व पंचायत समिती या संस्थांचीही तेवढीच महत्वाची भूमिका राहिली आहे. वास्तविकत: १९९२ पूर्वी या संस्थांचे स्थान दुय्यम स्वरूपाचे होते. मात्र १९९२ साली सरकारने राज्यघटनेत केलेल्या ७३ व्या घटनादुरूस्तीमुळे ग्रामीण विकासातील या संस्थांची भूमिका महत्वाची व जबाबदारीची बनली आहे.

७३ व्या घटना दुरूस्तीने पंचायती राज संस्थांच्या कार्यात आणखी २९ विषयांचा समावेश केला गेला. यामध्ये शेती विषयक सुधारणा, मृदसंधारण, पाणी व्यवस्थापन व पाणलोट विकास, पशुसंवर्धन, मासेमारी, सामाजिक व शेती वनीकरण, दुय्यम जंगल उत्पन्न या बरोबरच लघु व अन्न प्रक्रिया उद्योग, खादी ग्राम कुटीर उद्योग, ग्रामीण गृहरचना, पिण्याचे पाणी, इंधन व चारा, वाहतुक, जलमार्ग, दळणवळणाची अन्य साधने, ग्रामीण विद्युतीकरण, अपारंपरीक

उर्जास्त्रोत, दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रम, प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, प्रौढ व अनौपचारिक शिक्षण, ग्रंथालये, सांस्कृतिक कार्यक्रम, बाजार व यात्रा, प्राथमिक आरोग्य केंद्र व स्वच्छता, कुटुंबकल्याणाचे कार्यक्रम, महिला व बालविकास, सामाजिक कल्याण, दुर्बल घटकांचे कल्याण, सार्वजनिक वितरण व्यवस्था, समुदायाच्या मौल्यवान ठेव्याचे रक्षण अशा २९ विषयांचा यामध्ये समावेश असून ग्रामीण विकासासाठी हे विषय महत्वपूर्ण आहेत.

पंचायती राज संस्थांमध्ये ग्रामपंचायत हा एक महत्वाचा आणि मुलभूत घटक मानला जातो. ग्रामीण भागातील जनतेचा ग्रामपंचायतीशी जवळचा संबंध येतो. ७३ व्या घटनादुरूस्तीमुळे ग्रामीण विकासासाठी मिळणा-या निधीचे योग्य नियोजन करण्याची व त्यामाध्यमातून ग्रामविकास साधण्याची महत्वपूर्ण जबाबदारी पंचायत राज संस्थांवर व पर्यायाने ग्रामपंचायतींवर आली आहे. १४ व्या वित्त आयोगाने तर याही पुढे जाऊन ग्रामपंचायतींची याबाबतची भूमिका आणखी अधोरेखीत केली आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये २८८१३ एवढ्या ग्रामपंचायती आहेत. तर राज्यातील क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा मानल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्हयामध्ये १३११ एवढ्या ग्रामपंचायती आहेत. यापैकी सर्वाधिक ग्रामपंचायती अकोले या तालुक्यात तर सर्वात कमी ग्रामपंचायतींची संख्या श्रीरामपूर या तालुक्यात आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या पाथर्डी तालुक्यात १०८ एवढ्या ग्रामपंचायती आहेत. त्यामध्ये लोकसंख्येने तिसगाव ग्रामपंचायत सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राज्यातील ग्रामपंचायतीबरोबरच अभ्यासासाठी निवडल्या गेलेल्या तिसगाव ग्रामपंचायतीची आर्थिक कामगिरी अभ्यासण्यात आली आहे. प्रस्तुत शोधनिबंध चार भागात विभागलेला असून पहिल्या व दुसऱ्या भागामध्ये अनुक्रमे प्रस्तावना आणि संशोधन पध्दत आणि राज्यातील ग्रामपंचायतीचे सांख्यिकीय विश्लेषण केले आहे. तर तिसऱ्या व चौथ्या भागात अनुक्रमे प्राथमिक माहिती आधारित विश्लेषण आणि प्रमुख निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

**संशोधन पध्दती:**

सदर संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक साधनसामुग्रीमध्ये नमुना निवड पध्दती, सर्वेक्षण पध्दती, प्रश्नावली इ. घटकांचा उपयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी राज्यातील अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यातील तिसगाव ही ग्रामपंचायत निवडण्यात आली आहे. तिसगांव ग्रामपंचायत लोकसंख्येच्याबाबतीत पाथर्डी तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. तिसगांव गावातील एकूण कुटुंबापैकी सहेतूक नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या १०० कुटुंबांच्या मुलाखती घेऊन प्राथमिक माहिती मिळविण्यात आली आहे. दुय्यम साधन सामुग्रीमध्ये तिसगाव ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तसेच ग्रामीण विकासासंदर्भातील शासकीय अहवाल व लिखित माहिती तसेच विविध मासिके व पुस्तकांचा आधार घेण्यात आला आहे. याबरोबरच ग्रामीण विकासासंदर्भातील मासिके, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे या माध्यमातुन माहिती संकलित केली आहे. प्राथमिक व द्वितीय साधनांच्या माध्यमातून संकलित केलेल्या

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय व गणितीय तंत्रे, आलेख पध्दतीचा वापर केला आहे.

**२. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचे सांख्यिकीय विश्लेषण:**

महाराष्ट्रातील ग्रमापंचायतींच्या उत्पन्नाचे मुख्यतः तीन भागात वर्गीकरण केले जाते. यामध्ये ग्रामपंचायतीचे स्वतःचे उत्पन्न, अनुदाने आणि देणग्या यांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचा विचार करता एकूण उत्पन्नामध्ये स्वतःच्या उत्पन्नाचा वाटा सर्वाधिक असला तरी, यामध्ये २००५-०६ ते २०११-१२ या कालखंडात मोठी घट झाल्याचे दिसून येते. २००५-०६ साली राज्यातील ग्रामपंचायतींच्या एकूण उत्पन्नामध्ये स्वतःच्या उत्पन्नाचे ५२ टक्के असलेले प्रमाण २०११-१२ साली ४५.७८% पर्यंत घटले असून, अनुदानाच्या स्वरूपात मिळणाऱ्या मिळकतींचे प्रमाण मात्र या कालावधीत वाढले आहे. तर देणग्यांच्या रूपात मिळणारे उत्पन्न २००५-०६ यावर्षीच्या तुलनेत २०११-१२ साली वाढल्याचे दिसून येते.

ग्रामपंचायतीद्वारे होणारा खर्च ग्रामविकासामध्ये मोलाची भूमिका बजावतो. ग्रामपंचायतीद्वारे केल्या जाणा-या खर्चाचे ढोबळमानाने आरोग्य, सार्वजनिक कामे, लोककल्याणाची कामे आणि इतर खर्च या चार वर्गामध्ये वर्गीकरण केले जाते. यापैकी आरोग्यावर केला जाणारा खर्च हा मुलभूत स्वरूपाचा असून कार्यकारी लोकसंख्येची श्रमपुरवठ्याची क्षमता वाढविण्यासाठी महत्वपूर्ण मानला जातो. २००५-०६ साली राज्यातील ग्रामपंचायतीच्या एकूण खर्चामध्ये या खर्चाचे २४.०२ % असलेले प्रमाण २०११-१२ साली जवळपास तेवढेच २४.३२% राहिले आहे. २००५-०६ साली एकूण खर्चामध्ये सार्वजनिक कामावर केल्या जाणाऱ्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक ३८.६५% तर लोकल्याणाची कामे आणि इतर खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ६.५८ % आणि ३०.७३% इतके राहिले आहे. २०११-१२ साली सार्वजनिक कामावरील खर्चाच्या प्रमाणात २४.४६% पर्यंत लक्षणीय घट झाल्याचे दिसून येते. तर लोककल्याणाच्या कामावरील व इतर खर्चामध्ये ही लक्षणीय वाढ झाली आहे. २०११-१२ साली या खर्चामध्ये अनुक्रमे ६.५८% व ३०.७३ % वरून २०.११% व ३१.१०% इतकी वाढ झाल्याचे दिसून येते. ग्रामपचांयतींच्या खर्चामध्ये झालेले रचनात्मक परिवर्तन ग्रामविकासांमध्ये महत्वपूर्ण असून लोक कल्याणाच्या कामावरील खर्चात झालेल्या वाढीमुळे ग्रामविकासाला बळ मिळाले असुन त्यामुळे ग्रामविकासात निश्चितच भर पडली आहे असे म्हणता येईल.

**वित्तआयोगामार्फत ग्रामपंचायतींना उपलब्ध झालेला निधी:**

७३ व्या घटनादुरूस्तीनंतर देशातील ग्रामपंचायतींना खऱ्या अर्थाने आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे गावपातळीवरील खर्चाचे योग्य नियोजन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर आली आहे. त्यादृष्टीने १० व्या वित्त आयोगापासून ग्रामपंचायतींना निधीचे वाटप करण्यास सुरूवात झाली आहे. १० व्या वित्त आयोगाने देशातील ग्रामपंचायतींना ४३८० कोटी रु. ची तरतूद केली. त्यानंतरच्या वित्त आयोगांनी यामध्ये लक्षणीय वाढ करीत ग्रामपंचायतींना ग्रामविकास प्रक्रियेमध्ये आर्थिक पाठबळ दिलेले

आहे. २०१५-२०२० या कालावधीसाठी निधीचे वाटप करण्यासाठी नेमलेल्या १४ व्या वित्त आयोगाने मागील वित्त आयोगांच्या पुढे एक पाऊल टाकत ग्रामपंचायतींना निधीचे प्रत्यक्ष हस्तांतरण करण्याची महत्वपूर्ण शिफारस केली आहे. त्यादृष्टीने देशातील पंचायतींसाठी जवळपास २००२९२ कोटी रु. इतक्या रकमेची तरतूद करण्याची शिफारस केली आहे. १४ व्या वित्त आयोगाने ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष निधी हस्तांतरणाचा निर्णय घेतल्यामुळे ग्रामविकासातील ग्रामपंचायतींची भूमिका आणखी महत्वपूर्ण बनली आहे.

ग्रामपंचायतींना दिल्या जाणाऱ्या निधीचे वाटप करण्यासाठीचे सूत्र ठरविण्याची जबाबदारी १४ व्या वित्त आयोगाने राज्यांवर टाकली असून राज्य वित्त आयोगांनी तो निश्चित करावा असे स्पष्ट केले आहे. एखाद्या परिस्थितीत सूत्र तयार नसेल तर निधीचे वाटप करण्यासाठी लोकसंख्या ९०% आणि क्षेत्र १०% या सुत्राचा आधार घ्यावा असे सूचविले आहे. तसेच निधीचे वाटप करण्यासाठी वित्त आयोगाने ग्रामपंचायतींची कामगिरी लक्षात घेतली असून त्यानूसार अनुदाने वाटप करण्याची सूचना केली आहे. त्यासाठी ग्रामपंचायतींच्या उत्पन्न आणि खर्चाची विश्वासार्ह आकडेवारी आणि स्वतःच्या महसूल स्त्रोतांमध्ये होणारी वाढ या दोन चलांचा आधार घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

यादृष्टीने देशातील ग्रामपंचायतींना आता निधी हवा असल्यास आपल्या कामगिरीमध्ये सुधारणा करावी लागणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायतींचे उत्पन्न आणि खर्चाची आकडेवारी आणि महसूलात वाढ करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती सादर करावी लागेल. १४ व्या वित्त आयोगाच्या या तरतुदीमुळे यासंदर्भात उत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना मोठया प्रमाणात विकासनिधी उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

**अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च:**

राज्यामध्ये भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठ्या असलेल्या अहमदनगर जिल्ह्यामध्ये आज १३११ इतक्या ग्रामपंचायती आहेत. या एकूण ग्रामपंचायतींच्या उत्पन्न आणि खर्चाचे विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचा विचार करता, एकूण उत्पन्नामध्ये जमीन व इतर मालमत्ता कर आणि इतर कर व शुल्क यास स्वतःचे उत्पन्न म्हणून ओळखले जाते. २००९-१० साली एकूण उत्पन्नामध्ये स्वतःच्या उत्पन्नाचे प्रमाण २८.३% इतके होते. २०१२-१३ साली यात २९.४४ % पर्यंत वाढ झाली आहे. ग्रामपंचायतींच्या एकूण उत्पन्नामध्ये शासकीय अनुदानाचा वाटा सर्वाधिक (३०.२६%) असून २००९-१० च्या तुलनेत २०१२-१३ साली यात ४०.२७ % पर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते. तर अंशदान, देणग्या व इतर अनुदानाच्या प्रमाणात अल्पशी घट झाली आहे. ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या इतर जमांचे एकूण उत्पन्नातील प्रमाण लक्षणीयरित्या कमी झाले आहे. ग्रामपचायतींच्या एकूण उत्पन्नामध्ये स्वतःच्या उत्पन्नाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असून १४ व्या वित्त आयोगाच्या निर्देशानुसार त्यात वाढ करणे ग्रामपंचायतींना क्रमप्राप्त आहे तरच त्यांना विकासनिधी मिळू शकतो.

अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या खर्चाचा विचार करता, २००९-१० च्या तुलनेत २०१२-१३ साली प्रशासन, आरोग्य व स्वच्छता आणि सार्वजनिक बांधकाम यावरील खर्चात लक्षणीय घट झाली आहे. तर शिक्षण आणि लोककल्याणावरील खर्चात संबंधीत कालखंडात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. २००९-१० साली शिक्षण आणि लोककल्याणावर अनुक्रमे ०.५९ % आणि ०.२९% एवढा असलेला खर्च २०१२-१३ साली अनुक्रमे ५.३१% आणि ४.४६% पर्यंत वाढल्याचे दिसून येते. ग्रामपंचायतींच्या शिक्षणावरील खर्चात झालेली ही मोठी वाढ महत्वपूर्ण असून ग्रामीण भागाच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान देणारी ठरली आहे. याचा सकारात्मक परिणाम जिल्ह्याच्या साक्षरता दरात वाढ होण्यावर झाला असल्याचे दिसते.

**तिसगांव ग्रामपंचायतीच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण:**

अभ्यासासाठी निवडलेल्या तिसगांव ग्रामपंचायतीच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण याठिकाणी करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या स्वतःच्या उत्पन्नामध्ये निवासी इमारतीवरील मालमत्ता कर, नळपट्टी, दिवाबत्ती कर, जाहिरात कर यासारख्या प्रमुख घटकांचा समावेश होतो. तिसगाव ग्रामपंचायतीच्या २०१६ च्या अर्थसंकल्पावरून एकूण जमा रकमेमध्ये ग्रामपंचायतीच्या स्वतःच्या महसूलाचा जवळपास ७०% इतका वाटा असून सरकारी अनुदाने यांचा वाटा ३०% इतका असल्याचे दिसते. उत्पन्नाचा विचार करता, निवासी इमारतीवरील मालमत्ता कराचा ग्रामपंचायतीच्या उत्पन्नामध्ये सर्वाधिक वाटा (३६.३८%) असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल नळपट्टी, ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांचे वेतन अनुदान आणि बांधकाम व पुरवठा यांच्या अग्रिम रक्कमा यांचे अनुक्रमे २१.०७, १३.१७ आणि ७.९% प्रमाण असल्याचे दिसून येते. थोडक्यात ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नामध्ये स्वतःच्या उत्पन्नाचा वाटा हा सर्वाधिक असून तिसगांव ग्रामपंचायतीसाठी ही जमेची बाब म्हणता येईल.

दुसरीकडे, तिसगांव ग्रामपंचायतीद्वारे केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये ग्रामपंचायत कर्मचारी आणि पाणीपुरवठा कर्मचारी यांच्या वेतनाचा एकत्रीत वाटा २३% इतका असल्याचे दिसून येते. त्या खालोखाल शासकीय पाणीपट्टी भरणा, समाजकल्याण गटार बांधकाम आणि सफाई निधी यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण अनुक्रमे १०.२३%, ६.१३% आणि ६.१३% इतके असल्याचे दिसून येते. याबरोबरच निर्मल भारत अभियान व रस्त्यांवर केल्या जाणाऱ्या खर्चाचा एकूण खर्चामध्ये अनुक्रमे जवळपास ५% इतका वाटा आहे. तर, जलशुध्दीकरण, बालविकास आणि कुपोषण निर्मुलन यावर केल्या जाणा-या खर्चाचे प्रमाण नगण्य असल्याचे दिसून येते.

थोडक्यात, तिसगांव ग्रामपंचायतीच्या ताळेबंदावरून ग्रामपंचायतीच्या उत्पन्न व खर्चाचे नियोजन लक्षात येते. ग्रामपंचायतीचा स्वतःचा बाजारतळ, वाहनतळ याबरोबरच जाहिरातींवरील लावण्यात येणाऱ्या करांचे योग्य नियोजन करून उत्पन्नात वाढ करता येऊ शकते. दुसरीकडे, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, रस्ते यावर केल्या जाणाऱ्या खर्चात वाढ होणे आवश्यक असून ग्रामविकासासाठी तो लाभदायक मानला जातो.

## तिसगांव ग्रामपंचायत अंतर्गत उपलब्ध मुलभूत सुविधा:

अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यातील लोकसंख्येच्या बाबतीत सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून तिसगांव ग्रामपंचायत ओळखली जाते. प्रस्तुत अभ्यासासाठी तिसगांव ग्रामपंचायतीची निवड केली गेली असून गावातील सहेतुक पध्दतीने निवडण्यात आलेल्या १०० कुटुंबांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहिती घेण्यात आली असून त्यामुळे गावांतील लोकांपर्यंत सरकारी योजनांचे लाभ पोहचले आहेत की नाही याची माहिती मिळण्यास मदत झाली. तिसगांवमधील १०० कुटुंबांशी मुलाखत साधल्यानंतर मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

देशातील गावे हगणदारीमुक्त करण्यासाठी शासन पातळीवर अनेक प्रयत्न केले जात आहेत. गावातील लोकांना घरामध्ये शौचालये बांधण्यासाठी व ती वापरण्यासाठी सरकारकडून विशेषतः दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना अनुदान पुरवले जाते. मात्र तिसगांव गांवामध्ये आजही जवळपास ३०% लोकांकडे शौचालये नाहीत. तर ज्या कुटुंबाकडे शौचालये आहेत त्यापैकी जवळपास ८८% लोकांनी ती स्वखर्चातून बांधली आहेत तर केवळ १२% लोकांनाच यासंबंधीचे अनुदान प्राप्त झाले आहे. थोडक्यात, हगणदारीमुक्त तिसगांवचे उद्दिष्ट अजून पूर्ण होऊ शकलेले नाही असे दिसून येते.

देशातील सर्वच गावामध्ये सांडपाण्याची व्यवस्था राबविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात अनुदाने दिली जातात. असे असले तरी, तिसगांव मधील २४% कुटुंबांना आजही सांडपाण्याची व्यवस्था उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे अशा कुटुंबांनी शोषखड्ड्याचा वापर सांडपाण्याची व्यवस्था म्हणून केलेला आहे. ७२ % कुटुंबांना नालीद्वारे सांडपाण्याची व्यवस्था उपलब्ध असली तरी नाल्यांची दुरूस्ती अनेक वर्षापासून रखडलेली असल्याने या नाल्यांची गटारे झाले असल्याचे दिसून येते. तर ४% कुटुंबाकडे सांडपाण्याची कोणतीही सुविधा नसल्याने ते उघड्यावर पाणी सोडून देतात. गावातील लोकांच्या याचा आरोग्यावर विपरित परिणाम होत असून गावात साथीचे आजार बळावण्याचा धोका निर्माण झाला आहे.

देशातील सर्व लोकांना नळाद्वारे पिण्याचे पाणी पुरविण्याचे उद्दिष्ट ठेवून सरकारने अनेक योजना जाहीर केल्या आहेत. जलस्वराज योजना ही त्यापैकीच एक असून महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या योजनेची राज्यातील अनेक गावामध्ये अंमलबजावणीही झाली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नळयोजना राबविली जाते. तसेच २००९ पासून केंद्र सरकारद्वारे राज्यातील ग्रामीण भागात कायमस्वरूपी पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविला जात आहे. २०१४-१५ साली केंद्र सरकारने या कार्यक्रमासाठी १५६५.७७ कोटी रु. ची तरतूद केली होती. २०१५-१६ साली राज्य सरकारने राज्यातील दुष्काळी भागातील पाणीपुरवठयासाठी जवळपास ३००.३५ कोटी रु. ची तरतूद केली होती. याअनुषंगाने तिसगांव मधील पाणीपुरवठयासंबंधी माहिती घेतली असता, जवळपास ९१% कुटुंबांना नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळते तर ९% कुटूंबांना हातपंप, विहीर, टँकर याद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होते. ९१%

कुटुंबांना नळाद्वारे पाणीपुरवठा होत असला तरी गावासाठी पाण्याचा खात्रीशीर स्त्रोत उपलब्ध नसल्याने आठ ते पंधरा दिवसानंतर नळाला पाणी येते. त्यामुळे गावातील पाणीपुरवठा योजना लाभदायक नसल्याचेच मत अनेक कुटुंबांनी व्यक्त केले आहे.

गावामध्ये स्वच्छता केली जावी तसेच कचऱ्याचे योग्य नियोजन केले जावे या हेतूने राज्यामध्ये संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात आली. तसेच केंद्र सरकारतर्फे निर्मल भारत अभियानाची अंमलबजावणी केली जात आहे. आज या दोन्हीही योजना स्वच्छ भारत अभियान या नावाने ओळखल्या जातात. केंद्र व राज्य सरकारकडून त्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. या दृष्टीने तिसगांवमधील कचरा व्यवस्थापनाची माहिती घेतली असता, आजही ७१% कुटुंबे उकीरड्यावर कचरा टाकतात. तर २१% कुटुंबे कचरा जाळून टाकतात. मात्र कचरा जाळल्याने गावातील हवा प्रदुषीत होऊन त्याचा लोकांच्या आरोग्यावर होणाऱ्या विपरित परिणामाकडे दुर्लक्ष होताना दिसते. केवळ ८% लोकांनाच कचरा कुंडीची व्यवस्था उपलब्ध असल्याचे दिसून आले. गावामध्ये कचरागोळा करण्यासाठी घंटागाड्या उपलब्ध करून देणे आवश्यक असते. मात्र तिसगांवमध्ये अशा प्रकारची कुठलीही व्यवस्था नसल्याचे दिसून आले.

थोडक्यात, ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामपंचायतींना आर्थिक स्वातंत्र्य बहाल करूनही आणि वित्त आयोगामार्फत निधीचे प्रत्यक्ष हस्तांतरण केले जात असले तरी, तिसगांव आणि यासारख्या देशातील असंख्य ग्रामपंचायतींच्या विकासकार्यात अपेक्षित वाढ झाली नसल्याचे स्पष्ट होते. ग्रामविकासाला प्रोत्साहन देण्यासाठी १४ व्या वित्त आयोगाची भूमिका महत्वाची असून त्यामुळे देशातील ग्रामीण विकासात भर पडेल अशी अपेक्षा आहे.

**सारांश:**

थोडक्यात, केंद्र व राज्य सरकारांमार्फत ग्रामविकासासाठी अनेक योजना राबविल्या जातात. अशा योजनांवर सरकार कोटयावधी रूपये खर्च करते. असे असले तरी, गावपातळीपर्यंत या योजनांची अंमलबजावणी कशा पध्दतीने होते याचा अंदाज प्रस्तुत अभ्यासावरून बांधता येईल. तिसगांव ही ग्रामपंचायत केवळ पाथर्डी तालुक्यातीलच नाही तर अहमदनगर जिल्हयातील मोठया ग्रामपंचायतींपैकी एक आहे. ग्रामपंचायतीद्वारे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मुलभूत सोयी सुविधांची पडताळणी केली असता, तिसगांव ग्रामपंचायत गावातील लोकांना मुलभूत सूविधा पुरविण्यामध्ये वा गावाची आदर्श गाव म्हणून ओळख निर्माण करण्यामध्ये काही प्रमाणात अपयशी ठरली आहे. तसेच सदर ग्रामपंचायतीच्या अर्थसंकल्पाची माहिती घेतली असता अर्थसंकल्पाच्या मांडणीकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून आले. तसेच अर्थसंकल्पाच्या बाबतीत ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थांमध्ये योग्य त्या प्रमाणात जागृती नसल्याचे दिसून आले जे ग्रामविकासावर विपरित परिणाम करणारे आहेत. अहमदनगर जिल्हयातील राळेगणसिध्दी, हिवरेबाजार या ग्रामपंचायतींनी ग्रामविकासाचा राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर एक आदर्श निर्माण केला असताना त्याच जिल्ह्यातील

तिसगांव सारख्या ग्रामपंचायतीला याबाबतीत उल्लेखनिय कामगिरी न करता येणे निराशाजनक आहे.

आज ७३ व्या घटना दुरुस्तीला जवळपास २५ वर्षे पूर्ण होत आलेले असूनही ग्रामविकासासाठी मिळणारा निधी प्राथमिकता निहाय खर्च करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य अजूनतरी ग्रामपंचायतींना मिळाले नसल्याचेच स्पष्ट होते. त्यातच १४ व्या वित्त आयोगाने ग्रामपंचायतींना निधीचे प्रत्यक्ष हस्तांतरण करण्याचा घेतलेला निर्णय ग्रामविकासाचे उत्तम नियोजन करण्यासाठी लाभदायक राहणार असून त्याबाबतीत ग्रामपंचायतींना आपली भूमिका अधिक काळजीपूर्वक पार पाडावी लागणार आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद योग्य प्रकारे ठेवण्याची सूचना १४ व्या वित्त आयोगाने केलेली असून ग्रामपंचायतींना अनुदान मिळण्यासाठी तो महत्वपूर्ण निकष मानला जाणार असल्याने ग्रामपंचायतींना आता याबाबतीत गांभीर्याने लक्ष घालावे लागणार आहे. थोडक्यात, ग्रामविकासाचे नियोजन करण्यासाठी विविध योजनांचा निधी मिळविण्यासाठी आणि मिळालेल्या निधीच्या खर्चाचे योग्य नियोजन करण्यासाठी ग्रामपंचायतींच्या पदाधिका-यांनी लक्ष दिल्यास ग्रामविकासाला हातभार लागेल हे निश्चित.

**संदर्भसूची:**


१. कोरे सिंधुदेवी कृष्णराव, २००८, *ग्रामीण महिला सबलीकरण आणि पंचायत राज्य*, अर्थसंवाद, खंड ३२, अंक-२ ISSN -०९७३-८४५२ ऑक्टो.डिसें.२००८.

२. दर्शनकार अर्जूनराव, १९९२, *पंचायत राज आणि नागरी प्रशासन*, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

३. भोळे भास्करराव लक्ष्मण, २००८, *भारतातील गणराज्याचे शासन आणि राजकारण*, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिकेशन, नागपूर

४. शिंदे मदन राधाकिसन, २०१५, *ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन योजना*, अर्थसंवाद, खंड ३९, अंक-१, ISSN -०९७३-८४५२ एप्रिल-जून २०१५

५. यादव शिवाजी भ., २०१५, *नविन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम*, अर्थसंवाद खंड-३९, अंक-१, ISSN -०९७३-८४५२ एप्रिल-जून २०१५

6. www.panchayatraj.in

7. www.mahades.maharashtra.gov.in

# शेतीक्षेत्रातील मजुरांचा तुटवडा

**मनिषा मनोज चौधरी**, जामनेर,
गीताबाई दत्तात्रय महाजन आर्टस् श्री. केशरीमल
राजमल नवलखा कॉमर्स आणि मनोहर शेठ धारीवाल
सायन्स कॉलेज, जिल्हा जळगाव.
भ्रमणध्वनी: ७५८८६१५४६८
ईमेल: mannurc@gmail.com

भारतासारख्या विकसनशील देशात बळीराजाची परिस्थिती आधीपासून दयनीय आहे. त्यात दिवसेंदिवस वाढच होत आहे. अनियमित पडणारा पाऊस, कर्जाचा वाढता बोजा इत्यादी अनेक समस्यात भर म्हणजे शेतमजुरांचा तुटवडा. एकीकडे देशात आणि प्रामुख्याने ग्रामीण भागात बेकारीचे प्रमाण मोठे असताना दुसरीकडे शेतमजुरांचा तुटवडा जाणवतो व विरोधाभासी चित्र असले तरी ते सत्य आहे. सर्वप्रथम आपण शेतमजूर कोणाला म्हणावे ते पाहू.

शेतमजूर या संकल्पनेत कोणाचा समावेश करावा ह्या प्रश्नाचे उत्तर कठीण आहे. पण तरीही काही चौकशी समित्यांनी व तज्ज्ञांनी याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

१९५०-५१ च्या कृषी मजूर चौकशी समितीच्या मते, जे लोक शेतीच्या लागवडीमध्ये गुंतलेले असून त्यासाठी मजुरी घेतात ते शेतमजूर असतात. परंतु मजुरी घेऊन काम करणारे आणि मजुरी न घेता काम करणारे यांच्यामध्ये फरक करणे कठीण आहे. काही मजूर असेही असतात की जे वर्षातील काही दिवस मजुरीवर काम करतात. तर काही दिवस इतर कामे करतात. या संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की कुटुंबातील अर्धे किंवा त्यापेक्षा जास्त लोक मजुरी घेऊन काम करीत असतील तर ते शेतमजूर कुटुंब होय.

१९५६-५७ च्या दुसऱ्या शेतमजूर चौकशी समितीच्या मते, शेतीमध्ये काम करणारे तर शेतमजूर असतातच, शिवाय दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन इत्यादी पुरक व्यवसायातील लोकसुद्धा शेतमजुरांच्या गटात येतात. या समितीने थोडा अधिक व्यापक दृष्टिकोन स्वीकारुन शेतमजूर कुटुंबाच्या

कल्पनेत बदल केला आहे. त्यानुसार ज्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेतीमधील कामाची मजुरी हे आहे. त्याला शेतमजूर कुटुंब म्हणावे.

राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते, ज्या व्यक्ती अकुशल आणि असंघटीत असून उपजीविकेसाठी ज्यांच्याजवळ श्रम हेच साधन आहे त्यांना शेतमजूर म्हणता येईल. या व्याख्येनुसार भूमिहीन शेतमजूर आणि वर्षातील काही काळ दुसऱ्याच्या शेतात काम कारणारे सिमांत आणि अल्प भूधारक यांचाही समावेश शेतमजूर या संज्ञेत होतो.

१९६१ च्या खानेसुमारीनुसार, An agricultural labourer is one who works in another persons land only as a labourer (without exercising any supervision or direction in cultivation) for wages in cash, kind or share of production. He should have been working as agricultural labourer in the last or the current working season. या व्याख्येप्रमाणे, या मजुराने गेल्या मोसमात काम केलेले असले पाहिजे किंवा चालू मोसमात तो काम करत असला पाहिजे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार, A person who for more than half of the total number of days on which he actually worked during the year, worked as an agricultural labourer. या व्याख्येप्रमाणे ज्या व्यक्तीने वर्षभरात एकूण जितके दिवस काम केलेले असेल त्यातील निम्म्याहून अधिक दिवस शेतमजूर म्हणून काम केलेले असेल, तिला शेतमजूर असे संबोधता येते.

**शेतमजुरांचे प्रकार :**

वरील व्याख्यांच्या आधारावर आपण शेतमजूरांचे दोन व्यापक वर्ग सांगू शकतो.

**भूमिहीन शेतमजूर -** ज्या व्यक्तीजवळ थोडीही जमीन नसते ज्यांच्या जवळ त्यांचे श्रम हे एकमेव उपजीविकेचे साधन असते त्यांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.

**अल्प भूधारक शेतमजूर -** ज्यांच्या जवळ थोडी जमीन आहे, परंतु उपजीविका चालविण्यासाठी अपुरी पडत असल्यामुळे त्यांना इतरांच्या शेतावर काम करणे भाग पडते. अशा शेतमजुरांना आपण अल्पभूधारक शेतमजूर म्हणू शकतो. शेतमजूर चौकशी समितीने नियमित किंवा संलग्न शेतमजूर (Permanent of attached Labourers) आणि नैमित्तिक शेतमजूर (Casual Labourers) असे दोन गट पडले आहे.

**नियमित शेतमजूर-** नियमित मजुरांचा जमीन मालकांशी तोंडी किंवा लेखी करार झालेला असतो. हा करार तीन महीने ते एक वर्षाच्या काळाचा असू शकतो. या काळात त्यांची मजूरी ठराविक असते. उदा. सालदार नियुक्त करतांना त्यांचे साल म्हणजे एका वर्षाचे मौद्रिक वेतन ठरविण्यात येते शिवाय दरमहा ज्वारीच्या रुपात त्याला मोबदला मिळतो.

**नैमित्तिक शेतमजूर -** जे शेतमजूर नियमित नसून जसे काम पडेल त्याप्रमाणे रोजंदारीवर घेतले जातात त्यांना नैमित्तिक शेतमजूर म्हणतात. त्यांना दररोज काम मिळण्याची खात्री नसते. तसेच कोणत्याही ठिकाणी काम करण्यास ते स्वतंत्र असतात त्यांची मजुरी परिस्थितीनुसार ठरते.

**कारणे:**

१९७२ साली जो भयानक दुष्काळ पडला त्यापूर्वीपर्यंत शेतमजुरांची उपलब्धता

बऱ्यापैकी होती. रोजगारही शेतकऱ्यांना व शेतमजुराला परवडेल असा मिळत असे. त्यावेळी स्त्री मजुराला ५ रुपये आणि पुरुष मजुराला १२ ते १५ रुपये दिवसाला मिळत असत. परंतु त्यावेळीही शेतमजुरांची काम करण्याची फारशी प्रवृत्ती नव्हती. कामाची वेळ ९ ची असल्यास ते १० ते ११ वाजता कामाला सुरुवात, दुपारी १ वाजता जेवणाची सुटी, थोडी विश्रांती असा प्रकार चालत असे.

उन्हाळयात विदर्भ, मराठवाडा, खान्देशात सकाळी ७ ते दुपारी १२ ही कामाची वेळ असते. याला एकपारगी म्हणतात. हिवाळा व पावसाळा या काळात देशभरात सकाळी ९ ते सायंकाळी ६ आणि मध्ये १ तास जेवणाची सुटी असते. परंतु प्रत्यक्ष काम मात्र ५ ते ६ तासच होत असते. १९७२ च्या दुष्काळात शेतमजूर तसेच शेतकरीही बिकट अवस्थेत असल्याने सरकारमार्फत विविध योजना, कार्यक्रम हाती घेण्यात आले तसेच देशभरात औद्योगिक क्षेत्र विकसित झाल्यामुळे कृषीक्षेत्रात शेतमजुरांच्या टंचाईस सुरुवात झाली.

एमआयडीसीच्या विकासामुळे परिसरातील मजुरांना आनंद झाला कारण उन्हाळ्यात शेतात कष्टाची कामे करण्यापेक्षा एमआयडीसीमध्ये हेल्पर किंवा कुशल कारागीर म्हणून काम करणे जास्त सोयीचे वाटू लागले. शिवाय शेतमजुरीपेक्षा यात उत्पन्नही जास्त मिळत होते.

६०-७० च्या दशकात ग्रामीण तरुण वर्ग शेतातील उन्हातील कष्टाची कामे टाळून कमी पगारात का होईना पण शहरात काम करण्यास उत्सुक होता. शहरातील झगमगाटीचे आकर्षण हे ही त्यामागचे एक कारण होते आणि त्यामुळे इकडे शेतावर मजुरांचा वानवा जाणवू लागली

एमआयडीसी निर्माण झाल्यामुळे आणि उद्योगधंद्यांचे प्रशिक्षण व सरकारने निर्माण केलेल्या सुविधांमुळे देशातील विविध राज्यात खाजगी उद्योगधंदे उभे राहिले. त्यांना सरकारने चालना दिली. लघु उद्योग, मध्यम उद्योग यांना सरकारने अनुदाने दिली. दुर्बल आर्थिक क्षमता किंवा बौद्धिक क्षमतेअभावी १० वी, १२ वी नंतर आय.टी.आय. संस्थेमध्ये प्रशिक्षित होऊन एखाद्या ट्रेडमध्ये दोन वर्षात प्रावीण्य मिळू लागले, असे तरुण कारखान्यात काम करु लागले. अन्यथा त्यांनी स्वयंरोजगाराचा पर्याय निवडला. त्यात त्यांची आर्थिक उन्नतीही झाली.

शेतकऱ्यांच्या मालकीच्या असलेल्या परंतु दुष्काळी, पडीक, कोरडवाहू जमिनी ह्या त्यांना चांगल्या नोकरीचे आश्वासन देऊन त्यावर एमआयडीसीने आरक्षण करुन त्या कमी भावात ताब्यात घेतल्या. नंतर त्या प्रचंड भावात उद्योजकांना विकल्या. यात शेतकऱ्यांचा मोठा प्रमाणात तोटा झाला त्याच भागात उद्योग उभारणी झाल्यामुळे मजुरांना त्यात सुलभ वेतन मिळू लागले त्यामुळे त्यांनी शेतीकडे पाठ फिरवली.

पारंपरिक धान्य, गळीत पिके, कडधान्ये या खालील क्षेत्र, एकरी व एकूण उत्पादन हे उतरणीला लागले. मागणीपेक्षा पुरवठा कमी झाल्याने सर्वच जीवनावश्यक वस्तुंची दरवाढ झाली. शेती उत्पादनाचा खर्च वाढला. मजुरांच्या प्रश्नामुळे आणि निविष्ठांचा दर वाढल्याने शेती न परवडता आतबट्ट्याची झाली. यामुळे सुखवस्तू, आळशी शेतकऱ्यांनी ऊसासारखा राजकीय पिकाचा पर्याय शोधला. सुरुवातीला त्यात नफा मिळाला परंतु अती पाणी आणि रासायनीक

खतांमुळे जमिनी खराब झाल्या व ऊसाचे उत्पादन घटले.

याचा दुसऱ्या बाजूने असा परिणाम झाला की, शेतात काम करणारे मजूर आता साखर कारखान्यात काम करु लागले. त्यामुळे शेतमजुरांच्या टंचाईत अधिकच भर पडली.

शेतमजुरांच्या तुटवड्याचे आणखी एक कारण असे की, शेतीमध्ये बारा महीने रोजगार मिळत नाही. मजुरांना हंगामोत्तर काळात बेकार रहावे लागते. त्यामुळे ग्रामीण मजुरांनी शहराकडे धाव घेतली. शहरात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असल्याने बारा महिने रोजगार मिळू लागला. शेतीपेक्षा कारखाने किंवा इतर उत्पादन संस्था असल्याने बारा महीने रोजगार मिळू लागला. शेतीपेक्षा कारखाने किंवा इतर उत्पादन संस्था यात काम करणे त्यांना सोईचे वाटू लागले. त्यामुळे हंगामातही शेतात काम करण्यास लोक मिळेनासे झाले.

नियोजन काळात सरकारने देशातील दारिद्र्य आणि बेरोजगारी दूर करण्याच्या दृष्टीने अनेक कार्यक्रम हाती घेतले. उदा. ग्रामीण प्रकल्प कार्यक्रम, ग्रामीण रोजगारासाठी धडक योजना, ट्रायसेम, रोजगार हमी योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सरकारने रोजगार निर्मितीवर भर दिली. त्याअंतर्गत मृदसंधारण, रस्ते बांधणी व दुरुस्ती, पूल बांधणे, धरणे बांधणे, बंधारे बांधणे इत्यादी कामे हाती घेण्यात आली. यातून मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. ग्रामीण भागातील कष्टकरी लोक शेतमजुरी ऐवजी अशा योजनांमध्ये काम करणे अधिक पसंत करु लागले. त्यामुळे शेतमजुरांचा तुटवडा अधिक तीव्रतेने जाणवू लागला.

सरकारी प्रयत्नांमुळे आणि जनतेत निर्माण झालेल्या जागृतीमुळे शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. ग्रामीण भागातही लोक आपल्या मुला मुलींना शिकवत आहेत. ही अत्यंत स्तुत्य बाब असली तरीही याचा एक परिणाम असाही होतो की, शिक्षित तरुणांमध्ये शेतात काम करण्याची इच्छा राहिलेली नाही. शेतात कष्टाचे काम करणे त्यांना अप्रतिष्ठेचे वाटते. घेतलेल्या शिक्षणावर शहरात नोकरी मिळली नाही, तरीही चालेल परंतु शेतात काम करायचे नाही अशी मानसिकता तरुणांची बनत चालली आहे. त्यामुळेही शेतात मजुरांचा तुटवडा भासत आहे.

**परिणाम:**

शेतीची परिस्थिती पाहता दरडोई प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्र कमी असतांना वाटे हिस्से यामुळे अधिकच कमी झाली. त्यामुळे यांत्रिकी-करणाचा फायदा शेतकऱ्यांना घेता येत नाही. दुष्काळामुळे पशुधनही निसर्गाने शेतकऱ्यांपासून हिरावून घेतले. अशा विविध संकटांच्या विळख्यात शेती सापडली असतांना उपलब्ध पाच टक्के ग्रामीण भागातील मजूर हा हुकमी झाला, उद्दाम झाला.

शेतमजुराला कामाची गरज नाही. शेतकऱ्याला मजुराने कामावर यावे म्हणून त्याच्या मिनतवाऱ्या कराव्या लागतात. पाऊस नसतांना मजुरांना इतरत्र काम मिळते पण शेतकऱ्यांना आकाशाकडे डोळे लावून बसावे लागते. जेव्हा सतत पाऊस पडतो तेव्हा कोळपणी, खुरपणी, निंदणी करता येत नाही नंतर सर्वांचीच कामे एकाच वेळी येतात व मजुरांची गरज भासते. अशा परिस्थितीत मजूर दीडपट-दुप्पट मजुरी मागतो. फळबागांची छाटणी, फवारणी किंवा डोळ भरणे

अशी कामे एका वेळी येतात तेव्हा कुशल कामगार कमी असल्याने आणि ही कामे एकाच वेळी येत असल्यामुळे कुशल कामगारांचे दर पारंपरीक कामगारापेक्षा दोन ते तीन पट वाढतात. उत्पादन चांगले आले तर भाव कोसळतात. भाव असतात तेव्हा उत्पादन कमी येते. एकंदरीत नफा कमीच राहतो. दिवाळीपर्यंत करावी लागणारी हंगामातील कापसाची वेचणी एकदम येते आणि मजुरीचे दर आणखी वाढतात. अशा रीतीने सर्व बाजूने संकटांनी ग्रासलेला शेतकरी मजुरांकडूनही नाडला जात आहे.

**निष्कर्ष:**

शेतकऱ्यांनी शेतात जास्तीत जास्त कामांसाठी यांत्रिकीकरणाचा मार्ग अवलंबावा जेणेकरुन मजुरांवर जास्त अवलंबून रहावे लागणार नाही. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड अशा काही प्रगत राष्ट्रांमध्ये कामाच्या तासावर पैसे दिले जातात. जसे ६ ते ८ डॉलर प्रती तास मिळतात. तसे पाहता भारतीय शेतकऱ्यांनी जितके तास मजूर काम करेल त्या हिशोबाने जर मजुरी दिली तर मजूर प्रामाणिकपणे काम करेल म्हणून शेतकरी समाजाने हा प्रयोग अवलंबणे ही काळाची गरज झाली आहे. यासाठी कायदा होण्याची गरज नाही आणि तशी वाटही पाहू नये. जर ही व्यवस्था काटेकोरपणे शेतकरी व शेतमजुराने अवलंबली तर मजुरांना कामाचे वळण व योग्य मोबदला मिळेल. शेतकऱ्यांना काम वेळेत झाल्याने उत्पादन खर्चात बचत होऊन कामाचा दर्जा व होणाऱ्या उत्पन्नात ही वाढ होईल. अशा प्रकारे शेतमजुरांच्या तुटवड्याचा प्रश्न सुटेल अशी आशा वाटते.

**संदर्भसूची:**


1) R. Datt & KPM Sundharom, *Indian Economy*, 59th Edition, 2009, S.Chand Publication.
2) S. Subha Reddy, *Agricultural Eco.*, Ist Edition 2005, Oxford-IBH Publishing Co. Pvt. Ltd.
३) डॉ. कविमंडन विजय, *कृषी अर्थशास्त्र*, द्वितीय आवृत्ती, २००२, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
४) वाणी नीता, *कृषी अर्थशास्त्र*, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०१२
५) दैनिक लोकसत्ता न्यूज पेपर.

अर्थसंवाद

# अर्थव्यवस्थेतील उर्जा स्त्रोत: उत्पादन व उपभोग

**रमेश मुंजाजी भालेराव, परभणी,**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख,
शारदा महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९४२१३८८४४३
ई-मेल: dr.rbhalerao@gmail.com

**प्रस्तावना:**

अर्थिक विकासात उर्जा ही महत्वाची निविष्टि आहे. स्वयंपाकघरापासून ते मोठमोठया उद्योगातील यंत्रापर्यंत सर्वांना उर्जेची मोठया प्रमाणात आवश्यकता असते. उर्जेच्या उपभोगाचा विचार करता जगात सर्वाधिक उर्जेचा उपभोक्ता देश चीन हा आहे. दुसऱ्या क्रमांकावर अमेरिका नंतर रशिया व भारत हा चौथ्या क्रमांकाचा उर्जा उपभोक्ता देश आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत उर्जा स्त्रोतांची भूमिका महत्वपूर्ण आहे. भारतात विजेच्या उत्पादनापेक्षा विजेची मागणी जास्त आहे त्यामुळे आज देशासमोर वीजसंकट आ वासून उभे आहे. ग्रामीण भागाची पूर्ण अर्थव्यवस्थाच कृषीवर अवलंबून आहे. कृषीच्या आधुनिकीकरणासाठी विजेची आवश्यकता असते परंतु तेथे १२ ते १८ तास भारनियमनाला तोंड द्यावे लागत आहे याचा परिणाम कृषी व्यवसाय, पायाभुत सुविधा, पाणी पुरवठा व राहणीमान यावर पडत आहे.

खनिज तेलाचे साठे आपल्याकडे कमी असल्यामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात खनिज तेल आयात करावे लागते. दिवसेंदिवस खनिज तेलाचा वापर वाढत आहे व खनिज तेलाच्या आयातीसाठी तिजोरीतून मोठ्या प्रमाणात परकिय चलन मोजावे लागत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात होणाऱ्या तेलाच्या किंमतीतील चढउताराचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. आपल्याकडे तेलाचा साठा करण्यासाठी पुरेशा सुविधा नाहीत अन्यथा आंतरराष्ट्रीय बाजारातील कमी झालेल्या तेलाच्या किंमतीचा आपल्याला जास्तीत जास्त लाभ घेता आला असता किमान सहा महिने पुरेल एवढा तरी तेलाचा साठा आपल्याला करता आला पाहिजे.

कोळशाचे साठे उपलब्ध असूनही योग्य नियोजनाअभावी त्याचा पर्याप्त वापर केला जात नाही. पावसाळ्यात ओल्या कोळश्यामुळे पर्याप्त वीज निर्मिती होऊ शकत नाही अशी तक्रार औष्णिक विद्युत केंद्राकडून केली जाते. त्याचप्रमाणे कोळसा खाणीच्या वाटपामध्येही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याच्या तक्रारी होतात. यापुढे अणुउर्जा ही महत्वाची भूमिका बजावेल. अणू उर्जेसाठी आवश्यक असणारे यूरेनिअम व थेरिअमचे साठे आपल्याकडे उपलब्ध आहेत व आपण युरेनिअम समृध्द देशांशी करार ही केले आहेत.

अभ्यासाची उद्दिष्टे व मर्यादाः

सदर अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. भारताची उर्जा निर्मितीची क्षमता अभ्यासणे.

२. भारतातील क्षेत्रनिहाय उर्जा वापर अभ्यासणे.

सदर अभ्यास संपूर्ण भारत हे भौगोलिक क्षेत्र समोर ठेवून करण्यात आला आहे. उर्जेची निर्मिती क्षमता पाहण्यासाठी २०१३ पर्यंतच्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे. तर उर्जेचा क्षेत्रनिहाय वापर अभ्यासण्यासाठी २०११-२०१२ मधील उपलब्ध माहितीचा आधार घेतला आहे. अपारंपरिक उर्जा स्त्रोतांची सौर उर्जा, पवनउर्जा, इत्यादीची माहिती स्वतंत्र न घेता एकत्रितपणे घेतली आहे.

सदर अभ्यासासाठी द्वितीय सामग्रीचा वापर केला आहे त्यात विविध प्रकाशनाचे संदर्भ ग्रंथ, शासनाचे अहवाल, संबंधित विषयावर प्रकाशित झालेले लेख यांचा समावेश आहे. विश्लेषणासाठी सांख्यिकीय साधनांचा वापर केला आहे.

उर्जा स्त्रोतः

बाराव्या पंचवार्षिक योजनेनुसार उर्जेचे उत्पादन हे २०१६-२०१७ पर्यंत ६६९.६ मि.टन पर्यंत जाईल तर सन २०२१-२०२२ पर्यंत ते ८४४ मि.टन इतके होईल जे की, अपेक्षित उर्जा उपभोगाच्या अनुक्रमे ७१% आणि ६९% एवढे राहिल. देशांतर्गत उर्जेचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवत नेले तरी आयातीचे प्रमाण देखील वाढतच जाणार आहे. विशेषतः कच्च्या खनिज तेलाच्या बाबतीत बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी आयात मागणीच्या ७८% पर्यंत जाईल. कोळशाच्या आयातीवरील अवलंबित्व हे २०११-२०१२ मध्ये १८.८% एवढे होते ते बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी २२.४ % एवढे होईल.

देशाची उर्जा निर्मिती ही देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीवर व त्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर प्रक्रिया करणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानावर अवलंबुन असते. भारतात अपुनर्नविकरणीय (नॉन रिन्युएबल) साठे उदा. कोळसा, लिग्नाईट, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू तर पुनर्नविकरणीय (रिन्युएबल) उर्जा स्त्रोत उदा. जल, वायू, सौर, बायोमास हे दोन्हीही उर्जा स्त्रोत उपलब्ध आहेत. भारतात ३१ मार्च २०१२ अखेर कोळशाचे २९४ बिलियन टन एवढे साठे उपलब्ध आहेत तर लिग्नाईटचे ४२ बिलियन टन एवढे साठे उपलब्ध आहेत कच्चे तेल ७६० मिलीयन टन उपलब्ध असून नैसर्गिक वायुचे १३३० बिलियन क्युबिक मिटर एवढे साठे उपलब्ध आहेत मार्च २०१२ अखेर पुनर्नवीकरणीय वीज निर्मितीची क्षमता ८९७७४ मेगावॅट एवढी होती.

उर्जा उत्पादन:

सन १९७०-१९७१ ते सन २०११-२०१२ या शेवटच्या चार दशकात पारंपरिक उर्जा स्त्रोतांचा त्यात कोळसा, लिग्नाईट, खनिज तेल, नैसर्गिक वायू आणि वीज निर्मिती यांचा वार्षिक चक्रवाढ वृध्दी दर हा अनुक्रमे ४.९%, ६.२%, ४.२%, ८.७% आणि ४.३% होता. त्याच काळात कोळसा, लिग्नाईट, खनिज तेल, नैसर्गिक वायू आणि वीज निर्मिती यांच्या वापराचा वार्षिक चक्रवाढ वृध्दी दर हा अनुक्रमे ४.९%, ६.२%, ६.०%, १०.७% आणि ७.१% एवढा होता. याच काळात दरडोई उर्जा उपभोगात ४.१% एवढ्या वार्षिक चक्रवाढ वृध्दी दराने वाढ झाली आहे.

भारतात उर्जेची गरज ही वरीलप्रमाणे विविध स्त्रोतांमार्फत भागविली जाते. आज उर्जेची गरज ही प्रामुख्याने विजेच्या रुपात असते. भारतातील एकूण वीज उत्पादनाच्या १८.६% वीज ही घरगुती वापरासाठी लागते, २४% वीज ही उद्योगासाठी लागते तर कृषि सिंचनासाठी १७.४% विजेचा वापर होतो. आज भारतात १००० बिलियन युनिट विजेचे उत्पादन होते व मागणी ९६० बि. युनिट एवढी आहे तरी विजेची प्रचंड तूट आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे विजेची गळती हे आहे. भारतात वितरण व पारेषण पध्दतीत त्रूटी असल्यामुळे जवळपास २२.६% एवढी वीज वाया जाते. विजेची गळती थांबविणे हे एक भारतापुढे मोठे आव्हान आहे.

एकूण वीज उत्पादनाच्या ६७% उत्पादन हे कोळशाच्या पूरवठ्यांवर अवलंबून असते आणि कोळश्याच्या पुरवठ्याच्या बाबतीत औष्णिक विद्युत केंद्राकडून नेहमीच ओरड असते. औष्णिक विद्युत केंद्राला पावसाळ्यात ओल्या कोळशाचा पुरवठा होत असल्यामूळे पूर्ण क्षमतेने सर्व संच चालवू शकत नाहीत तर उन्हाळयात पाण्याच्या टंचाईमुळे सर्व संच चालू शकत नाहीत. जलविद्यूत प्रकल्पावर १६% वीज उत्पादन अवलंबून आहे तर १४% वीज ही अणूउर्जेतून निर्माण होते. केवळ ३% वीज ही अपारंपरिक किंवा अक्षय उर्जा स्त्रोतांकडून म्हणजे. सूर्य, वारा, इत्यादी कधीही न संपणाऱ्या स्त्रोतांतून होत असते.

इ.स.२०३० पर्यंत ३५०० बिलयन युनिट वीज लागण्याचा अंदाज आहे त्यापैकी सौर उर्जा व पवन उर्जा यांचा हिस्सा ६०० बिलियन युनिट म्हणजे १६% असेल असा अंदाज आहे भविष्यात एवढी विजेची गरज भागविण्यासाठी सौर, उर्जा, पवन उर्जा व अणुउर्जा यांचा एकूण वीज निर्मितीत वाटा वाढणे आवश्यक आहे.

**वीज निर्मितीची स्थापित क्षमता:**

भारतासमोर पुरेशा वीज निर्मितीचे मोठे आव्हान आहे. भारतात सर्वात जास्त वीज निर्मिती ही कोळशापासून केली जाते. तर सर्वात कमी वीज निर्मिती ही अणूउर्जेपासून केली जाते.

भारताची जानेवारी २०१३ अखेर २,११,७६६.२२ मेगावॅट एवढी स्थापित वीज निर्मितीक्षमता होती त्यापैकी सर्वात मोठा हिस्सा हा कोळशाचा आहे. कोळशापासून वीज निर्मितीची स्थापित क्षमता १२१६१०.८८ मेगावॅट एवढी आहे जी की एकूण स्थापित वीज निर्मिती क्षमतेच्या ५७.४% एवढी आहे तर नैसर्गिक वायूपासूनची १८९०३.०५ मेगावॅट म्हणजे ८.९% एवढी क्षमता आहे. डिझेलपासून केवळ ११९९.७५ मेगावॅट (०.६%) एवढी वीज निर्मिती होते. वीज निर्मितीसाठी खनिज तेलाचा मोठया प्रमाणात वापर केला जातो.

## जानेवारी २०१३ अखेर भारताची स्थापीत वीज निर्मिती क्षमता (मेगावॅट मध्ये)

*(कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात)*

| स्त्रोत | राज्य | खाजगी | केंद्र | एकुण |
|---|---|---|---|---|
| कोळसा | ४९५६०.५ | २९९९५.३८ | ४२०५५ | १२१६१०.८८ (५७.४) |
| नैसर्गिक वायू | ५२१५.३२ | ६९८५.५ | ६७०२.२३ | १८९०३.०५(८.९) |
| डिझेल | ६०२.६१ | ५९७.१४ | ० | ११९९.७५(०.६) |
| एकुणथर्मल(औष्णिक) | ५५३७८.४३ | ३७५७८.०२ | ४८७५७.२३ | १४१७१३.६८(६६.९) |
| अणूऊर्जा | ० | ० | ४७८० | ४७८० (२.३) |
| जल विद्युत | २७३९५ | २५९५ | ९४२६.४ | ३९४१६.४(१८.६) |
| पुनर्नविकरणीय स्त्रोत | ३५६९.९२ | २२,२८६.२२ | ० | २५८५६.१४ (१२.२) |
| एकुण | ८६३४३.३५ | ६२४५९.२४ | ६२९६३.६३ | २११७६६.२२ |

*स्त्रोत :- लोड जनरेशन बॅलन्स रिपोर्ट २०१२-२०१३ केंद्रीय विद्युत प्रधिकरण, भारत सरकार.*

खनिज तेलाचा मोठा हिस्सा आपण आयात करतो. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत खनिज तेल हा संवेदनशील विषय आहे. एकूण वीज निर्मितीत कोळसा, नैसर्गिक वायू व डिझेल या सर्वांचा मिळून एकूण औष्णिक विद्युत क्षेत्राचा वाटा हा जवळपास ६७% एवढा आहे.

वीज निर्मितीत औष्णिक विद्युतच्या खालोखाल जलविद्युतचा क्रमांक लागतो. एकूण वीज निर्मितीच्या १८.६% (३९४१६.४ मेगावॅट) हिस्सा हा जलविद्युतचा आहे. जलविद्युत हा विषय केंद्र राज्य व खासगी क्षेत्र अशा तिन्ही क्षेत्राच्या अखत्यारीत येतो. एकूण जल विद्युतच्या जवळपास ७०% (२७३९५ मेगावॅट) वीज ही राज्यांकडून निर्माण केली जाते तर केंद्राकडून (९४२६.४ मेगावॅट) जलविद्युत निर्माण केली जाते जलविद्युत मध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा हा (२५९५ मेगावॅट) एवढा आहे.

वारा, सौरउर्जा या पुनर्नविकरणीय उर्जा स्त्रोतांपासून २५८५६.१४ मेगावॅट एवढी वीज निर्माण केली जाते जी एकूण वीज निर्मितीच्या १२.२% एवढी आहे. पुनर्नविकरणीय उर्जा ही राज्यांमार्फत व खासगी क्षेत्रामार्फत तयार केली जाते यात राज्यांकडून केवळ १४% पुनर्नविकरणीय उर्जा निर्माण केली जाते तर खासगी क्षेत्राकडून ८६% वीज निर्माण केली जाते. भारतासारख्या देशात जेथे की सौर उर्जेचा मोठा स्त्रोत उपलब्ध आहे सौर उर्जेमार्फत वीज निर्माण करण्यास मोठा वाव आहे. शासन कृषीसाठी अखंड वीज उपलब्ध व्हावी या हेतूसाठी सौर उर्जेवर भर देत आहे. शेतकऱ्यांना माफक दरात सौरपंप देऊन या क्षेत्राचा वाटा वाढविण्याचा शासनाचा विचार स्तुत्य म्हणावयास हवा.

अणुउर्जा ही युरेनिअम व थेरिअम पासून निर्माण केली जाते. अणुउर्जेवर भारतात बरेच वाद

झाले परंतु आज वाढलेली विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी अणुउर्जेशिवाय पर्याय नाही अणुउर्जेपासूनची स्थापित वीज निर्मितीक्षमता ही ४७८० मेगावॅट एवढी आहे जी एकूण वीज निर्मिती क्षमतेच्या केवळ २.३% आहे. अणुउर्जा प्रकल्प हे केवळ केंद्रामार्फत चालविले जातात, यात खासगी क्षेत्राचा व राज्यांचा हिस्सा नाही.

उर्जा हा विषय केंद्र व राज्य दोघांच्याही अखत्यारीत येतो त्याचबरोबर खासगी क्षेत्रातही वीज निर्मिती केली जाते. एकूण २११७६६.२२ मेगावॅट विजेपैकी राज्यांकडून ८६३४३.३५ मेगावॅट एवढी वीज निर्माण केली जाते याचा एकूण वीज निर्मितीतील हिस्सा ४०.८% आहे. सर्वात जास्त वीज राज्यांकडून निर्माण केली जाते. केंद्राकडून ६२९६३.६३ मेगावॅट एवढी वीज निर्माण केली जाते जिचा एकूण वीज निर्मितीत वाटा २९.७% एवढा आहे तर खासगी क्षेत्राकडून ६२४५९.२४ मेगावॅट एवढी वीज निर्माण केली जाते तिचा एकूण वीज निर्मितीतील हिस्सा २९.५% आहे.

सन २०११-१२ मध्ये एकूण वीजेचा वापर ७७२६०३ गीगावॅट तास एवढा होता. क्षेत्र निहाय विजेचा वापर पाहता असे लक्षात येते की, सर्वात जास्त विजेचा वापर हा उद्योगासाठी केला जातो. एकूण वीज वापराच्या जवळपास ४५% विजेचा वापर हा उद्योगासाठी केला जातो. कृषी क्षेत्रात विजेचा वापर हा १७.००% एवढा आहे तर घरगुती विजेचा वापर २२% आहे. व्यावसायीक कारणासाठी ९% वापर होतो, रेल्वेसाठी २% तर इतर कारणासाठी ५% विजेचा वापर केला जातो.

सन १९७०-७१ पासून ते २०११-१२ पर्यंतचा विचार केला तर वार्षिक चक्रवाढ वृध्दीदर घरगुती विजेच्या वापराबाबत सर्वात जास्त दिसून येतो. जो की, ९.४४% एवढा आहे याचे प्रमुख कारण म्हणजे १९७०-७१ मध्ये भारतातील बहुतांश गावांपर्यंत प्रत्येक पाच वर्षात घरगुती विजेचा वापर हा दुपटीने वाढलेला दिसतो, त्यानंतर मात्र वृध्दी दरात घट झालेली आढळून येते सन १९९०-९१ ते २००५-२००६ या कालावधीत दर पाच वर्षांनी घरगुती वीज वापर हा दिडपट वाढलेला आहे. त्यानंतर २००६-२००७ ते २०१०-२०११ पर्यंत मात्र वृध्दीदर प्रतिवर्ष केवळ १०% वाढलेला आहे. सन २०११ पर्यंत भारतात विविध योजना राबवून शासनाने प्रत्येक गावात वीज उपलब्ध करुन दिली. आज घराघरात वीज पोहचलेली आहे त्यामुळे आज यापुढे घरगुती विजेच्या वापरात फार मोठी वाढ होणार नाही सन २०१०-११ ते २०११-१२ या कालावधीत वृध्दी दर केवळ ०.४२% एवढा अल्प आहे.

कृषी क्षेत्रातील वीजवापराचा वार्षिक चक्रवाढ वृध्दी दर १९७०-७१ ते २०११-१२ पर्यंत ८.४३% होता हा वृध्दीदर जास्त आहे त्यानंतर मात्र तो कमी झालेला दिसतो. सन २०१०-११ ते २०११-१२ दरम्यान कृषि क्षेत्रातील वीज वापराचा वृध्दी दर हा १.२८% एवढाच आहे. कृषि क्षेत्रातील वीज वापराच्या वृध्दी दरातील घट ही चिंतेची बाब आहे. कारण सिंचनासाठी वीजेची आवश्यकता असते. वीज वापरात घट म्हणजे सिंचनावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

उद्योग क्षेत्राच्या बाबतीत मात्र कृषीच्या नेमकी उलट परिस्थिती पहावयास मिळते. उद्योगक्षेत्राचा वीज वापराचा सन १९७०-७१ ते २०११-१२ चा वार्षिक चक्रवाढ वृध्दी दर केवळ ६.३% होता परंतु सन २०१०-११ ते २०११-१२ दरम्यान २०१० - ११ ते २०११ -१२ या

भारतातील विजेचा क्षेत्रनिहाय उपभोग: (गीगावॅट तास मध्ये)

| वर्ष | उद्योग | कृषी | घरगुती | व्यावसायिक | रेल्वे | इतर | एकुण वीज उपभोग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७०-७१ | २९,५७९ | ४,४७० | ३,८४० | २,५७३ | १,३६४ | १,८९८ | ४३,७२४ |
| १९७५-७६ | ३७,५६८ | ८,७२१ | ५,८२१ | ३,५०७ | १,८८५ | २,७७४ | ६०,२४६ |
| १९८०-८१ | ४८,०६९ | १४,४८९ | ९,२४६ | ४,६८२ | २,२२६ | ३,६१५ | ८२,३६७ |
| १९८५-८६ | ६६,९८० | २३,४२२ | १७,२५८ | ७,२९० | ३,१८२ | ४,९६७ | १२३,०९९ |
| १९९०-९१ | ८४,२०९ | ५०,३२१ | ३१,९८२ | ११,१८१ | ४,११२ | ८,५५२ | १९०,३५७ |
| १९९५-९६ | १०४,६९३ | ८५,७३२ | ५१,७३३ | १६,९९६ | ६,२२३ | ११,६५२ | २७७,०२९ |
| २०००-०१ | १०७,६२२ | ८४,७२९ | ७५,६२९ | २२,५४५ | ८,२१३ | १७,८६२ | ३१६,६०० |
| २००५-०६ | १५१,५५७ | ९०,२९२ | १००,०९० | ३५,९६५ | ९,९४४ | २४,०३९ | ४११,८८७ |
| २००६-०७ | १७१,२९३ | ९९,०२३ | १११,००२ | ४०,२२० | १०,८०० | २३,४११ | ४५५,७४९ |
| २००७-०८ | १८९,४२४ | १०४,१८२ | १२०,९१८ | ४६,६८५ | ११,१०८ | २९,६६० | ५०१,९७७ |
| २००८-०९ | २०९,४७४ | १०९,६१० | १३१,७२० | ५४,१८९ | ११,४२५ | ३७,५७७ | ५५३,९९५ |
| २००९-१० | २३६,७५२ | १२०,२०९ | १४६,०८० | ६०,६०० | १२,४०८ | ३६,५९५ | ६१२,६४५ |
| २०१०-११ | २७२,५८९ | १३१,९६७ | १६९,३२६ | ६७,२८९ | १४,००३ | ३९,२१८ | ६९४,३९२ |
| २०११-१२ | ३४६,४६९ | १३३,६६० | १७०,०३४ | ६९,२६६ | १४,३२७ | ३८,८४७ | ७७२,६०३ |
| वितरण | ४४.८४ | १७.३० | १२.०१ | ८.९७ | १.८५ | ५.०३ | १००.०० |
| वृध्दी दर (२०११-१२ चा २०१०-११ साठी %) | २७.१० | १.२८ | ०.४२ | २.९४ | २.३१ | -०.९५ | ११.२६ |
| वार्षिक चक्रवाढ वृध्दी दर १९७०-७१ ते २०११-१२(%) | ६.०३ | ८.४३ | ९.४४ | ८.१६ | ५.७६ | ७.४५ | ७.०८ |

*स्त्रोत :- सेंट्रल इलेक्ट्रीसीटी ॲथॉरिटी.*

दरम्यान उद्योग क्षेत्रातील वीज वापराचा वार्षिक वृध्दी दर हा तब्बल २७.१०% एवढा होता. सन १९७०-७१ ते २०००-०१ पर्यंत २९,५७९ गिगावॅट तास वरुन १०७,६२२ गिगावॅट तास एवढा वीज वापर उद्योगक्षेत्रात वाढला आहे जो की १९७०-७१ च्या तुलनेत २७.४८% एवढी वाढ आहे तर सन२०००-०१ ते २०११-१२ या ११ वर्षात वीज वापर १०७६२२ गिगावॅट तास वरुन ३४६,४६९ गिगावॅट तास एवढा वाढला ही वाढ ३१.०६% एवढी आहे म्हणजे सुरुवातीच्या ३० वर्षात उद्योगक्षेत्रातील वीज वापर जेवढा वाढला त्यापेक्षाही जास्त ११ वर्षात वाढला आहे ही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी चांगली बाब आहे उद्योगक्षेत्रातील वीज वापराच्या वाढीबरोबर कृषि क्षेत्रासाठी वीज वापर वाढणे गरजेचे आहे.

व्यावसायिक कारणासाठी विजेचा वापर हा एकूण वीज वापराच्या ८.९७% एवढा केला जातो. सन १९७०-७१ ते २०११-१२ या कालावधीत व्यावसायीक कारणासाठीचा विजेच्या वापराचा वार्षिक चक्रवाढ दर ८.१६% आहे २०११-१२ चा वृध्दीदर तर केवळ ३% राहिलेला आहे. रेल्वेसाठी विजेचा वापर २% होतो तर इतर कारणांसाठी ५% विजेचा वापर होतो.

**निष्कर्ष:**

१. कोळसा हा सर्वात महत्वाचा उर्जा स्त्रोत आहे. परंतु कोळसा खाणीतून काढण्यापासून ते औष्णिक विद्युत केंद्रातून वीज निर्मिती करेपर्यंत त्यातून मोठ्या प्रमाणात प्रदुषण होते. त्याचप्रमाणे भिजलेल्या कोळशामुळे पर्याप्त वीज निर्मिती होऊशकत नाही.

२. पारंपरिक उर्जा स्त्रोताकडून अपारंपरिक उर्जा स्त्रोताकडे लोकांचा कल वाढत आहे परंतु त्याचा वेग फारच कमी आहे.

३.वाहतुकीसाठी पूर्वी कोळसा, डिझेल, पेट्रोल, याचा वापर केला जात असे आज कोळशाचा वापर कमी होत असून विजेचा वापर वाढत आहे.

४. भारताला खनिज तेल व कोळसा आयात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च करावे लागते.

५. उद्योगक्षेत्राची उर्जेची गरज दिवसेंदिवस वाढत आहे व ते अर्थव्यवस्थेसाठी चालना देणारे आहे.

६. एकूण वीज निर्मितीत अणुउर्जेचा वाटा फारच कमी आहे तो अवघा २.३% एवढा आहे.

७. विजेची मागणी व पुरवठ्यात मोठी तफावत आहे तफावतीचे मुख्य कारण विजेची गळती हे आहे २२.% विजेची भारतात गळती होते.

८. शासकीय व खासगी कंपन्याचे वीज दर जवळपास सारखे असूनही शासकीय कंपन्या तोट्यात तर टाटा, रिलायन्स सारख्या कंपन्या याच क्षेत्रात नफा कमावत आहेत.

**शिफारशी:**

उपरोक्त अभ्यासावरुन काही शिफारशी करण्यात येत आहेत त्या खालील प्रमाणे-

१. भारतात वीज गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. निर्मितीपासून प्रत्यक्ष वापरापर्यंत २२% विजेची गळती होते ही गळती थांबविण्यासाठी तांत्रिक सुधारणा घडवुन आणाव्या लागतील.

२. कोळशाचा पर्याप्त वापर करावा लागेल कोळसा पावसाळ्यात भिजू नये याची दक्षता घ्यावी लागेल खाणीपासून औष्णिक विद्युत केंद्रापर्यंत स्वच्छ व सुरक्षित कोळसा पोहचला पाहिजे.

३. औष्णिक विद्युत केंद्रातील संचाची वेळोवेळी दुरुस्ती करावी व मुदतीनंतर ते बदलावेत.

४. खनिज तेलाच्या आयातीसाठी वापरले जाणारे बाजारात जेव्हा तेलाचे भाव कमी असतात तेव्हा

त्याचा लाभ घ्यावा लागेल त्यासाठी खनिज तेलाच्या साठवण क्षमतेत मोठी वाढ करावी लागेल.

५.नुकताच हजारो कोटीचा कोळसा खाण घोटाळा गाजला हा भ्रष्टाचार थांबविणे गरजेचे आहे.

६.स्वच्छ उर्जेसाठी अपारंपरिक उर्जा स्त्रोतांवर कक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे त्यासाठी सौर उर्जेचे छोट्या संचाचा वैयक्तिक वापर होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे लागेल.

७. प्रशासनात मोठ्या सुधारणा कराव्या लागतील.

८. लोकांना सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे लागेल जेणे करुन खनिज तेलाचा पर्याप्त वापर करता येईल तसेच रस्ते बांधणीवरील खर्च वाढवुन चांगले रस्ते निर्माण केले तर इंधनाची मोठी बचत होईल.

**संदर्भसूची:**


1) *Economic survey* (2012-13), Govt. of India.
2) *Energy Statistics* 2013.
3) Dutt Gaurav Mahajan A., *Dutt & Sundharum Indian Economy* 67th edition.
4) घैसास दीपक, *भविष्यासाठी ऊर्जा*, दै.लोकसत्ता दि.२३ जाने.२०१५
5) http://en.wikipedia.org/wiki/Energy-policy of India.
6) *Load Generation Balance Report* (2012-2013) Central Electricity Authority, Govt. of India.
7) Shrivastava S.P, *Solar energy and it's future role in Indian Economy* Vol.4, No.3 (2013) International Journal of Environmental science : Development & montitoring.



हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

# अर्थसंवाद

## ग्रंथ - परीक्षण

## सूक्ष्मवित्ताचा सुबोध परिचय

**मंजूषा मुसमाडे, पुणे,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय
भ्रमणध्वनी: ९८८१३४०७२

*लेखिका : वसुधा जोशी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१६ (पृष्ठे ९०)*

प्रस्तुत ग्रंथाची प्रस्तावना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे वाणिज्य विभाग प्रमुख संजय कप्तान यांची असून पुस्तकात सहा प्रकरणे व परिशिष्टे आहेत. या छोटेखानी पुस्तकात लेखिकेने सूक्ष्मवित्त चळवळीची वैचारिक आणि वस्तुनिष्ठ चिकित्सा केली आहे. गेल्या ४० वर्षांतील पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास, स्त्रीसक्षमीकरण यांच्या जागतिक स्तरावरील लाटांप्रमाणेच सूक्ष्मवित्ताची लाटही ओसरली आहे की मुख्य प्रवाहात सामावून गेली आहे, असा प्रश्न लेखिका प्रास्ताविकात विचारतात. सूक्ष्मवित्ताच्या नियमनासाठी रिझर्व्ह बँकेने २०१२ मध्ये धोरण जाहीर करण्यापूर्वीच सूक्ष्मवित्ताचा फुगा फुटला. गरिबी निर्मूलन आणि स्त्री सबलीकरण या दोन मूळ उद्दिष्टांपासून दूर जात या क्षेत्रात नफा मिळविण्याची प्रेरणा प्रबळ झाली आहे, असे लेखिकेचे निरीक्षण आहे. विशेष म्हणजे, रिझर्व्ह बँकेच्या दृष्टीने सूक्ष्मवित्त आणि खासगी सावकारी यांच्यात काही फरक नाही, असे वित्तीय समावेशनाच्या कार्यक्रमातून दिसून येत असल्याचे प्रतिपादनही त्यांनी केले आहे. याची कारणमीमांसा करताना लेखिका म्हणतात, वित्तीय समावेशनात एकेका व्यक्तिला लक्ष्य करुन नव्या तंत्रज्ञानाच्या साह्याने प्रत्येकाला वित्तसेवा उपलब्ध होण्याच्या मोठ्या कार्यक्रमात बँकामध्ये शून्य बचत खाती उघडणे, आधार कार्डाच्या साह्याने शासकीय मदत लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा करणे, मोबाईल बँकिंग, किसान क्रेडिट कार्ड, रुपे कार्ड, वित्त साक्षरता प्रसार अशा अनेक बाबींचा समावेश केल्याने सूक्ष्मवित्त चळवळीचा सामाजिक आशय संपल्यात जमा आहे. ग्रामीण बँकेचे प्रवर्तक प्रा. महमंद युनूस यांना २००६ सालचा शांतता नोबेल पुरस्कार मिळाला, तो या चळवळीचा सर्वोच्च बिंदू होता, तेथून पुढे या चळवळीची घसरण सुरु झाली, असेही परखड

मत लेखिका मांडतात.

प्रकरणवार विश्लेषण:

पुस्तकाचे पहिले प्रकरण सूक्ष्मवित्ताचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये आणि व्याप्ती यांचे तपशीलवार विवेचन करते. बचत - कर्ज - परतफेड - आणखी कर्ज, असे सुरळीतपणे चालणारे सूक्ष्मवित्ताचे चक्र स्पष्ट करुन लेखिकेने हे क्षेत्र अधिकृत बँकिंग आणि अनधिकृत सावकारी यातील दुवा असल्याचे नमूद केले आहे. मात्र, या वित्त व्यवस्थेचा एक प्रमुख दोष लेखिका सांगतात, तो म्हणजे बचतगटातील सदस्यांना आपल्या, आर्थिक व्यवहारांबाबत इतरांच्या सूचना लक्षात घ्याव्या लागतात व त्यांचा खासगीपणा हिरावून घेतला जातो.

याच कारणामुळे कदाचित सावकारीचे पूर्ण उच्चाटन शक्य नाही, तसेच बहुतांश सूक्ष्मवित्त संस्था स्त्रियांच्या असल्याने कर्ज परतफेडीत दिरंगाई झाली तर त्यांना पुरुषांप्रमाणे परागंदा होता येत नाही, शिवाय कर्जाची रक्कम बरेचदा पुरुषच वापरतात व स्त्रियांचा त्यावर हक्क नसतो आणि त्यांचे शोषण होण्याचीही शक्यता असते. अशा अनेक त्रुटी लेखिका परखडपणे मांडतात.

सूक्ष्मवित्त व्यवस्थेची तुलना करताना लेखिकेने म्हटले आहे की प्रा. युनूस यांना स्त्रियांच्या गटाद्वारे सामाजिक प्रबोधन करण्याची व्यापक दृष्टी अवलंबिली होती. मात्र इतर संस्थांनी फक्त पैशाच्या व्यवहारावर लक्ष केंद्रित केले आणि कालांतराने त्यांचे दारिद्र्यनिर्मुलनाचे उद्दिष्ट ही मागे पडले. सूक्ष्मवित्ताचे फायदे केवळ ज्या गरीब लोकांना धंद्याची पार्श्वभूमी असते, बाजारातील व्यवहारांची माहिती व अंगी काही हुन्नर असते अशांनाच होतात. म्हातारे लोक, विकलांग, अल्पवयीन मुले यांना त्याचा उपयोग होत नाही. म्हणून अनेक गरीबांसाठी स्वयंरोजगारापेक्षा वेतन देणारा टिकाऊ रोजगार जास्त महत्त्वाचा असतो. अगदी तळातील गरीब लोकांचा या योजनेशी काहीही संबंध नाही, हे लेखिकेने सविस्तर स्पष्ट केले आहे.

सूक्ष्मवित्त व्यवहारात भरपूर व्याज आकारले जाते आणि त्यावर कसलेही नियंत्रण नसल्याने प्रत्यक्षात गरिबांचे शोषणच होते, हा या चळवळीवर मुख्य आरोप केला जातो. याचे स्पष्टीकरण देताना लेखिका स्पष्ट करतात की सूक्ष्मवित्त संस्थांचा दैनंदिन खर्चही जास्त होतो. दूरदूर ठिकाणी गटसभा घेणे, हप्ते स्वीकारणे, हिशेब ठेवणे यावर मोठा व्यवस्थापकीय खर्च होत असतो. तसेच या संस्था जेव्हा यशस्वीरीत्या जास्त लोकांपर्यंत पोहचतात, तेव्हा त्यांचा खर्चही विभागला जातो.

दुसऱ्या प्रकरणात देशातील प्रमुख सूक्ष्मवित्त संस्थांची तपशीलवार माहिती दिल्यामुळे या क्षेत्राचे संपूर्ण चित्र लक्षात घेता येते. याचबरोबर, मालेगम समितीच्या (२०११) शिफारशींचाही सविस्तर उल्लेख आहे. तिसऱ्या प्रकरणात या चळवळीची उत्क्रांती स्पष्ट केलेली आहे. यात अनेक उदाहरणांमुळे सूक्ष्मवित्त व्यवहाराचे स्वरुप लक्षात येते. चौथ्या प्रकरणात सूक्ष्मवित्ताची सैद्धांतिक पार्श्वभूमी सांगितलेली आहे. या व्यवहारातील नैतिक धोके आणि स्वार्थ साधण्याच्या प्रवृत्तीचे स्पष्टीकरण लेखिकेने सोदाहरण केले आहे.

पाचव्या प्रकरणात सूक्ष्मवित्त व्यवहाराचे मूल्यमापन केलेले आहे. संख्यात्मक किंवा गुणात्मक पद्धतीने मूल्यमापन करताना येणाऱ्या

अडचणी टाळण्यासाठी हैद्राबादमधील संस्थेने वापरलेल्या पद्धतीची माहिती उद्बोधक आहे. याचबरोबर देशभरातील अनेक संशोधन संस्थांनी बचत गटांच्या कामगिरीवर केलेल्या अभ्यासाचे पद्धतशीर कोष्टक दिलेले आहे.

सहाव्या प्रकरणात या चळवळीची भविष्यातील दिशा स्पष्ट केली आहे. लेखिकेच्या मते बचत गटांची गुणवत्ता खालावते आहे. नव्या बँकरचनेत सूक्ष्मवित्त संस्थांचे स्थान स्थानिक बँकांच्या स्वरुपात निश्चित केले पाहिजे, अशी सूचनाही त्या करतात.

अखेरीस लेखिकेच्या मते सूक्ष्मवित्तामुळे फार कमी प्रमाणात दारिद्र्यनिर्मुलन होते. त्यामुळे दारिद्र्यनिर्मुलनाची जबाबदारी शासनव्यवस्थेचीच आहे. उत्पन्न व संपत्तीच्या पुनर्वाटपासाठी तसेच गरिबांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवून शासनाने ही जबाबदारी पार पाडली पाहिजे, अशी त्यांची सूचना आहे.

परिशिष्टांमध्ये बांगलादेशातील ग्रामीण बँकेची कार्यपद्धती व भारतातील एसकेएस, बंधन अशा विविध सूक्ष्मवित्तसंस्थाची माहिती दिलेली आहे. पुस्तकाची संदर्भसूची अनेक भारतीय व परदेशी संदर्भग्रंथांनी आणि विषयाशी संबंधित आंतरजालीय संकेतस्थळांनी समृद्ध आहे. एकूणच, सूक्ष्मवित्त या उद्बोधक विषयाचा अर्थशास्त्रीय मांडणीतील क्लिष्टता टाळून सोप्या पद्धतीने मागोवा घेतल्याचा लेखिकेचा दावा सत्यात उतरला आहे, हे निश्चित !

जिल्हा:...................................

विद्यापीठ क्षेत्र: ..........................

# मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ-४६१५ मुंबई.

## आजीव / साधारण सभासदत्वासाठीचा अर्ज

(कृपया अर्ज मराठीतून भरावा)

फोटो

१. संपूर्ण नाव : ..............................................................

२. महाविद्यालय/संस्थेचे नाव: ..........................................................

३. शैक्षणिक पात्रता : ..............................................................

..............................................................

४. पत्रव्यवहारासाठी पत्ता : ..............................................................

..............................................................

५. दूरध्वनी क्र.(कोड सह) :

महाविद्यालयाचा / संस्था:.................... निवास: ..................................

भ्रमणध्वनी क्र.: ............................ ई-मेल: ..................................

६. वर्गणी:

आजीव सभासद रु.३०००+ इमारत निधी रु.२०००+ सभासद सूची रु.१००= **रु.५१००/-**

(साधारण सभासद रु.३००/-)

अर्जदाराची स्वाक्षरी

श्री/श्रीमती........................................ यांचेकडून परिषदेची आजीव/साधारण सभासद वर्गणी रुपये:............ आज दि................. रोजी रोख/मनी ऑर्डर / डीडी ने मिळाली.

कार्यवाह - खजिनदार

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा
## पर्यटन विशेषांकासाठी त्वरित लेख पाठवा

*अर्थसंवाद: जानेवारी-मार्च २०१७* हा पर्यटन विशेषांक प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी लेख प्रमुख संपादकाकडे शहादा येथील पत्त्यावर दि.२८ फेब्रुवारी २०१७ पर्यंत पाठवावा. विशेषांकासाठी लेखांचे विषय-१)पर्यटनक्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम २)भारतीय पर्यटन:आर्थिक सद्यस्थिती ३)भारतीय पर्यटन: आर्थिक भवितव्य ४)पर्यटनक्षेत्राचा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम ५)पर्यटनक्षेत्र व जम्मू-काश्मिरचा आर्थिक विकास ६)पर्यटनक्षेत्र: भारतीय अर्थव्यवस्थेतील एक संधी ७)कृषी पर्यटन ८) स्वित्झर्लंड: पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्था ९)जागतिकीकरणाच्या काळात पर्यटनक्षेत्राचा विकास १०) आंतरराष्ट्रीय पर्यटन व आर्थिक उलाढाल ११) वाढते पर्यटनक्षेत्र व रोजगार संधी १२) विदेश पर्यटन; विदेशी अर्थव्यवस्था व माझे अनुभव १३)पर्यटन व विदेश चलन विनिमय १४) पर्यटनविकास व शासन १५) पर्यटनविकासासाठी सरकारचे धोरण १६) ई-पर्यटन.

फक्त एवढंच् करा....

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree- Dev7- 2336 या फॉन्टमध्ये Page Maker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्टसाईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी. पृष्ठसंख्या सामान्यपणे ५ ते ८ पृष्ठे असावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्डकॉपीज् व एक सॉफ्टकॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठवणे आवश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. शोधनिबंधात कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे: कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था,* प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद,<br>द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर,<br>गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया,<br>जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल<br>कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे,<br>शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी<br>स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६,<br>एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल<br>जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३<br>समोर, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

International Research Journal

**मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक**

# अर्थसंवाद


मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.६,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5 = 150 X 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !


डॉ. शिवाजी भोसले,
अध्यक्ष
१६५/२, प्लॉट नं.१९,
मंगलाई कॉलनी, शाहू नगर,
गोडोली, सातारा-४१५००१
भ्रमणध्वनी: ९४२१२११७४५

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगाव रोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,यशवंत क्लासेस मागे,
शहादा-४२५४०९, जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

# श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरूकुल)

ESTD - 1928

SNJB

नेमिनगर, चांदवड जि. नाशिक (महाराष्ट्र)

फोन : (०२५५६) २५२१२२, २५२१५०, फॅक्स : (०२५५६) २५३१७२


Website : www.snjb.org

Email : snjb1928@rediffmail.com



संस्थापक

कर्मवीर स्व.श्री.केशवलालजी हरकचंदजी आबड (पू.काकाजी)



## संस्था संचलित शैक्षणिक विभाग

* आदर्श बालविकास मंदीर (बालवाडी)
* प्राथमिक शाळा
* माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
* एच.एस.सी.व्होकेशनल कोर्सेस (MCVC)
* इंग्लिश मिडीयम स्कूल
* पॉलिटेक्नीक
* कॉलेज ऑफ इंजिनिअरींग
* एम.बी.ए.
* एम.ई (ई ॲण्ड टी.सी.)
* डी-फार्मसी
* बी फार्मसी
* एम.फार्मसी ॲन्ड रिसर्च सेंटर
* कला, वाणिज्य आणि विज्ञान (वरिष्ठ)महाविद्यालय
* कला, वाणिज्य आणि विज्ञान (कनिष्ठ) महाविद्यालय
* होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल
* एम.डी होमिओपॅथी
* अध्यापक विद्यालय (डी.एल.एड.)

## होस्टेल

* विद्यार्थी वसतिगृह - ०५
* कन्या वसतिगृह - ०२

(जाहिरात सहकार्य : डॉ. सुरेश पाटील, स्थानिक कार्यवाह, म.अ.प.)


Registration No.31918/77 अर्थसंवाद, डिसेंबर २०१६/खंड ४०, अंक ३, मूल्य रु.२०